अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि.२१ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २३१ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२




# ... अन् ती बचावली

## युवकांच्या प्रसंगावधानाने जीव देणाऱ्या युवतीला जीवदान

- स्थळ : छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव)
- वेळ : दुपारी दीड वाजता

✔ सुराज्य/सोलापूर

**तलावाच्या गीळ ओलांडून एका साधारण २२ वर्षाच्या युवतीने तलावात उडी मारली... एका तरूणाने ते पाहिले... त्याच्या मदतीला आणखी दोघे धावले ... त्याने लगेचच लाईफ सेव्हिंग जॅकेट फेकले... ते युवतीने दूर सारले... पण त्या युवकाने जवळ असणारी बोट घेत त्या मुलीला खेचून वर घेतले.... एक निराशेत ग्रासलेल्या युवतीला जीवदान मिळाले....**

ही युवती बुडत होती... या ठिकाणी असलेल्या युनिटी लेक व बोट क्लब तेथे कार्यरत असलेले कर्मचारी जुबेर शेख, इलियास शेख, श्रीनिवास परदेशी यांनी युवतीला वाचवण्यासाठी स्वत:च्या जीवाची बाजी लावली होती. त्याचं झालं असं, दुपारच्या टळटळीत उन्हात गारव्या साठी अनेक सोलापूरकर या तलावाजवळील सावलीत येतात. तसे सोमवारीही आले होते. त्यांच्यासमोरून त्या मुलीने तलावात कोणी पडू नये म्हणून उभारलेल्या रेलिंगवरून पाय टाकून कडेला उभारली अनेकांनी ते पाहिले. पण कोणी हे काय करतेस, असं विचारावं कोणालाही वाटलं नाही.

साऱ्यांच्या डोळ्यादेखत या युवतीने तलावात उडी मारली. पण बघ्यांपैकी कोणालाही तेथे जाऊन तिला वाचवावं वाटण्याच्या आत बोटींग



क्लबच्या एका सहकाऱ्याने क्षणार्धात लाईफ सेव्हिंग जॅकेट फेकले. मात्र नैराश्यामुळे जगणंच नकोसे झालेल्या तरूणीने ते बाजुला सारले.

ते पाहताच हा युवक बोटीतून त्या मुलीच्या दिशेने गेला. त्यावेळी फेरी घेऊन परतलेला त्याचा सहकारीही त्या बोटीत गेला. त्या दोघांनी त्या युवतीला उचलून बोटीत घेतले. नाका तोंडात पाणी गेलेल्या युवतीला बोलताही येत नव्हते. काही सेकंद झाल्यावर त्या युवतीचे नाव विचारले. रिक्षात बसवून तिला घरी पाठवून दिले. त्यानंतर हिंदी सिनेमाप्रमाणे पोलिस तेथे पोहोचले. पोलिसांकडे झाल्या प्रकाराची चौकशी करण्यासाठी फोन केला. त्यांनी शांतपणे सांगितले, आम्ही जाण्याआधी ही युवती तेथून गेली. त्यामुळे आम्हाला काही समजू शकले नाही घटनेबाबत माहिती मिळू शकली नाही.

या घटनेनंतर युवतीला जीवदान मिळाले. तीघांचे समाजातील सर्व स्तरातून कौतूक होत आहे. या तरुणांनी प्रसंगावधान दाखवले नसते तर युवतीला प्राण गमावावे लागले असते. या युवकांच्या तत्परतेमुळे बचावली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पोलीस येण्याआधी तीला घरी पाठवण्याचा सल्ला देणाऱ्यांचेही आभार मानले.

### घरी सोडले

गुन्हा टाळण्यासाठी पोलिसांना फोन करून घडल्या घटनेची माहिती देण्यात आली. त्यावेळी कोणीतरी या युवतीला अटक होईल. तिच्यावर आत्महत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल होईल. तिच्या करीअरवर परिणाम होईल, असे कोणीतरी सांगितले, त्यामुळे तिला या युवकांनी रिक्षात बसवून घरी सोडले.

### पोलिसांचेही कौतुक

या युवतीच्या करिअरचा विचार करून पोलिसांनीही या घटनेकडे दुर्लक्ष केले अशी चर्चा पोलिस वर्तुळात होती. कौटुंबिक वादातून या तरूणीने हे पाऊल उचलले होते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना समज देण्याचे काम केल्याची चर्चा होती. मात्र, त्याबाबत अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

# औज बंधाऱ्यात रात्री उशिरा पोहोचले उजनीचे पाणी

- तिबार पंपींगद्वारे पाण्याचा उपसा सुरु
- २० जुलैपर्यंत हे पाणी पुरवावे लागणार



✔ सुराज्य/सोलापूर

उजनी धरणातून भीमा नदीपात्रात सोडलेले पाणी सोमवारी रात्री उशिरा औज बंधाऱ्यात पोहोचले आहे. दरम्यान, उजनी धरणातून तिबार पंपींगद्वारे पाण्याचा उपसा सुरु करण्यात आला आहे.

सोलापूर शहरासाठी उजनी धरणातून १० मे रोजी पाणी सोडण्यात आले. सध्या सहा हजार क्यूसेकने पाणी नदीत सोडण्यात आले. हे पाणी रात्री उशिरा औज बंधाऱ्यात पोहोचले. औज आणि चिंचपूर हे दोन्ही बंधारे साडेचार मिटरपर्यंत भरुन घेतले जातील. २० जुलैपर्यंत हे पाणी पुरवावे लागणार आहेत. त्यासाठी काटकसरींचे नियोजन करावे लागेल. सध्या औज बंधारा कोरडा असला तरी चिंचपूर बंधाऱ्यात २० मे पर्यंत हे पाणी पुरेल इतके पाणी होते. हिप्परगा तलावातील उपलब्ध पाण्याचा उपसा सुरु आहे. त्यामुळे शहराला तीव्र पाणीटंचाई भासली नाही. काही भागात पाणी पोहोचले नाही. अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणी सुरू आहे. उन्हाळ्यात पाण्याचा वापर वाढतो त्यामुळे मागणीतही वाढ होते. सततचा होणारा उपसा आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे होणारे बाष्पीभवन यामुळे धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे.

### १९ पंपाद्वारे पाणी उपसा सुरू

महापालिकेने दुबार पंपींग सुरु केले होते. आता धरणातील पाणी वजा ५२ वर पोहोचल्यामुळे तिबार पंपींग करावे लागत आहे.तिबार पंपींगद्वारे ४ हजार मीटर क्यूब उपसा सुरू आहे. त्यासाठी दहा अश्वशक्तीचे १० पंप, १५ अश्वशक्तीचे सात पंप, १३५ अश्वशक्तीचा एक पंप, १९० अश्वशक्तीचा एक पंप असे एकूण १९ पंपाद्वारे धरणाच्या ठिकाणी पाणी उपसा सुरू आहे, असे महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

### नागरिकांनी पाण्याची काटकसर करावी

यंदा पावसाळा लवकर सुरु होण्याचा अंदाज आहे. तसे झाले तर पाण्याची मागणी कमी होईल. उजनी धरण क्षेत्रात पाऊस पडला तर आपल्याला फायदा होईल. सध्या शहराला पाच दिवसाआड पाणीपुरवठा सुरु आहे. आणखी काही दिवस पाण्याची टंचाई जाणवेल. नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा. पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, असे आवाहन महापालिकेकडून आले आहे.

# टेंभूर्णी येथे टायर फुटल्याने दुचाकीस्वाराचा कोसळून मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर



धावत्या दुचाकीचे टायर फुटल्याने खाली कोसळून जखमी झालेला दुचाकी वरील तरुण सोलापुरातील शासकिय रुग्णालयात मरण पावला. हा अपघात इंदापूर येथील टेंभुर्णी नाक्याजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडला.

स्वप्निल दत्तात्रय सुळे (वय २३ रा. सरडेवाडी, ता.इंदापूर) असे त्या मयत दुचाकी चालकाचे नाव आहे. तो रविवारी सायंकाळी इंदापूर येथून सरडेवाडी गावाकडे मोटरसायकल वरून निघाला होता. टेंभुर्णी नाक्या जवळ वाहनाचे टायर अचानक फुटले. त्यामुळे तो गाडीवरून पडून गंभीर जखमी झाला होता. त्याला इंदापूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापूरात पहाटे दाखल करण्यात आले. मात्र तो सकाळी मरण पावला. सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे.

# आजपासून विनापरवाना होर्डिंग स्ट्रक्चर हटाव मोहीम


## महापालिका ॲक्शन मोडवर; भूमी मालमत्ता विभागाने संबंधित मिळकतदारांना दिल्या नोटीसा

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील विविध ठिकाणी विनापरवाना, बेकायदेशीररित्या लावण्यात आलेले होर्डिंग स्ट्रक्चर हटविण्याची मोहीम महापालिकेच्या वतीने मंगळवारी सकाळपासून राबविण्यात येणार आहे. संबंधितांना २४ तास मुदतीच्या नोटिसा बजावण्यात आल्या असल्याची माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

मुंबईतील होर्डिंग दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिका उपायुक्त आशिष





लोकरे यांनी सोलापूर शहरातील सोलापूर खासगी होर्डिंग असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना त्याचबरोबर महापालिका यंत्रणेने सोलापूर शहरातील डिजिटल होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सक्त सूचना दिल्या. सात दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश उपायुक्त लोकरे यांनी या बैठकीत दिले होते.

दरम्यान, सोलापूर शहरात विविध ठिकाणी विनापरवाना

**या ठिकाणचे हटविणार होर्डिंग :** सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, एसटी बस स्थानक समोर, सरस्वती चौक, मेकॅनिक चौक, सम्राट चौक, टिळक चौक, तुळजापूर वेस, जोड बसवण्णा चौक , बाळीवेस अशा विविध ठिकाणी बेकायदेशीर आणि धोकादायक स्थितीतील होर्डिंग आढळून आली आहेत. त्यांना नोटीसाही बजावण्यात आल्या आहेत.

बेकायदेशीर रित्या लावण्यात आलेल्या होर्डींग स्ट्रक्चरचे सर्वेक्षण महापालिका प्रशासनाने केले. सोलापूर शहरातील अशा विनापरवाना लावण्यात आलेल्या विविध ठिकाणी असलेल्या ९ मिळकतदारांना २४ तासात विनापरवाना होर्डिंग स्ट्रक्चर हटविण्याच्या नोटिसा भूमी मालमत्ता विभागाच्या वतीने बजावल्या आहेत. बेकायदेशीर होर्डिंग २४ तासाच्या आत हटवण्यात यावे अन्यथा महापालिका हे होर्डिंग काढून साहित्य जप्त करेल. इमारत मालकांवर दंडात्मक कारवाई होईल, असा स्पष्ट इशारा नोटीशीद्वारे महापालिका प्रशासनाने दिला आहे. या इमारत मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या. मंगळवारी सकाळपर्यंत होर्डिंग न हटवल्यास कारवाई करण्यात येईल, असे लोकरे यांनी सांगितले.

# सांगोल्यात विजेचा कडकडाट अन् वादळी वाऱ्याने घरावरचे पत्रे उडाले

▸ लोटेवाडी येथे ट्रान्सफॉर्मर कोसळला





✔ **सांगोला :** तालुक्याला वादळी वाऱ्यासह वीज कडकडाटासह काही प्रमाणात अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. यामध्ये लोटेवाडी येथे विद्युत पुरवठा करणारा ट्रान्सफॉर्मर कोसळल्याने महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे तर आनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेले आहेत.

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. अनेकांचे पत्र्याचे शेड उडून गेले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. यामध्ये शिवसेना युवा नेते दादासाहेब लवटे यांनी घटनास्थळी भेट देऊन नागरिकांना धीर देण्याचे काम केले आहे.

याबाबत शासनाकडे पाठपुरावा करून संबंधित नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्यासंदर्भात सांगितले आहे. आगोदरच टंचाईच्या झळा मोठ्या प्रमाणात जाणवू लागले आहेत. यामध्येच आसमानी संकट ओढावल्याने पाणीटंचाई बरोबर आता सर्वसामान्य नागरिक यांना आर्थिक टंचाईला सामोरे जावे लागत आहे. शासनाकडून तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी नुकसानग्रस्त नागरिकांमधून केली जात आहे.

# गुन्हेशाखेने मोटारसायकल चोरीचे ८ गुन्हे आणले उघडकीस

## ○ चार आरोपींना अटक; २ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त

✔ सुराज्य/सोलापूर

शहर गुन्हेशाखेने आरोपी समर्थ प्रकाश मोटे (वय २३ रा. बाकळे नगर, हिप्परगा), सचिन विलास गायकवाड (वय ४० रा. रामवाडी), उमेश कटयप्पा वरगंटी (वय २८ रा. वैदवाडी, प्रियंका चौक) आणि संजय शंकर जाधव (वय ४० रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी) या ४ आरोपींना अटक केली.

मोटारसायकल चोरीचे ८ गुन्हे उघडकीस आणून २ लाख १५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला. शहरात

गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन निरगुडे व त्यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार एक जण चोरीच्या ३ मोटारसायकली विक्री करण्याच्या उद्देशाने त्याच्या घरासमोर मोकळ्या मैदानात उभा आहे. मिळालेल्या माहिती वरून पोलिसांनी श्रीशैल नगर, भवानी पेठ येथील सहस्त्रार्जून प्रशालेच्या पाठीमागील एका झोपडपट्टीच्या घरासमोर काटेरी झुडूपाच्या ठिकाणी सापळा लावला. त्यावेळी आरोपी उमेश वरगंटी याने चोरीच्या ३ मोटारसायकली काढून दिल्या.

मोटारसायकल चोरीचे गुन्हे रोजच्या रोज वाढत आहेत. त्यासाठी पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी शहर गुन्हेशाखे मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्या प्रमाणे शहर गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदिप पाटील व त्यांच्या पथकाला बातमी समजली की, समर्थ मोटे रा. हिप्परगा याच्या घराच्या पत्रा कंपौंड मध्ये चोरीच्या मोटारसायकलली आहेत. ही बातमी समजल्यावर पोलिसांनी छापा टाकून आरोपी समर्थ मोटे याच्याकडून ३ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. व तीन गुन्हे उघडकीस आणले. तसेच आरोपी



सचिन गायकवाड रा. रामवाडी हा रेल्वे बोगद्याजवळ नंबर प्लेट नसलेली मोटारसायकल घेवून थांबला होता. पोलिसांनी त्याच्याकडे मोटारसायकलच्या कागदपत्रांची चौकशी केली असता, त्याने मोटारसायकल चोरीचा गुन्हा कबुल केला.

तसेच गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दादासाहेब मोरे व त्यांच्या पथकास मिळालेल्या माहिती वरून नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान, न्यु पाच्छा पेठ येथे सापळा लावून रेकॉर्ड वरील गुन्हेगार संजय जाधव याला ताब्यात घेवून त्याकडील नंबर प्लेट नसलेली चोरीची मोटारसायकल जप्त केली. अशा प्रकारे शहर गुन्हेगाखेच्या पथकांनी ४ आरोपींना अटक करून मोटारसायकल चोरीचे ८ गुन्हे दाखल उघडकीस आणले.

ही कामगिरी शहर गुन्हेशाखेचे पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदिप पाटील, जीवन निरगुडे, दादासाहेब मोरे त्यांच्या पथकाने पार पाडली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अजून थोडे दिवस संगीत खूर्ची!

| कल्याण |
|---|
| 156-26-150 |

| मुंबई |
|---|
| 159-54-789 |

# नवा उच्चांक : चांदी ९२,५०० प्रति किलो

## ▪ दिवसात अडीच हजारांनी वाढ; सोने पाऊण लाखपार

✔ सुराज्य/सोलापूर

**सोने-चांदीची भाववाढ पुन्हा वेगाने सुरू झाली असून सोमवारी चांदीच्या भावात एकाच दिवसात दोन हजार ५०० रुपयांची वाढ होऊन ती ९२ हजार ५०० रुपये प्रति किलोवर पोहचली आहे. सोन्याच्याही भावात ७०० रुपयांची वाढ होऊन ते ७५ हजार रुपये प्रति तोळ्यावर पोहचले आहे. या दोन्हीही मौल्यवान धातूंचा हा नवा उच्चांक ठरला.**

अमेरिकन बँकिंग क्षेत्राचा मोठा परिणाम होऊन तेथे सोन्यामध्ये गुंतवणूक वाढल्याने तसेच चीन देशानेही सोने खरेदी वाढवल्याने मार्च महिन्यापासून सोन्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढण्यास सुरुवात झाली. त्या पाठोपाठ चांदीचीही खरेदी वाढल्याने तिचेही भाव वाढू लागले. एप्रिल महिन्यात ही भाववाढ कायम राहिली, मात्र एप्रिलच्या अखेरपासून भाव काहीसे कमी होऊ लागले. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून हे भाव पुन्हा एकदा वाढू लागले व सोने-चांदी नवनवीन उच्चांक गाठू लागले. यात चांदीच्या भावात मोठी वाढ होत आहे. गेल्या महिन्यात १७ एप्रिल रोजी ७४ हजार २०० रुपयांवर पोहचलेल्या



सोन्याचे भाव नंतर हळूहळू कमी होत जाऊन ते ७१ हजार ६०० रुपयांपर्यंत खाली आले. त्यानंतर मात्र पुन्हा वाढ सुरू झाली व एक महिन्यांनतर अर्थात १८ मे रोजी पुन्हा ७४ हजार रुपयांवर पोहचले. सोमवार, २० मे रोजी त्यात पुन्हा ७०० रुपयांची वाढ होऊन ते ७५ हजार १०० रुपये प्रति तोळा झाले आहे. जीएसटीसह एक तोळे सोने घेण्यासाठी ७७ हजार ३५३ रुपये मोजावे लागणार आहे.

### ...म्हणून सोन्या आणि चांदीचे भाव वाढले

सोन्या आणि चांदीचे भाव वाढले आहेत. इराकच्या अध्यक्षांचा अपघाती मृत्यू झाला आहे. तो घातपात असल्याचा संशय आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच जगभरात ही दरवाढ झाल्याची शक्यता आहे, असे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष देवरमनी यांनी सांगितले.

### मंगळवारीच खरी भाववाढ कळणार

सोमवारी आंतराष्ट्रीय बाजारात गोंधळाची स्थिती होती. त्यामुळे सोन्या-चांदीचे भाव वाढले हे खरे आहे. मात्र नेमके किती वाढले हे मंगळवारी कळणार आहे. सोमवारी मुंबईत मतदान असल्याने सराफ बाजार बंद होता. त्यामुळे नेमकी किती वाढ झाली हे कळेल, असे सोलापूरचे सराफ व्यावसायिक राजेशखर चडचणकर यांनी सांगितले.

### १३ दिवसात चांदीत १० हजाराने वाढ


चांदीच्या भाववाढीचा वेग पाहिला तर १३ दिवसातच १० हजार रुपयांची वाढ झाली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला चांदी ८१ हजार रुपये होती. ७ मेपर्यंत ती ८२ हजार ७०० रुपयांपर्यंत पोहचली. त्यानंतर सुरू झालेली वाढ कायम राहत चांदी शुक्रवार, १७ मे रोजी ८७ हजार ४०० रुपयांवर पोहचली. १८ रोजी त्यात पुन्हा वाढ होऊन ती ९० हजार रुपये आणि त्यानंतर सोमवार, २० मे रोजी पुन्हा दोन हजार ५०० रुपयांच्या वाढीसह चांदी ९२ हजार ५०० रुपये प्रति किलोवर पोहचली आहे. एक किलो चांदीसाठी जीएसटीसह ९५ हजार २७५ रुपये मोजावे लागणार आहे.

धक्का!! सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. २१ मे २०२४ । पान २

# राज्यातील अखेरच्या टप्प्यात कुणाची बाजी?

**राज्यात अखेरच्या टप्प्यात मुंबई, ठाणे आणि नाशिकमधील १३ मतदारसंघांमध्ये सोमवारी मतदान झाले आहे. गेल्या वेळी भाजप-शिवसेना युतीने या सर्व १३ जागा जिंकल्या होत्या. शिवसेनेतील फुटीनंतर ठाणे, दक्षिण मुंबई मतदारसंघांच्या खासदारांनी ठाकरे गटाला साथ दिली. महायुतीला ११ तर शिवसेना ठाकरे गटापुढे दोन मतदारसंघ कायम राखण्याचे आव्हान असेल. मुंबई, ठाणे पट्ट्यातील १० मतदारसंघांमध्ये महायुतीची कसोटी आहे.**



**वायव्य मुंबई :** शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार अमोल कीर्तीकर आणि शिंदे गटाचे रवींद्र वायकर या दोन शिवसैनिकांमध्ये चुरशीची लढत होत आहे. गैरव्यवहारांच्या आरोपांवरून दोन्ही उमेदवारांची 'ईडी'कडून चौकशी झाली. गजाआड होण्यापासून वाचण्यासाठी आपण शिंदे गटात प्रवेश केला हे विधान वायकर यांच्या अंगाशी आले. मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे या एकाच मुद्द्यावर भाजपची वायकर यांना साथ. मराठी, उत्तर भारतीय, मुस्लीम, गुजराती असे संमिश्र मतदार या मतदारसंघात आहेत. एकूण १७ लाख ३५ हजार मतदार आहेत.

**ईशान्य मुंबई :** मुलुंड ते शिवाजीनगर-मानखुर्द दरम्यान पसरलेल्या ईशान्य मुंबई मतदारसंघात भाजपचे मिहिर कोटेचा आणि शिवसेना ठाकरे गटाचे संजय दिना पाटील या दोघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. दोन्ही पक्षांनी ही जागा प्रतिष्ठेची केल्याने आणि कोटेचा यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान मोदी यांचा रोड शो आयोजित करण्यात आल्याने ही जागा भाजपसाठी अनन्यसाधारण महत्त्वाची ठरली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तीन सभा या मतदारसंघात झाल्या. या मतदारसंघात १६ लाख ३६ हजार मतदार असून त्यामध्ये सर्वाधिक सात लाख ६० हजार मराठी, खालोखाल दोन लाख ४० हजार मतदार मुस्लीम, तर गुजराती, मारवाडी दोन लाख मतदार आहेत. हिंदी भाषिक मतदारांची संख्याही पावणे दोन लाखाच्या आसपास आहे. कोटेचा यांची सारी मदार गुजराती-मारवाडी आणि उत्तर भारतीयबहुल मुलुंड, घाटकोपरमधील मतदारांवर आहे, तर संजय पाटील यांना शिवाजी नगर-मानखुर्दमधील मतदारांचा कसा प्रतिसाद मिळतो यावर त्यांचे यशापयश अवलंबून आहे. धारावी प्रकल्पबाधितांचे मुलुंडमधील पुनर्वसन हा मुद्दा प्रचारात चांगलाच गाजला. मराठी-गुजराती वादाचा प्रकारही घडला. मुंबईत केवळ याच मतदारसंघात दोन्ही बाजूच्या पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वादावादी वा समोरासमोर येण्याचे प्रकार घडले आहेत.

**उत्तर मध्य मुंबई :** काँग्रेसच्या वर्षा गायकवाड आणि भाजपचे ॲड. उज्ज्वल निकम यांच्यात लढत होत आहे. निकम यांच्या उमेदवारीने मुंबईवरील दहशतवादी हल्ला, कसाब, हेमंत करकरे यांचा मृत्यू हे सारे विषय प्रचाराच्या केंद्रस्थानी आले होते. विमानतळाच्या आसपासच्या झोपड्यांचा प्रश्न हा मतदारसंघातील महत्त्वाचा प्रश्न आहे. काँग्रेससाठी ही जागा प्रतिष्ठेची आहे. १७ लाखांपेक्षा अधिक मतदार या मतदारसंघात आहेत.

**दक्षिण मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे अरविंद सांवत आणि शिवसेना शिंदे गटाच्या यामिनी जाधव यांच्यात लढत होत आहे. सावंत हे गेली दहा वर्षे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. यंदा भाजपची साथ त्यांना नाही. उच्चभ्रू आणि कनिष्ठ असे दोन्ही वर्गातील मतदार या मतदारसंघात आहेत. केंद्र सरकारच्या जमिनींवरील झोपड्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षे रखडलेला आहे. प्रचारात हा मुद्दा महत्त्वाचा ठरला. यामिनी जाधव यांच्या वादग्रस्त पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने त्यांना लक्ष्य केले होते. सुमारे १५ लाख ५० हजार मतदार आहेत.

**दक्षिण मध्य मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार राहुल शेवाळे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अनिल देसाई यांच्यात लढत होत आहे. धारावीचे पुर्नवसन हा प्रश्न या मतदारसंघातील प्रचाराच्या केंद्रस्थानी होती. याशिवाय झोपड्यांच्या पुनर्वसनाचा विषयही तापला होता. शिवसेनेची स्थापना झालेल्या दादर आणि पक्षाचे मुख्यालय शिवसेना भवन या मतदारसंघात असल्याने ठाकरे गटाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. मुंबईतील सहापैकी सर्वात कमी १४ लाख ७५ हजार मतदार या मतदारसंघात आहेत.

**उत्तर मुंबई :** भाजपसाठी मुंबईतील सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या या मतदारसंघातून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल हे निवडणूक लढवीत आहेत. त्यांच्याविरोधात काँग्रेसने स्थानिक नेते भूषण पाटील यांना उमेदवारी दिली असून त्यांनी कमी वेळ उपलब्ध होऊनही चांगला प्रचार केला आहे. स्थानिक विरुद्ध उपरा उमेदवार असा वाद निर्माण करण्यात आला असून हायप्रोफाईल नेता सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवू शकणार नाही, असा प्रचार झाला. झोपडपट्टी आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास, परिसरात अतिविशेषोपचार (सुपरस्पेशालिटी) रुग्णालयाचा अभाव, शिक्षण, आरोग्य, वाहतूक कोंडी, उपनगरी प्रवाशांच्या समस्या, कोकणवासीयांच्या अडचणी, असे विविध प्रश्न प्रचारात मांडण्यात आले. उत्तर मुंबईला 'उत्तम मुंबई' करण्याचे आश्वासन गोयल यांनी दिले आहे. एकूण १८ लाख मतदार आहेत.

**दिंडोरी :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंीपस यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याविरोधात या मतदारसंघात ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांच्यात लढत होत आहे. शिवसेनेत झालेल्या फुटीचा सर्वात मोठा परिणाम या मतदारसंघात पाहायला मिळतो. भाजपच्या स्थानिक नेत्यांची असलेली नाराजीमुळे हा मतदारसंघ सुरुवातीला चर्चेत आला. त्यामुळे श्रीकांत यांच्याविरोधात तुल्यबळ उमेदवार उतरवून या नाराजीचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल असा अंदाज सुरुवातीला बांधला जात होता. मात्र दरेकर हे आव्हान कितपत पेलतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात सुमारे २१ लाख मतदार आहेत.

**पालघर :** शहरी, ग्रामीण, आदिवासी असा संमिश्र मतदारसंघ असलेल्या या मतदारसंघात भाजप, शिवसेना (उद्धव गट) आणि बहुजन विकास आघाडी अशी तिहेरी लढत आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या भारती कामडी, बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील आणि भाजपचे डॉ. हेमंत सावरा अशी तिरंगी लढत होत आहे. डहाणू, तलासरी पट्ट्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची हक्काची मते आहेत. माकपने यंदा शिवसेना ठाकरे गटाला पाठिंबा दिला आहे. सुमारे २१ लाख मतदार आहेत.

**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खासदार पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याविरोधात या मतदारसंघात ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांच्यात लढत होत आहे. शिवसेनेत झालेल्या फुटीचा सर्वात मोठा परिणाम या मतदारसंघात पाहायला मिळतो. भाजपच्या स्थानिक नेत्यांची असलेली नाराजीमुळे हा मतदारसंघ सुरुवातीला चर्चेत आला. त्यामुळे श्रीकांत यांच्याविरोधात तुल्यबळ उमेदवार उतरवून या नाराजीचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल असा अंदाज सुरुवातीला बांधला जात होता. मात्र दरेकर हे आव्हान कितपत पेलतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात सुमारे २१ लाख मतदार आहेत.

**भिवंडी :** केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांना या मतदारसंघात भाजपने सलग तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. कुणबी, आगरी आणि मुस्लीम समाजाची मोठी मते असलेला हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने काँग्रेसकडून हिसकावून घेतला आहे. सुरेश म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली असून शहापूर, भिवंडी ग्रामीण पट्ट्यात कार्यरत असलेले जिजाऊ संघटनेचे नीलेश सांबरे अपक्ष रिंगणात आहेत. जातीय ध्रुवीकरण मोठ्या प्रमाणावर करण्याचा प्रयत्न झाला आहे. या मतदारसंघात २१ लाख मतदार आहेत.

**धुळे :** महायुतीकडून भाजपचे सुभाष भामरे विरुद्ध महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या शोभा बच्छाव या दोन डॉक्टरांमधील प्रचार अगदी शेवटच्या दिवसापर्यंत रंगतदार ठरला. विशेष म्हणजे दोघांच्या उमेदवारीला प्रारंभी स्वपक्षांमधूनच विरोध झाला होता. भामरे १० वर्षे खासदार असताना एकही मोठा प्रकल्प मतदारसंघात आणता न येणे, धुळे शहराचा पाणीप्रश्न, कृषिमालाल भाव नसणे या विषयावर मविआकडून भर देण्यात आला. प्रत्युत्तरात भामरेंकडून विकास कामांपेक्षा मोदी मुद्यावरून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न झाला. धुळे आणि मालेगाव शहरांमध्ये एमआयएम, समाजवादी पक्ष हे मविआच्या पाठीशी राहिल्याने मतांच्या ध्रुवीकरणासाठी भाजपकडून शेवटच्या दिवशी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मालेगावात सभा घेण्यात आली. नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील प्रत्येकी तीन विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या या लोकसभा मतदारसंघात भामरे हे धुळे जिल्ह्यातील तर, बच्छाव या नाशिक जिल्ह्यातील असल्याने प्रादेशिकतावादाची किनारही या लढतीस आहे. सुमारे २० लाख मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहेत.

**नाशिक :** शिंदे गटाचे हेमंत गोडसे विरोधात महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे अशी मुख्य लढत आहे. अपक्ष शांतिगिरी महाराज यांची उमेदवारीही समर्थकांकडून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रांमुळे चर्चेत आली. महायुतीकडून उशिराने जाहीर झालेल्या उमेदवारीमुळे प्रारंभी प्रचारात गोडसे हे मागे असल्याचे चित्र अंतिम टप्प्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चारवेळा केलेल्या नाशिक दौऱ्यामुळे काहीसे बदलले आहे. मित्रपक्षांचे अलिप्ततावादी धोरण, भुजबळ यांना उमेदवारी न मिळाल्याने ओबीसी समाजाची नाराजी ठळकपणे दिसून आली. गोडसे यांचा भाजपशी संबंधित शहरी मतदारांवर तर, वाजे यांचा ग्रामीण मतदारांवर अधिक भर राहिला. अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराज हे गोडसे आणि वाजे या दोघांच्या मतांमध्ये वाटेकरी ठरण्याची चिन्हे आहेत.

## तुम्ही सीनियर, शिंदेंना सलाम ठोकणार का?

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातलं मतदान आज संपन्न होतंय. सकाळी सातपासून राज्यात १३ मतदारसंघात मतदान सुरु आहे. वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंभात यंदा लक्षवेधी लढत होत आहे. इथे शिंदेसेना विरुद्ध ठाकरेसेना असा सामना होत आहे. विशेष म्हणजे इथे वडील विरुद्ध मुलगा असा संघर्ष आहे.

वायव्य मुंबईचे खासदार गजानन कीर्तीकर यांनी शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदेसेनेत प्रवेश केला. पक्षानं त्यांच्या जागी ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षात आलेल्या आमदार रविंद्र वायकरांना संधी दिली. तर ठाकरेसेनेनं गजानन कीर्तीकर यांचे पुत्र अमोल कीर्तीकरांना तिकीट दिलं. गजानन कीर्तीकरांनी त्यांच्या लेकाविरोधात प्रचार केला.



आता गजानन कीर्तीकरांच्या पत्नीनं प्रथमच त्यांच्या भावना जाहीरपणे बोलून दाखवल्या. गजानन कीर्तीकरांच्या निर्णयाला माझा विरोध होता, तो आजही कायम आहे. शिंदे गटात जाऊ नका असं त्यांना सांगितलं होतं, असं सीनियर कीर्तीकरांच्या होम मिनिस्टर म्हणाल्या.

माझा पाठिंबा अमोलला आहे. ते (गजानन कीर्तीकर) शिंदेंकडे गेले, तो त्यांचा निर्णय. आम्हाला तो आवडला नाही. मी विरोध केला होता. त्यांना जाऊ नका सांगितलेलं. मी हातचं राखत बोलत नाही. जे पटत नाही ते थेट बोलायला काय भीती, असा सवाल त्यांनी केला. प्रत्येकाला त्याचं मत मांडण्याचं स्वातंत्र्य आहे. मी माझं मत व्यक्त केलं. हा शिंदे आमच्याकडे कितीदा येत होता. तो तुमच्यापेक्षा लहान आहे. तुम्ही तिकडे जाऊन त्यांना सलाम ठोकणार हे आम्हाला बरोबर वाटत नाही, असं आम्ही त्यांना आधीच सांगितलं होतं, असं कीर्तीकरांच्या पत्नी म्हणाल्या.

मी अमोलच्या पाठिशी आहे. तोच निवडून येणार याची खात्री आहे. तो चांगल्या मतांनी निवडून येईल यात तिळमात्र शंका नाही, असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला. गजानन कीर्तीकरांनी अमोल यांच्याविरोधात जोरदार प्रचार केला आहे. तरी ते निवडून येतील का, असा प्रश्न मिसेस कीर्तीकरांना विचारण्यात आला. त्यावर प्रचाराचं मला माहीत नाही. मी आधी प्रचाराला जायचे. चौकसभा घ्यायचे. पण यंदा प्रकृतीच्या कारणांमुळे जाता आलं नाही. पण अमोल नक्की विजयी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## 'राजकीय विकेट' पाडण्यावरुन रंगला 'शाब्दिक सामना'

ठाण्यात शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी मुख्य लढत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याच्या मैदानात बऱ्याच लोकांची विकेट काढायची आहे, असा टोला लगावला होता. यावर आव्हाडांनी प्रत्युत्तर दिले आहे.

कोणाचे विकेट पडतील? हे मतदार राजा श्रेष्ठ असल्याने तो ठरवतो, असे कोणाच्या बोलण्याने विकेट पडत नसतात, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना लगावला आहे. ठाणे येथे जितेंद्र आव्हाड यांनी आपले मतदान केले आहे.

ठाण्यात शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी मुख्य लढत असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तर उद्धव ठाकरेंनी देखील तिसऱ्यांदा मतदारसंघ आपल्याकडे राखण्यासाठी आपल्या शिलेदाराला मैदानात उतरवले आहे. यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याच्या मैदानात बऱ्याच लोकांची विकेट काढायची आहे, असा टोला लगावला. शिंदे म्हणाले, 'बऱ्याच लोकांची विकेट काढायची आहे, म्हणून मी आज क्रिकेट खेळलो.' यात 'राजकीय विकेट' पाडण्यावरुन ठाणेकर नेत्यांमध्ये शाब्दिक 'सामना' रंगल्याचे पाहायला मिळाले. जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात आपल्या मुलीसोबत



मतदानाचा हक्क बजावला आहे. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याला प्रत्युत्तर दिले आहे. कोणाचे विकेट पडतील? हे मतदार ठरवतील, असे आव्हाड म्हणाले. तर विरोधक ५० जागा जिंकतील, तीन जागा पाकिस्तानातून देखील घेतील त्यांचा काय भरोसा नाही, अशी टिप्पणी देखील आव्हाड यांनी यावेळी केली. दरम्यान मतदानप्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत आव्हाड म्हणाले की, ठाण्यात बोगस मतदान जोरदार सुरू आहे. शासकीय यंत्रणा हाताशी धरलेल्या आहेत. जिथे त्यांना मतदान कमी होणार आहे. तिथे त्यांनी मशीन धीम्या केल्या आहेत. तसेच 'निवडणूक आयोग जर कोणाच्या हाताचे बाहुले बनून काम करणार असेल आणि अधिकारी मुद्दाम मशीन स्लो करणार असतील तर निवडणुकाच घेऊ नका, त्या रद्द करून टाका.' असा सल्ला देखील जितेंद्र आव्हाड यांनी दिला आहे.

## राज ठाकरे चोरीच्या मालाचं चुंबन घेतायत



शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीका केली. संजय राऊत म्हणाले, मुंबईत एका बाजूला मुडदे पडले आहेत, निरपराध लोक मरण पावले आहेत आणि आपले कार्यवाहक पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्यासमोरच रोड शो करत आहेत. हे सगळं किती असंवेदनशील आहे. ईशान्य मुंबईत राज ठाकरे, नारायण राणे आणि इतर नेते फिरत आहेत, रस्त्यावर उतरले आहेत. खरंतर आम्हीच त्यांना रस्त्यावर उतरवलं आहे. ही मंडळी आज भाजपासाठी घाम गळतेय. राज ठाकरे यांनी स्वतःच्या पक्षासाठी इतकी मेहनत घेतली असती तर त्यांच्या कार्यकर्त्यांना आज चांगले दिवस आले असते. भाजपाने त्यांना भाड्याने घेतलं आहे. त्यांच्यासह अनेकांना भाड्याने घेतलंय.

संजय राऊत म्हणाले, भाड्याने घेतलेल्या या लोकांना रस्त्यावर उतरावं लागतंय. कारण मोदींनी गेल्या दहा वर्षात काही कामं केली नाहीत. भाजपा जे काही दावे करतेय ते ऐकून प्रश्न पडतो की, गेल्या १० वर्षांत यांनी काय दिवे लावले आहेत? मागील लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे असं म्हणत होते की नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना महाराष्ट्रात पाय ठेवू देऊ नका. तेच राज ठाकरे आज भाजपाच्या पखाल्या वाहत आहेत हे पाहून आम्हाला खूप वाईट वाटतं.दरम्यान.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे काँग्रेसच्या 'पंजा'ला मतदान करणार आहेत तर राज ठाकरे १९ वर्षांनंतर पहिल्यांदाच शिवसेनेच्या धनुष्यबाणाला मतदान करणार आहेत. यावरही ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. राऊत म्हणाले, राज ठाकरे ज्या धनुष्यबाणाला मतदान करणार आहेत तो डुप्लिकेट (नकली) धनुष्यबाण आहे, तो शिवसेनेचा, बाळासाहेब ठाकरेंचा धनुष्यबाण नाही. तो धनुष्यबाण चोरलेला आहे. शिंदे हे चोरीच्या मालावर हक्क सांगत आहेत आणि राज ठाकरे हे त्या चोरीच्या मालाचं चुंबन घेत आहेत. ते नकली ओठ आहेत.



### आम्ही काँग्रेसच्या पंजावर मतदान करणार

ठाकरे गटाचे खासदार म्हणाले, आम्ही काँग्रेसच्या पंजाला मतदान करतोय. हा पंजा त्याच काँग्रेसचा आहे, ज्या काँग्रेसने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वाधिक योगदान दिलं आहे. ज्या कमळाबाईला आम्ही २५ वर्षे मत देत होतो, त्याच कमळाबाईने या देशाची वाट लावली आहे, महाराष्ट्र लुटला आहे. त्यामुळेच आम्हाला महाविकास आघाडी म्हणून एकत्र येऊन हा देश आणि या देशाचं संविधान वाचवायचं आहे. त्यासाठीच आम्ही एकमेकांबरोबर उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. निशाणी कोणतीही असो, आमची लढाई हा देश वाचवण्याची आहे. उद्धव ठाकरे काँग्रेसच्या पंजाला मतदान करत आहेत, तर राज्यभरात काँग्रेसचे अनेक नेते मशालीवर आणि तुतारीवर मतदान करताना तुम्ही पाहिलं असेल, आज पुन्हा पाहणार आहात.

## तोंडावर कधीच आपटलेत, आता त्यांची तोंड फुटतील

**लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील मतदान आज पार पडत आहे. मुंबईतील सर्व सहा मतदारसंघ, भिवंडी, नाशिक, दिंडोरी, धुळे, ठाणे, कल्याण या मतदारसंघात आज मतदान होत आहे. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे. दरम्यान, या निवडणुकीच्या प्रचारात अनेकदा सत्ताधारी आणि विरोधी पक्षामध्ये आरोप-प्रत्यारोप झाले आहेत.**

आज मतदानाच्या दिवशी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भारतीय जनता पार्टीवर टीका केली. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे



यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. उद्धव ठाकरे कधीच तोंडावर आपटलेत, सर्व जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून येतील, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

आज सकाळी मतदान प्रक्रिया सुरू झाल्यानंतर बोगस मतदान होत असल्याचा आरोप करत काही ठिकाणी ईव्हीएम बंद पडल्याचा आरोप विरोधी पक्षाने केला होता. यावर बोलताना शिंदे म्हणाले, नौपाडा येथील एका मतदान केंद्रावर एक तास मतदान बंद पडलं होतं. त्यानंतर ते तात्काळ सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही दिलेल्या आहेत. मात्र, बोगस मतदार आणण्याची आम्हाला गरज काय? ठाण्यात आम्ही जे काम केलं, शिवसेना आणि धर्मवीर आनंद दिघे यांचा हा बालेकिल्ला आहे. या ठाण्यावर बाळासाहेब ठाकरे यांनी प्रेम केलेलं आहे. गेले अनेक वर्ष आम्ही ठाण्यात काम करत आहोत. ठाणे हा महायुतीचा बालेकिल्ला आहे. मतदार आजच्या दिवसाची वाट पाहत होते. ज्यांनी टीका केली त्यांनी हत्यार खाली टाकलेली आहेत. पराभवाची चाहूल त्यांना लागली आहे. ज्यावेळी पराभवाची चाहूल लागते, तेव्हा अशा प्रकारची विधाने ऐकू येतात, असा टोला शिंदे यांनी लगावला.

### मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले?

मतदानाचा पाचवा टप्पा आज पार पडत असून सर्वांना आवाहन आहे की,लोकशाहीच्या या उत्साहामध्ये सर्वांनी सहभागी व्हावं. आपलं एक मत इतिहास घडवेल. ही निवडणूक खऱ्या अर्थाने देशाच्या विकासाची आहे. त्यामुळे सर्वांनी यामध्ये सहभागी व्हावं. या देशाचं पुन्हा एकदा नेतृत्व करण्यासाठी नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी देशातले सर्वजण आतूरले आहेत. महाराष्ट्रात लोकांच्या प्रतिक्रिया मी पाहिल्या आहेत. देशाच्या विकासासाठी ही निवडणूक असून नागरिकांनी मतदान करत आपला हक्क बजवावा, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## नाशकात भाजप आणि ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये वाद

जुने नाशिक परिसरातील मतदान केंद्रावर माजी आमदार वसंत गीते आणि भाजपच्या सत्ताधारी आमदार देवयानी फरांदे यांच्यात बाचाबाची झाल्याची घटना घडली आहे. भाजप आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली.

यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील भद्रकाली पोलीस ठाण्यासमोर भाजपच्या आमदार देवयानी फरांदे आणि माजी आमदार वसंत गीते यांचे समर्थक आमनेसामने आले. शहरातील



मौलाना अब्दुल कलाम आझाद शाळा केंद्रावर मतदान झाल्यानंतर लोक उभे राहत असल्याची तक्रार फरांदे यांनी केली होती. त्यानंतर दोन्ही बाजूंच्या समर्थकांकडून एकमेकांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच ठाकरे गटाकडून पैसे वाटप सुरु असल्याचा आरोप भाजपच्या आमदार देवयानी फरांदे यांनी केला. तर मतदारांमध्ये उत्सांह असल्यामुळे भाजपकडून बिनबुडाचे आरोप करत असल्याचा पलटवार माजी महापौर विनायक पांडे यांनी केला. नाशिकची निवडणुक निष्ठावान विरुद्ध गद्दार असल्याने भाजपकडून दांडशाहीचा वापर करत असल्याचा आरोपही विनायक पांडे यांनी केला आहे. यावेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने कार्यकर्त्यांना घटनास्थळावरून पांगविले. परिसरात गोंधळ व तणाव निर्माण झाल्याने मतदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

अस्सल सोलापुरी
# सुराज्य सोलापूर

## सेलिब्रिटींनी मोठ्या उत्साहात केले मतदान



**मुंबई** : नागरिकांना घराबाहेर पडून जरूर मतदान करा असे आवाहन करणाऱ्या सेलिब्रिटींनी सोमवारी मुंबईत पार पडलेल्या लोकसभा निवडणूकिच्या ५ व्या टप्प्यातील मतदानासाठी सकाळपासूनच आपापल्या मतदारसंघातील मतदान केंद्रांवर हजेरी लावली होती. मुंबईतील सहा मतदारसंघांमध्ये आपापल्या मतदार केंद्रांवर जाऊन नेते, अभिनेते, प्रशासकीय अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले. राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवन क्लब हाऊस येथे कुटुंबियांसमवेत मतदानाचा अधिकार बजावला. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी के. सी. महाविद्यालय येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनीही के. सी. महाविद्यालयातील मतदान केंद्रावर मतदान केले. तर अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल यांनीही सोमवारी सकाळच्या सत्रात मतदान केले. म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी वांद्रे पूर्व कडील नवजीवन शाळेतील मतदार केंद्रात जाऊन मतदानाचा हक्क बजावला.




## थोडक्यात




### इमारतींवर कायदेशीर कारवाई करा : गगराणी

**मुंबई** : वारंवार पाहणी करून किंवा नोटीस देऊनही अग्निरोधक प्रणाली न लावणाऱ्या किंवा त्या अद्ययावत न ठेवणाऱ्या मालमत्ता धारकांवर आणि इमारतींवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच आगीसारख्या आपत्तींसाठी जबाबदार असलेल्यांवर पोलिसांकडून यथोचित कारवाई केली जाते. त्याच धर्तीवर महानगरपालिकेकडूनही जबाबदारी निश्चित केली जावी, असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले. मुंबई अग्निशमन दलाच्या भायखळा येथील मुख्यालयात गगराणी यांनी सोमवारी सकाळी भेट देऊन सुमारे तीन तास आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

----------------



### वाढत्या उन्हाचा आठ जणांना त्रास

**मुंबई** : मुंबईमध्ये सोमवारी ३५ अंश सेल्सिअस तापमान होते. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उष्मा सोसावा लागला. मात्र बहुसंख्य मतदारांनी उन्हाचा तडाखा सोसत मतदानाचा हक्क बजावला. मतदानासाठी रांगेत उभ्या असलेल्या आठ जणांना उन्हाचा त्रास झाला. त्यामुळे त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या विविध आरोग्य केंद्रांवर नेण्यात आले. तेथे उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. उन्हाचा वाढता तडाखा आणि मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, पंखे आदी सुविधांचा अभाव यामुळे मतदारांचे अतोनात हाल झाले. त्यामुळे मतदानासाठी रांगेत उभ्या असलेल्या आठ जणांना चक्कर येणे, निर्जलीकरण होणे असा त्रास झाला. त्यांना तातडीने मतदान केंद्राजवळ असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांत नेण्यात आले. आरोग्य केंद्रामध्ये उपचार करून त्यांना घरी पाठविण्यात आले.

# देशात पाचव्या टप्प्यात एकूण ५६.६८ टक्के मतदान

**सोलापूर/प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील मतदान सोमवारी पार पडलं. महाराष्ट्रातील मुंबईमधील सहा मतदारसंघ तसेच भिवंडी, नाशिक, दिंडोरी, धुळे, ठाणे, कल्याण, पालघर, या १३ मतदारसंघात सोमवारी मतदान पार पडलं आहे. महाराष्ट्रात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४८.६६ टक्के मतदान झालं आहे. देशात सोमवारी (२० मे) सात राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशात ४९ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडलं.**

यामध्ये सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार देशात एकूण ५६. ६८ टक्के मतदान झालं. यामध्ये पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७३ टक्के मतदान झालं आहे.

महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान झालं आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या आणि पाचव्या टप्प्यांमध्ये दुसऱ्या राज्यांच्या तुलनेत पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक मतदान झाले आहे.

देशात सोमवारी पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले. यामध्ये एकूण ४९ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, देशात एकूण ५६.६८ टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७३ टक्के तर महाराष्ट्रात सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदान झाले आहे. तसेच उत्तर प्रदेशमध्ये ५५.८० टक्के, बिहारमध्ये ५२.३५ टक्के, झारखंडमध्ये ६१.९० टक्के, ओडिशामध्ये ६०.५५ टक्के, जम्मू आणि काश्मीरमध्ये ५४.२१ टक्के आणि लडाखमध्ये ६७.७५ टक्के मतदान झाले आहे.



### महाराष्ट्रातील कोणत्या मतदारसंघात किती मतदान झाले?

- नाशिक– ५१.१६ टक्के
- पालघर – ५४.३२ टक्के
- ठाणे – ४५.३८ टक्के
- धुळे– ४८.८१ टंक्के
- भिवंडी– ४८.८९ टक्के
- दिंडोरी – ५७.०६ टक्के
- कल्याण – ४१.७० टक्के
- मुंबई उत्तर पूर्व–४८.६७ टक्के
- मुंबई उत्तर – ४६.९१ टक्के
- मुंबई द.मध्य – ४८.२६ टक्के
- मुंबई उ.पश्चिम–४७.७९ टक्के
- मुंबई दक्षिण– ४४.२२ टक्के
- मुंबई उ.मध्य–४७.३२ टक्के

मुंबईतील सहा मतदारसंघासाठी आज मतदान पार पडले.

यामध्ये मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण, मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघात मतदान झाले.


मात्र, अनेक मतदान केंद्रावर संथगतीने मतदान पार पडल्यामुळे मतदारांची मतदान केंद्रावर मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, आज महाराष्ट्रातील पाचही टप्प्यांतील मतदान पार पडले. या निवडणुकीसाठी अनेक राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

## वाशीम जिल्ह्याला वादळी पावसाचा तडाखा; झाडांची पडझड, अनेक घरांचे नुकसान

**वाशीम/प्रतिनिधी**

हवामान विभागाने वाशीम जिल्ह्यात वादळी पावसाचा व्यक्त केलेला अंदाज खरा ठरला. आज दुपारनंतर वादळी वारा व पावसाने जिल्ह्याला झोडपले. यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली तर काही ठिकाणी घरांचेही नुकसान झाले.

जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी दुपारनंतर सुसाट वादळी वारा सुटला. मंगरुळपीर, वाशीम व इतर ठिकाणी पावसाने हजेरी लावली. यामुळे वाशीम तालुक्यातील सुरळा, कळंबा महालीसह काही गावांत घरांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. मालेगाव तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे झाडांची तसेच घरांच्या भिंतींची पडझड झाली. वाशीम शहरात झालेल्या अवकाळी पावसामुळे बाजार समितीतील शेतमाल भिजला. अचानक आलेल्या पावसामुळे इतर ठिकाणीदेखील नुकसान झाले.



**वीज पुरवठा खंडित**

गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस होत आहे. कधी विजांचा कडकडाट तर कधी वादळी वारा, अशी स्थिती आहे. या दरम्यान अल्पसा पाऊस असो वा वादळ वारा, वीज पुरवठा खंडित केला जातो. काही गावांत तर एकदा वीज गेली की कधी येईल, याची कुठलीच शास्वती नसते. यामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## खासगी बालवाड्या अद्याप नियमाविना झाले काय?

**पुणे/प्रतिनिधी**



शहरांत गल्लोगल्ली सुरू असलेल्या खासगी बालवाड्यांसाठीची नियमावली राज्य शासनाच्या स्तरावर अजूनही निश्चित झालेली नाही. खासगी बालवाड्यांवर नियंत्रण कोणत्या विभागाने ठेवायचे, याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर संभ्रम असून, याबाबतचे धोरण निश्चित झाल्यावरच खासगी बालवाड्या सरकारच्या नियंत्रणाखाली येणार आहेत.

आतापर्यंत तीन ते सहा वर्षे वयोगटासाठीचे पूर्वप्राथमिक शिक्षण औपचारिक शिक्षणाचा भाग नव्हते. त्यामुळे शासकीय अंगणवाड्या वगळता खासगी अंगणवाड्या, नर्सरी यांच्यावर कोणाचाही अंकुश नव्हता. खासगी बालवाडी कोणालाही सुरू करता येत होती. त्यामुळे गल्लोगल्ली बालवाड्या, नर्सरी सुरू झाल्या. त्यातून खासगी बालवाड्यांमध्ये स्पर्धाही निर्माण झाली. अव्वाच्या सव्वा शुल्क आकारले जाऊ लागले.

मात्र, 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'मध्ये तीन ते सहा या वयोगटासाठीची तीन वर्षे पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी देण्यात आली आहेत. त्यामुळे या खासगी बालवाड्या आता औपचारिक शिक्षणाचा भाग होणार आहेत. परिणामी, खासगी शाळांप्रमाणे खासगी बालवाडी, नर्सरी यांच्यासाठीही नियमावली तयार केली जाणार आहे.

शिक्षण विभागाने काही महिन्यांपूर्वी नियमावलीचा मसुदा तयार करून शासनाला सादर केला आहे. या नियमावलीचे विधेयकात रूपांतर करून ते विधानसभेत मंजूर करावे लागणार आहे. खासगी बालवाड्यांसाठीच्या नियमांमध्ये मान्यता प्रक्रिया, विद्यार्थी संख्या, सुरक्षा मानके, सुविधा, शुल्क, बालवाड्यांची वेळ, कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता अशा घटकांचा समावेश असेल.

मात्र, राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभाग, शालेय शिक्षण विभाग, एकात्मिक बालविकास सेवा या तीन विभागांपैकी कोणत्या विभागाच्या अखत्यारित खासगी बालवाड्यांचा समावेश करायचा याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## विविध कारणांमुळे मतदान प्रक्रियेत अडथळा

**मुंबई/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील मतदानाला मुंबईतील सहा मतदारसंघांत सोमवारी सकाळपासून सुरुवात झाली असून सकाळपासूनच विविध मतदान केंद्रांवर मतदानासाठी मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मात्र अनेक ठिकाणी मतदान यंत्रांमध्ये झालेला बिघाड, मोठ्या संख्येने मतदार मतदानासाठी आल्यामुळे लागलेल्या लांबच लांब रांगा, मतदारयादीतील घोळ, तर कुठे खंडित झालेला वीजपुरवठा अशा विविध कारणांमुळे मतदान प्रक्रियेत अडथळे आले.

मानखुर्द येथील बूथ क्रमांक ६३ आणि ६५ वरील मतदान यंत्रात बिघाड झाल्याने काही काळ मतदान प्रक्रिया थांबली होती. मतदान यंत्र तातडीने बदलण्यात आल्यानंतर पुन्हा एकदा मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू झाली. मुलुंड येथील बूथ क्रमांक १२६ वरील मतदान यंत्रातही बिघाड झाला होता, मात्र तत्काळ दुरुस्ती केल्यानंतर तेथील मतदान प्रक्रिया सुरळीत झाल्याचे निवडणूक यंत्रणेने स्पष्ट केले. भांडुप खिंडीपाडा परिसरातील मतदान केंद्रावरील विद्युतपुरवठा खंडीत झाल्याने मतदान प्रक्रिया ठप्प झाली. अर्ध्या तासाहून अधिक काळ वीजपुरवठा खंडित राहिल्याने मतदान बंद पडले होते.

घाटकोपर पश्चिम येथील भटवाडी, बर्वेनगर, पारशीवाडी, चिरागनगर, माणिकलाल मैदान, जागृती नगर, श्रेयस दामोदर पार्क, अग्निशामक दल पार्कसाईट आणि विक्रोळी पार्कसाईट येथील मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दुपारी उन्हाचा तडाखा वाढल्यानंतरही मतदान केंद्रांवर अशीच परिस्थिती होती.

## चप्पल, बूट विकणाऱ्याकडे पैशांचे घबाड

### प्राप्तिकर विभागाने जप्त केली तब्बल ४० कोटींची रोकड!



**लखनौ/प्रतिनिधी**

सध्या देशभरात निवडणुकीचे वातावरण आहे. या निवडणुकीच्या काळात सध्या देशात अनेक ठिकाणी कोट्यधींची रोख रक्कम सापडलेली आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशमधील आग्रा या शहरात एका चपलेच्या व्यावसाय असणाऱ्या व्यक्तींकडे तब्बल ४० कोटींची रोकड सापडली आहे. प्राप्तिकर विभागाने कारवाई केल्यानंतर ही कोट्यवधींची रक्कम संबंधित व्यक्तीकडून जप्त करण्यात आली आहे. प्राप्तिकर विभागाच्या या कारवाईनंतर आग्र्यात सध्या मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेशमधील एका व्यक्तीचा चप्पल, बुटाचा व्यवसाय आहे. प्राप्तिकर विभागाने याच व्यक्तीशी संबंधित असलेल्या ठिकाणांवर छापेमारी केली. शनिवारी (१८ मे) दुपारी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत प्राप्तिकर विभागाला एकूण ४० कोटी रुपये रोख स्वरुपात सापडले आहेत. या व्यावसायिकाकडून जप्त करण्यात आलेल्या या पैशांची मोजणी अजूनही चालूच आहे. त्यामुळे आगामी काळात जप्त करण्यात आलेली ही रक्कम वाढण्याची शक्यता आहे.

आयटी विभागाने केलेल्या या कारवाईत फक्त ५०० रुपयांच्याच नोटा दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार प्राप्तिकर विभागाला या व्यावसायिकाकडून कर चुकवला जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीनंतर आयटी विभागाने या व्यापाऱ्याच्या घरावर तसेच इतर मालमत्तांवर छापेमारी केली. या छापेमारीत आतापर्यंत ४० कोटी रुपयांची रोकड मिळाली आहे. अजूनही आयटी विभागाचे अधिकारी जप्त केलेली रक्कम मोजत आहेत. त्यामुळे हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## रेल्वेच्या मालवाहतुकीतही अदानींचा शिरकाव, नागपूरजवळ 'कार्गो टर्मिनल'

**नागपूर/प्रतिनिधी**

**विविध क्षेत्रात आपले प्रस्थ निर्माण करणाऱ्या अदानी समुहाने आता रेल्वेच्या मालवाहतूक क्षेत्रातही शिरकाव केला आहे. भौगोलिकदृष्ट्या देशाच्या मध्यभागी असलेल्या नागपूर शहराजवळील बोरखेडी येथे अदानी समूहाचे 'कार्गो टर्मिनल' विकसित करण्यात येणार आहे. त्याकरिता मध्य रेल्वे आणि अदानी समूह यांच्यात करार झाला आहे.**

कंटेनर वाहतूक हाताळण्यासाठी बोरखेडी येथे कार्गो टर्मिनल विकसित करण्याबाबत मध्य रेल्वे आणि अदानी समूहात करार झाला आहे. जीसीटी लॉजिस्टिक व्यवसाय वाढवेल आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्यासाठी अधिक महसूल निर्माण करेल.

**–अमन मित्तल, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे**

----------------------------------------

हे टर्मिनल अद्यायावत झाल्याने कार्यक्षमता वाढेल. येथे मे महिन्यात ३० (रेक) आणि जूनमध्ये ३५ मालगाड्यांची पूर्ण क्षमतेने मालवाहतूक केली जाणे अपेक्षित आहे. तसेच येत्या काही महिन्यांत त्यात आणखी वाढ होईल.

**–निवृत्ती बच्छाव, टर्मिनल प्रमुख, अदानी लॉजिस्टिक, बोरखेडी**

उद्योगातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी रेल्वेने 'गतीशक्ती मल्टी-मॉडल कार्गो टर्मिनल (जीसीटी)' धोरण आखले आहे. त्यानुसार खासगी कंपन्यांना रेल्वेच्या जागेवर 'जीसीटी' विकसित करण्याची मुभा दिली जाते. नागपूर येथे कंटेनर वाहतूक हाताळण्यासाठी 'मेसर्स अदानी लॉजिस्टिक लिमिटेड' कार्गो टर्मिनल विकसित करणार आहे.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने यासंदर्भातील करारावर स्वाक्षरी केली. विभागातील हे चौथे गतीशक्ती कार्गो टर्मिनल (जीसीटी) आहे. यापूर्वी एमपी बिर्ला सिमेंट, मुकुटबन, नागपूर एमएमएलपी, सिंदी आणि जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड, कळमेश्वर असे तीन जीसीटी विकसित करण्यात आले आहेत.

भारतीय रेल्वेने १०० गतीशक्ती टर्मिनल्स विकसित करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सध्या सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वानुसार वेगवेगळ्या राज्यांत ६० टर्मिनल्स आधीच कार्यरत आहेत आणि उर्वरित ४ मार्च २०२५ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

पश्चिम बंगालमध्ये आसनसोल रेल्वे विभागाने देशातील पहिल्या टर्मिनलचे काम सुरू केले होते. 'जीसीटी' धोरण भारतीय रेल्वेमध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यास मदत करते. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होतात, असा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे.

बोरखोडीचा कार्गो टर्मिनल याला रेल्वेचे दोन मार्ग उपलब्ध असणार आहे आणि हा टर्मिनल १०० एकर परिसरात असेल. यातून खासगी कंपन्यांच्या मालाची ने-आण केली जाईल. यामुळे रेल्वे तसेच अदानी समुह यांना फायदा तर होईलच शिवाय टर्मिनलच्या माध्यमातून विदर्भ आणि संपूर्ण देशात मालवाहतूक करणे सोयीचे होईल, असा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे.



# इराणचे काय होणार?

रशिया आणि युक्रेन युद्धानंतर इराण व इस्त्राईल यांच्यातील संघर्षाने सारे जग तणावाखाली आहे. आखाती देशांमील युद्ध जगाला परवडत नाही. इराण व इस्त्राईल या दोन देशांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून संघर्ष सुरू आहे. त्यात पुन्हा पेटलेल्या आगीत तेल ओतले गेले आहे, ते म्हणजे इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी आणि त्या देशाचे परराष्ट्रमंत्री होसेन अमीर-अब्दोल्लाहियान यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर अझरबैजानमध्ये कोसळले. खराब हवामानामुळे ते बेपत्ता झाल्याचे कारण असले तरी यामागे घातपात असण्याचा संशश इराणकडून व्यक्त झाला तर त्या देशाकडून इस्त्राईल व गाझापट्टीवर हल्ले वाढतील आणि युद्धाचा भडकाही अजून वाढेल, असे जाणकारांना वाटते. रईसी यांचा अपघातात मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. कट्टरपंथीय असलेले धर्मगुरू रायसी यांनी जिथे जन्म घेतला, तो परिसर मशहद शहर. खरे तर हा प्रदेश इराणच्या १९७९ च्या इस्लामिक क्रांतीने प्रभावित झालेला होता. या शहरात शिया मुस्लिमांसाठी सर्वात पवित्र मानली जाणारी मशीद देखील आहे. विद्यार्थीदशेत त्यांनी मोहम्मद रझा शाह यांच्या विरोधात पाश्चात्य देशांनी पाठिंबा दिलेल्या निदर्शनांमध्ये भाग घेतला. पुढे अयातुल्ला रुहोल्लाह खोमेनी यांनी १९७९ मध्ये इस्लामिक क्रांतीद्वारे शाह यांना सत्तेवरून हटवले. २०१४ मध्ये ते इराणचे प्रॉसिक्युटर जनरल झाले. इराणच्या न्यायव्यवस्थेचे प्रमुख असलेल्या रईसी यांचे राजकिय विचार 'अत्यंत कट्टरपंथी' मानले जातात. ते इराणचे कट्टरतावादी नेते आणि देशाचे सर्वोच्च धार्मिक नेते अयातुल्ला अली खोमेनी यांच्या जवळचे मानले जातात. न्यायपालिकेचे प्रमुख असताना त्यांनी राजकीयदृष्ट्या प्रेरित होऊन अनेक आरोपींना फाशी आणि अन्यायकारक तुरुंगवास दिल्याचा आरोप मानवाधिकार संघटनांनी केला होता. जून २०२१ मध्ये उदारमतवादी हसन रुहानी यांच्या जागी ते इराणच्या इस्लामिक



रिपब्लिकचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. २०१९ मध्ये ते इराणचे अध्यक्ष होण्यापूर्वी अमेरिकेने इराणचे सर्वोच्च नेते अली होसेनी खोमेनी यांची राजकीय नियुक्ती केल्याबद्दल यांच्यावर निर्बंध लादले. रायसी रायसी २०२१ मध्ये ६३ वर्षीय इराणचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्यांच्या कार्यकाळात इराणने सर्वात सरकारविरोधी निषेध आणि गंभीर आर्थिक मंदी अनुभवली आहे. त्यांच्या कार्यकाळात इराण आणि इस्रायलमधील तणावही उच्चांकावर पोहोचला होता. २०२१ च्या अध्यक्षीय निवडणुकीत त्यांनी तुलनेने कमी ताकदवान नेते, त्यांचे पूर्ववर्ती हसन रुहानी यांचा पराभव केला. या निकालाने निर्णायक राजकीय शक्ती आणि नेतृत्व पुन्हा कट्टरपंथीयांच्या हाती गेले. रईसी यांना वेगळे बनवणारी गोष्ट म्हणजे रुहानी यांच्या सरकारने युनायटेड स्टेट्ससह जागतिक शक्तींबरोबर २०१५ च्या अणु करारावर स्वाक्षरी केली असताना रईसी यांनी पाश्चिमात्य आणि विशेषत: अमेरिकेशी केलेल्या या कराराचा निषेध केला. मोठ्या महामारी, अशांतता, आर्थिक निर्बंध आणि सरकारविरोधी निदर्शने यांचा सामना करणाऱ्या देशाचा वारसाही रायसी यांना मिळाला. जेव्हा एका २२ वर्षीय इराणी महिलेचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला, तेव्हा काही गोष्टी उघड झाल्या.सप्टेंबर २०२२ मध्ये महसा अमिनीच्या मृत्यूमुळे अनेक इराणी महिलांनी देशाच्या कठोर हिजाब कायद्याच्या विरोधात उभे राहून देशव्यापी निषेध नोंदवला होता. १९७९ मध्ये सरकार स्थापन झाल्यापासून इराणी राजवटीसमोरील सर्वात गंभीर आव्हान म्हणून हिजाबविरोधी निदर्शने करण्यात आली होती. महिला आणि तरुणांच्या नेतृत्वाखाली हजारो इराणी लोक दडपशाही विरोधात असंतोष व्यक्त करण्यासाठी एकत्र आले. इराणी सुरक्षा दलांनी शेकडो विरोधकांना केवळ निर्दयीपणे फक्त ठार केलेच नाही, तर अनेकांना अटकही केली. एवढेच नाही तर देशाची न्यायव्यवस्था अजूनही आंदोलनात सहभागी झालेल्यांना फाशीचे आदेश जारी करीत आहे. म्हणूनच हेलिकॉप्टर अपघाताच्या बातम्या जेव्हा मथळे होऊ लागल्या, तेव्हा अनेक इराणी विरोधकांनी या बातमीचा आनंद साजरा केला. रईसी यांच्या कार्यकाळात इराणचे इस्रायलशी आधीच असलेले संघर्षपूर्ण संबंध अत्यंत रसातळाला गेले. इस्त्राईल-हमास युद्धाने आगीत आणखी भर टाकली आणि इराणचा पाठिंबा असलेल्या अनेक दहशतवादी गटांनी हमाससह इस्त्राईलवर हल्ले सुरू केले. अनेकांचा अशी भीती आहे की, या प्राणघातक अपघातामुळे त्यांचा मृत्यू झालेला असावा. रईसी मृत्युमुखी पडल्यानंतर इराणचे काय होणार असा प्रश्न आता विचारला जात आहे.


## राजकीय

# शुद्धीकरणासाठी दासबोध आठवावा!

महाराष्ट्राचे राजकारण म्हटले की, सर्वात प्रथम डोळ्यांसमोर येते ती छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा! ज्याला स्वराज्य कळले, ज्याला रयत कळली आणि ज्याला रयतेने राजा म्हणून स्वीकारला असे एकमेव शिवछत्रपती. आज राजकारणात शिवरायांचे नाव घेतल्याशिवाय कुणाचेही पान हलत नाही, पण त्यातील किती नेते शिवाजी महाराजांसारखे राजकारण करतात? महाराजांचे नाव घेणाऱ्या किती राजकीय नेत्यांनी शिवरायांचे राजकीय गुण आत्मसात केलेत? समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात राजकारण कसे असावे, यावर एक समास लिहिला आहे.

**राजकारण बहुत करावे! परंतु कळोंच नेदावे!**
**परपींडेवरी नसावे! अंत:करण!**

असे समर्थ सांगतात. यातून बोध घेतला तरी आजचे राजकारण बऱ्यापैकी शुद्ध होईल. ज्या राजाचा जगात आदर केला जातो, त्या राजाचे नाव घेऊन आपण नीच पातळीचे राजकारण करत असू तर आपल्याला राजाचे नाव घेण्याचा अधिकार तरी आहे का, याचा विचार राजकारणातील लोकांनी करायला हवा!



लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि महाराष्ट्रातील शेवटच्या टप्प्यातील मतदानानंतर राज्यातील दूषित झालेले राजकारण थोडेफार स्वच्छ होईल, अशी अपेक्षा बाळगूया! या निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील किंबहुना देशातील राजकारण अत्यंत घाणेरड्या पद्धतीने ढवळून निघाले आहे. संयम नावाचा प्रकार शोधूनही कुठे सापडत नव्हता. नुसते आरोप, आव्हाने, हिंमत, डिवचणे, चिथावणी देणे या पलीकडे फारसे काही घडले नाही. नुसत्या सभा घेऊन, रॅली काढून आणि भाषणबाजी करून समोरचा किती वाईट, नालायक, अयोग्य हेच सांगण्यात सगळे धन्यता मानत होते. हे सर्व सांगण्याचे कारण महाराष्ट्रात आपण उठता-बसता छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो. शिवछत्रपतींचा महाराष्ट्र असे सगळीकडे आपण अभिमानाने म्हणतो मग शिवछत्रपतींनी केलेले राजकारण आपण करतो का, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर कुणीही कुणाकडे मागण्याची गरज नाही. कारण हा प्रश्न प्रत्येक राजकिय पक्षाने आणि नेत्यांनी स्वत:ला विचारावा आणि स्वत:लाच उत्तर द्यावे. त्यांना वाटले आपण योग्य दिशेने आहोत, तर पुढे जावे आणि चुकत असू याची जाणीव असेल तर चूक सुधारावी, एवढीच अपेक्षा आहे.

२०१९ पासून राज्यातील राजकारणाला वेगळीच दिशा मिळालेली आहे. खरेतर दिशा मिळाली आहे, असे म्हणणे किती योग्य, हेही अभ्यासावे लागेल. तेव्हापासून काय घडले हे प्रत्येकाने पाहिले आहे, त्याचा अभ्यासही केला आहे. एवढेच कशाला तर त्यानंतर आपण कोणती भूमिका घ्यायची याचा प्रत्येक मतदाराने विचारही केला आहे. आदर्श राजकारण कसे करावे, हे शिवछत्रपतींनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले आहे. मग महाराष्ट्रात आणि देशात तसे काही घडते आहे का? तेवढे आदर्श राजकारण कुणी करत आहे का? असे सवाल आज उपस्थित होत आहेत. ज्यांना जाणता राजा, रयतेचा राजा म्हटले जाते. त्यांच्यासारखा डोळस कारभार आज कुणी करतो आहे का, या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने शोधायचे आहे. समर्थ रामदास स्वामी यांनी राजकारण या विषयावर दासबोधामध्ये स्वतंत्र विवरण दिले आहे. म्हणजे दासबोधातील दशक अकरावा भीमदशक यामध्ये समास पाचवा 'राजकारणनिरुपणनाम' आहे. यावर नुसती नजर टाकली तरी कळते राजा कसा असावा आणि राजकारण कसे असावे! यात समर्थ लिहितात,

**जो बहुतांचे सोसीना! त्यास बहुत लोक मिळेना!**
**बहुत सोसिता उरेना! महत्त्व आपुले!**

म्हणजेच जो सामान्यांच्या आनंदात आणि दुःखात स्वत:ला सहभागी करून घेतो



त्याच्या कार्यात अनेकांचे हातभार अगदी सहज लागतात. त्याचवेळी समर्थांनी इशारा देखील दिला आहे. सर्वांचे सगळेच सोसले म्हणजे लोकांना खूप चुचकारले तर लोक आपल्याला गृहित धरतात आणि आपले महत्त्व उरत नाही. लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होताना त्यांचे दुःख कवटाळून बसू नये कारण आपण एकाचे नाहीत तर समाजाचे आहोत, याचे इथे भान ठेवले पाहिजे, याची जाणीव समर्थ रामदास स्वामी करून देतात. यानंतर समर्थ रामदास स्वामी यांनी राजकीय लोकांचे कानदेखील टोचले आहेत. ते कसे पाहा,

**राजकारण बहुत करावे! परंतु कळोंच नेदावे!**
**परपींडेवरी नसावे! अंत:करण!** याचा अर्थ जनहितासाठी राजकारण करावे लागते, त्यासाठी अंगात मुत्सद्दीपणा असावा लागतो, मात्र राजकारण कुणाला कळणार नाही इतक्या गुप्तपणे करावे. त्यातही समर्थांनी मेख मारून ठेवली आहे. राजकारण करत असताना दुसऱ्याला त्रास होईल, असा विचारदेखील अंतःकरणात आणू नये. समर्थ रामदास स्वामींनी केलेले राजकीय निरुपण आणि आजचे राजकारण यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. दुसऱ्याला त्रास होईल असे राजकारण नको, असे समर्थ म्हणतात, 'पण आज हे वास्तवात आहे का? याचे उत्तर कुणीही कुणाकडे मागायचे नाही, कारण याचे उत्तर राजकारण करणाऱ्यांकडे आहे. त्यांनी स्वत:कडे कबुली द्यावी की आपण करतो ते राजकारण चांगल्या दर्जाचे आहे की हीन दर्जाचे? दुसऱ्याला फसवताना चेहऱ्यावर कितीही साळसूदपणाचा आव आणला तरी खरे कोण कुणाची फसवणूक करते, हे लपून राहात नाही. कारण आपण मनाला फसवू शकत नाही. त्यामुळे राजकारण करताना कोणते भान राखले पाहिजे, याची जाणीवच समर्थांनी करून दिली आहे.'

देश पारतंत्र्यात असतानाचे राजकारण वेगळे होते. आता देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली आहेत. आपण सगळेच देशाचे नागरिक आहोत, सर्वांनाच देशाचा विकास करायचा आहे, सर्वांनाच भारताची प्रतिमा मोठी करायची आहे. प्रत्येकाला वाटते आपला देश सुखी असावा. फक्त प्रत्येकाचे प्राधान्यक्रम वेगळे आहेत, त्यासाठी संकल्पना वेगळ्या आहेत. मग प्रचारात कटुता का येते, एकमेकांवर अत्यंत खालच्या दर्जाची टीका का केली जाते, मीच चांगला इतर वाईट, असे दाखवण्याचा प्रयत्न का केला जातो? याचा अर्थ आपण नुसते शिवछत्रपतींचे नाव घेत असलो तरी आपल्यात शिवरायांसारखे नेतृत्वगुण नाहीत. अन्यथा समोरचा खालच्या पातळीवर गेला तर आपण आपली पातळी खाली आणायची नसते, याची जाणीव झाली असती, पण तसे करताना कुणी दिसत नाही, इथे खाली जाण्याची स्पर्धाच लागलेली दिसते. याच्याच पुढे समर्थ राजकारणात आणखी एक महत्त्वाची सूचना करताना दिसतात,

**लोक पारखून सांडावे! राजकारणे अभिमान झाडावे! पुन्हा मेळवून घ्यावे! दुरील दोरे!** म्हणजे लोक, सहकारी निवडताना त्यांची पारख करावी. जे चांगले आहेत त्यांना सोबत घ्यावे आणि इतरांना न दुखवता सहज बाजूला करावे. त्याचवेळी राजकारण करताना अभिमान, अहंकार नसावा, तसेच चातुर्याचे राजकारण करून समोरच्या व्यक्तीचा अभिमान आणि अहंकार निपटून काढता आला पाहिजे, याची शिकवण समर्थ देतात. हे करत असताना त्या माणसांना पुन्हा तिऱ्हाईतामार्फत आपल्या कार्यात सहभागी करून घ्यावे, असे समर्थ सांगतात. राजाचा जगात आदर केला जातो, त्या राजाचे नाव घेऊन आपण नीच पातळीचे राजकारण करत असू तर आपल्याला राजाचे नाव घेण्याचा अधिकार तरी आहे का, याचा विचार राजकारणात वावरणाऱ्या लोकांनी करायला हवा!

**- अविनाश चंदने.**

## टुडेज् ब्लॉग

# सन्मानाचे अजून काही उपाय?

पाकिस्तान हा भारताचा शेजारी आहे. एका अर्थाने भारताचा लहान भाऊ. पण सध्याच्या घटकेला पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. महागाई ३३ टक्क्यांनी वाढत आहे. जनता महागाई, बेरोजगारी इत्यादीने त्रस्त आहे. पाकिस्तानात सर्वत्र अराजकता पसरलेली आहे. दुसरीकडे भारताची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाच्या दिशेने वाटचाल करत आहे. देशाची झपाट्याने प्रगती होत आहे. पण आपल्या लहान भावाची मदत करणे सोडून भारत त्याच्या छताडावर बंदूक रोखून उभा आहे.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये अराजकता माजवत आहे. पाकिस्तानात सर्जिकल स्ट्राइक करत आहे. अज्ञात व्यक्ती तिथल्या प्रसिद्ध शांतीपूर्ण लोकांची हत्या करत आहे. भारताचे पाकिस्तानसोबत असे वागणे निश्चितच उचित नाही. या परिस्थितीवर भारताच्या एका प्रसिद्ध अहिंसावादी नेता मणिशंकर यांनी विधान केले, हे असेच चालू राहिले तर तिथल्या पागल लोकांचे माथे भडकतील. त्यांच्याजवळ अणुबॉम्ब आहे. त्यांना तो बॉम्ब भारतावर फोडायला वेळ लागणार नाही. जर त्यांनी लाहोरमध्ये फोडला तरी अमृतसर नष्ट होणार. आपल्या देशाचे किती नुकसान होईल याची कल्पना करा. हा विनाश थांबवायला असेल तर आपल्याला पाकिस्तानचा सन्मान केला पाहिजे. आता प्रश्न येतो. पाकिस्तानचा सन्मान कोणत्या रीतीने केला पाहिजे जेणे करून तो भारतावर अणुबॉम्ब टाकणार नाही. पाकिस्तानची भारताकडून काय अपेक्षा आहे यावर विचार करून काही उपाय शोधले.





१. भारताने पाकिस्तानसोबत वार्ता पुन्हा सुरू करावी. २. पाकिस्तानची सीमा पुन्हा खुली करून व्यापार सुरू करावा. ३. ज्याप्रमाणे भारत आपल्या ८० कोटी लोकांना राशन फ्री देतो तसेच पाकिस्तानच्या जनतेलाही देण्यासाठी काही कोटी टन गहू, तांदूळ आणि साखर उपहार स्वरूप पाकिस्तानला द्यावे. ४. भारताने पाकिस्तानात शांतीपूर्ण लोकांची हत्या करणे त्वरित बंद करावे. ५. भारतातील जेलांमध्ये बंद पाकिस्तानच्या शांतीपूर्ण नागरिकांची सुटका करून त्यांना पाकिस्तानात परत पाठविले पाहिजे. ६. पाकिस्तानमधून शांततेचा संदेश घेऊन भारतात येण्याचा प्रयत्न करणाऱ्या शांतीपूर्ण पाकि नागरिकांची हत्या करणाऱ्या सुरक्षा दलांच्या जवानांवर हत्येचे केसेस दाखल करून त्यांना दंड दिला पाहिजे. बहुतेक पूर्वी असे होत होते. त्यावेळी काश्मीर घाटीतील भारतीय सुरक्षा दलांत एक म्हण प्रचलित झाली होती. 'मर गये तो पेन्शन, बच गये तो टेंशन.' ६. नद्यांवर बांधलेले बंधारे तोडून सर्व पाची नद्यांचे संपूर्ण पाणी पाकिस्तानला दिले पाहिजे. जेणेकरून तिथल्या शेतकऱ्यांना भरपूर पाणी मिळेल. अन्न उत्पादन वाढल्याने तिथली महागाई दूर होईल. तिथल्या जनतेला स्वस्त अन्नधान्य मिळेल. ७ सर्वात शेवटी काश्मीरचा भाग अत्यंत आनंदाने पाकिस्तानला सोपविला पाहिजे. असे केले की पाकिस्तान अत्यंत प्रसन्न होईल आणि भारतावर अणुबॉम्ब फोडणार नाही.

जोपर्यंत मोदीजींची सत्ता भारतात आहे, तोपर्यंत पाकिस्तानचा सन्मान होणे शक्य नाही. कारण आजच्या अशिक्षित सत्ताधीशांना विदेश नीतीचे ज्ञानच नाही. आपल्या शेजाऱ्याला कसे प्रसन्न ठेवावे हेच कळत नाही. येत्या जून ४ नंतर मोदीजी पुन्हा सत्तेत आले तर पाकिस्तानात अराजकता माजवून पीओके घेण्याचा प्रयत्न भारत करू शकतो. अशा परिस्थितीत निराश होऊन पाकिस्तानी सैन्य भारतावर अणुबॉम्ब फोडू शकतो. येत्या निवडणुकीत पाकिस्तानचा सन्मान करण्याचा इरादा ठेवणाऱ्यांना मत दिले तर भारतावर अणुबॉम्ब पडणार नाही. पाकिस्तानचा सन्मान करण्याचे आणिक काही उत्तम उपाय असतील तर ते प्रतिसादात सांगावे ही अपेक्षा. असो.

**- विवेक पटाईत.**

## जन्म हा अखेरचा

### भावप्रकाशस्थल



मनाला काही ऐकण्याची इच्छा झाली की कर्णेंद्रिय सतर्क होते आणि मनाचा शब्दाशी संबंध जोडून देते. इंद्रियांच्या द्वारेच मन बाहेर फाकते आणि सुख-दुःख भोगते. इंद्रियांची दारे बंद केली तर मन अंतर्मुख होते आणि त्याला अंतरंगातील आनंदसागर सापडतो. म्हणून शिवयोगी सदैव अंतर्मुख असतो. परंतु त्याची भावना शिवमय झाल्यामुळे तो बहिर्मुख झाला तरी त्याला सर्वत्र शिवच दिसत असतो.

**अद्वितीय शिवाकार भावनाध्वस्त कर्मणा।**
**न किंचिद्भाव्यते साक्षात् शिवादन्यन्महात्मना ।। १९.८६।।**

परशिवासारखी अत्युत्कृष्ट अशी दुसरी वस्तू प्रपंचात नाही. म्हणून शिव अद्वितीय आहे. अशा अद्वितीय शिवाशी शिवयोगी समरस झालेला असतो. त्यामुळे त्याची सर्व कर्मबंधने ध्वस्त झालेली असतात आणि तो शिवाशिवाय अन्य कशाचीही भावना करीत नाही.

**गलिताज्ञानबंधस्य केवलात्मानुभाविनः। यत्र यत्रेन्द्रियासक्तिस्तत्र तत्र शिवात्मता ।।१९.८७।।**

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### 'शोर्मा' ठरतोय जीवघेणा !

गेल्या काही वर्षांत जंक फूड किंवा फास्ट फूड यांविषयीची आवड लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे. यामध्ये तरुण वर्गाचे प्रमाण लक्षणीय आहे. शाळकरी मुलांमध्येही हल्ली जंक फूडची विशेष क्रेज दिसून येते. लोकांची वाढती आवड लक्षात घेऊन शहरासारख्या ठिकाणी प्रमुख मार्गांसह, बाजारपेठा, रेल्वे-बसस्थानके, शाळा महाविद्यालये यासारख्या ठिकाणी जंक फूडचे स्टॉल्स मोठ्या प्रमाणात उभारले जाऊ लागले आहेत. या जंकफूडपैकीच एक असलेला 'शोर्मा' नावाचा मांसाहारी पदार्थ आजमितीला अनेकांच्या आवडीचा डिश बनला आहे. अनेकजण तो घरी बनवण्याचाही प्रयत्न करताना दिसतात; मात्र रस्त्याच्या कडेला मिळणाऱ्या या पदार्थाची चव घरी बनवल्या जाणाऱ्या शोर्माला



येत नाही, असे मत खाद्य पदार्थाचे शौकीन व्यक्त करतात. तरुणांच्या जिभेचे चोचले पुरवणारा हाच शोर्मा आज अनेकांचे आरोग्य बिघडवणारा आणि काहींचे तर प्राण घेणारा ठरू लागला आहे. त्यामुळे कोणी जर हा रस्त्यालगतचा शोर्मा खात असेल तर त्यांनी सावध व्हायला हवे.

मांसापासून बनवलेले पदार्थ उघड्यावर विकणे बेकायदेशीर असतानाही आज या नियमांची ठिकठिकाणी सर्रास पायमल्ली होताना दिसत आहे.

२०२२ मध्ये केरळच्या कासारगोड येथे शोर्मा खाल्यामुळे ५८ जणांना विषबाधा झाली होती. त्यापैकी एका लहान मुलीचा दुर्दैवी अंत झाला होता. या शोर्माचे नमुने तपासले असता त्यामध्ये बुरशी तयार झाल्याचे लक्षात आले. या बुरशीमुळेच खाणाऱ्यांना विषबाधा झाली होती. ही घटना घडल्यानंतर तामिळनाडूचे आरोग्यमंत्री सुब्रह्मण्यम् यांनी लोकांना शोर्मा न खाण्याचे आवाहन केले होते; मात्र लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

आज देशभरात हा शोर्मा शहरांसोबत ग्रामीण भागांतही विकला जाऊ लागला आहे. शोर्मा हे मध्यपूर्व भागातील लोकप्रिय स्ट्रीट फूड आहे. या पदार्थाचा शोध तुर्कीमध्ये लागल्याचे मानले जाते. ओटोमन साम्राज्यादरम्यान अरब प्रदेशातील लेव्हंट प्रदेशात पहिल्यांदा शोर्मा तयार केल्याचेही मानले जाते, पारंपारिकरित्या हा पदार्थ कोकराच्या मांसापासून तयार करण्यात येत होता. कालांतराने चिकन, टर्की, गोमांस किंवा वासराचे मांस वापरण्यात येऊ लागले.

भारतात विकला जाणारा शोर्मा चिकनपासून बनवला जातो असे मानले जात असले तरी यामध्ये कोणते मांस वापरले जाते याबाबत कुठेही खात्री केली जात नाही. काही दिवसांपूर्वी चिकन मोमोजमध्ये कुत्र्याचे मांस वापरण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे रस्त्यालगत मिळणाऱ्या शोर्मासाठी वापरण्यात येणाऱ्या मांसामध्येही अशा प्रकारची भेसळ केली जात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

# परमछाया

अश्मयुगीन किंवा त्याहीपेक्षा अतिप्राचीन काळापासून मनुष्य जन्माचं कोडं अघटित, अचंबित करणारं आहे. शेपूट असणाऱ्या पायापासून ते पुढे दोन हातपाय या आमूलाग्र बदलामधला मनुष्य जन्माचा काळ, जीवनमान खडतर तरीही, सुसह्य होतं यात काडीमात्र शंका नाही. एकट्यानं जीवन जगणारा मानव पुढं कळपात राहू लागला. कंदमुळं, फलाहार, शाकाहार आणि मांसाहार भक्षण करताना, ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक गोष्टींपासून आपलं रक्षण कसं होईल यादृष्टीनं विचार करू लागला. जंगल वासातल्या त्याच्या धडपडीला पूर्णतः प्राप्त झालं ते पृथ्वी, आप, वायू, जल या शक्तिला आमंत्रित केलं गेलं तेव्हा तारणहार, अतुलनीय, अज्ञात, अचंबित शक्ति आपल्या आसपास असल्याचं त्याला जाणवलं होतं. त्या शक्तिचं प्राबल्य जाणूनचं पुढच्या काळात अदृश्य शक्तितील ईशाला आपल्या प्रबळ इच्छा पूर्ततेसाठी आवाहन केलं गेलं. या गोष्टी अलौकिक होत्या. तद्वत: निसर्गात अशा चमत्कारिक अद्वितीय शक्ति असल्याचा दावा काही तज्ज्ञ जाणकारांनी या आधी केला होता. हे शाश्वत सत्य आहे की, अदृश्य शक्तितील परमेश्वर आपण पाहू तसा दिसतो.

पंचतत्त्वातील त्याचं असणं, आपल्या जीवनचक्राला गती देणं यातून सहज लक्षात येतं. मनुष्य जन्माचा इतिहास उलगडताना मनुष्य योनीतला जन्म भाग्यवंतांनाच प्राप्त होतो. ही सत्यता पटवताना संतांची वचने मनुष्य धर्माचे, कर्तव्याचे, जन्माचे सार सांगतात. जन्म एकदा मिळतो, त्यायोगे मनुष्य कुळात जन्मलेल्या मानवाचा उत्कर्ष हा त्याच्या समतावादी विचारात दडलेला असतो हे उघडचं आहे. **कोणाही जीवाचा न घडावा मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे!** अशा या समतावादी विचारसरणीत अदृश्य शक्तिमधला परमेश्वर आढळतो. पंचतत्त्वात अदृश्य शक्ति वावरतात. हा भ्रम किंवा आभास नाहीय, तर या शक्ति आपल्या हळव्या, भावूक मनाशी जोडल्या गेलेल्या असतात.

चराचरातील शक्ति मानवी मेंदूपासून शरीरांतर्गत अवयव, मनावरही ताबा मिळवते. त्याच्यापुढं नतमस्तक होतो आपण. जमीन पर्वत मोठे असतात. त्याहून मोठा असतो समुद्र. पण समुद्राहून मोठे असते ते आभाळ. पंचभुतातली आभाळभर माया सर्वत्र आपले पाश रोवते. समुद्राची गाज, अथांगता काजळ तीट लावते. हिरवाईने निसर्ग नटतो. श्वासाला कारणीभूत ठरणारा वारा वेगेवेगे उनाड धावत निसर्गचक्राला गती देतो. अशा या किमयागार अद्भूत शक्तिंचे पांग मानव जन्मोजन्मी फेडू शकणार नाही. निदान त्याच्या प्रती आपले समर्पण हीच त्याला वंदना ठरेल. दुसरी महत्त्वाची वचनपूर्तीतली शक्ति म्हणजे **'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा!'** सर्वधर्मपंथ अनुयायातील संत, माहात्म्यांना देव माणसात दिसतो.

माणसामधला देव ओळखता आला पाहिजे. गरजा नसणे वा कमी असणे ही ईश्वरी प्रेरणा मानल्यास, स्वकर्म ही ईश्वरी पूजा असेल असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. प्रामाणिक माणसं ही ईश्वराची सर्वोत्तम कृती आहे, असं देखील म्हणता येईल. मनुष्याच्या गुणदोष, स्वरूपाची वैयक्तिक पातळी वेगळी असली तरी, समजण्याची कला, सामंजस्य, कौशल्य, मौलिक सल्ला, प्रेम, सांत्वन या आणि बऱ्याच गोष्टी माणसातल्या अदृश्य शक्तिंचा परमेश्वरी साक्षात्कार घडवतील. अनेक गोष्टींवर प्रेम करताना; चिंतनाने अंतर्मनात दडलेल्या परमेश्वराला जाणलं तर मनुष्य योनीतल्या ईश्वरास





जाणून घेतल्याचे सार्थकी लागेल. यासाठी देह, मन, बुद्धी, वेळ या अत्युच्यम देणगीचा सदुपयोग निश्चित बळ देणारा ठरेल. याप्रसंगी आपल्यातील तत्त्व ओळखून शब्द अर्था आधी यावा, हे तो ईश्वराचे देणे. बा. भ. बोरकरांच्या या पंक्ति बरंच काही शिकवून जातात. तेव्हा सत्यम्-शिवम्-सुंदरम् अशा विचारधारणेने भारलेल्या देवत्वाचे आपण पायिक असू. जाणीवपूर्वक चांगल्या विचारांचं जाळं आपल्या अवतीभोवती विणलं जात असेल, तर अदृश्य शक्तिंचा सकारात्मक परिणाम मनावर गडद छाया घेऊन वावरणाऱ्यांना ज्ञानाचा प्रकाश देईल. शेवटी पंचमहाभूतात जन्मलेलो आपण या अवताराचे देदीप्यमान अंश आहोत. आसपासच्या अदृश्य शक्ति चांगल्या माणसाकडून आलेल्या असो वा पंचतत्त्वाकडून वा परमेश्वरी चिंतनातून लाभलेल्या असो, मनन-चिंतनातला आनंद मानवाला सदृश्य अशा महाशक्तिरूपी परमेश्वरापर्यंत नेऊन सोडतो हेच खरंय. ईशप्राप्तीचा मार्ग अंतःकरणापासून निघून अनादी, अनंत साक्षात्कारापर्यंत पोहोचतो.

एकविसाव्या शतकातली आपली वाटचाल म्हणजे, 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले' म्हणत, सृजनाचा स्वीकार करावयास सादर हीच असावी. खरं तर मानवाला सदैव भौतिक सुखांना तारून धरणाऱ्या ईश्वर कृपा कवचाची गरज भासत आलीय. तेव्हा जोवर मनुष्य या धरतीवर असेल तोवर पुण्यकृपेनं अदृश्य शक्ति, परम ईश्वरीकृपा मानवाची छाया बनून राहतील. दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती आणि हेच अंतिम सत्य जगाच्या अस्तापर्यंत राहील.

**- पूजा काळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कांदा निर्यातबंदीला निर्यात शुल्काचा खोडा

**सोलापूर : लोकसभा निवडणुकीत महत्त्वाचा मुद्दा ठरलेल्या कांद्याच्या कमी दरासाठी निर्यातबंदी हेच मुख्य कारण आहे. मात्र तरीही सध्या कांद्याचा उष्णतेने घसरलेला दर्जाही तेवढाच कारणीभूत असल्याचे शहरातील मोठ्या कांदा व्यापाऱ्यांनी सांगितले. आता लावलेले कांद्याचे पीक सप्टेंबरमध्ये बाजारात येईल, त्याला मात्र भाव मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

कांदा पिकवणाऱ्या राज्यात महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. सोलापूर, नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, धुळे, खान्देश आणि मराठवाड्यातही कांदा उत्पादन होते. काही महिन्यापासून कांद्याचे दर घसरत आहेत. निर्यातबंदीच्या निर्णयापूर्वी प्रतिक्विंटल चार हजारांवर असणारे कांद्याचे दर आता हजाराखाली आले आहेत. सात महिन्यांपासून राज्यातील कांदा निर्यात होत नव्हती. आता निवडणुकीच्या काळात केंद्र सरकारने निर्यात बंदी उठवून शेतकऱ्यांना दिलासा दिला. पण व्यापाराला दिलासा कसे म्हणता येईल? कारण निर्यात शुल्क ४० टक्के असल्याने व्यापारी वर्गाला कांदा विक्री लाभदायक होत नसल्याचे चित्र आहे. केंद्र सरकारने व्यापाऱ्यांचाही विचार करायला हवा.

कांदा निर्यात धोरण चांगले असेल तर कांद्याचे उत्पादन जास्त झाले तरी कांदा निर्यात करून योग्य भाव मिळवता येईल. शेतकऱ्यांनाही परवडणारा भाव मिळेल.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गेट समोर आंदोलन, निषेध, कांदा फेक अशी आंदोलने शेतकऱ्यांनी केली. तरी देखील कवडीमोल भावामुळे शेतकरी वर्ग संतप्त झाला आहे. मागील आठवड्यात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी आपला कांदा विक्री आला होता. त्याला २४ पोती कांदा विकल्यानंतर केवळ हाती ५५७ रुपये मिळाले. कांदा दराच्या घसरणीने शेतकरी गळफास घ्यावा का? असे विचारत आहेत.

## निर्यात बंदी उठवली म्हणजे रडक्याचे डोळे पुसणे

### निर्यात बंदीच्या पूर्वीचा भाव ४ हजार रुपये

कांदा निर्यातबंदीनंतर दररोज कांद्याच्या दरात घसरण होत आहे. निर्यातबंदीच्या निर्णयापूर्वी चार हजारांवर असणारे दर आता हजाराच्या खाली आले आहे कांदा आता सात महिन्यानंतर नीचांकी दरावर आहे.

---

### रोजची कांद्याची आवक

साधारणत: कांदा रोज १५० ते २५० ट्रक आवक होते. कालची आवक २३० ट्रक झाली. सोलापूर जिल्ह्यातून अनेक तालुक्यातून रोज एवढी आवक होते.

---

### सध्याचा कांद्याचा दर

सोलापूर कृषी बाजार समितीत कांद्याच्या भावात मोठी घसरण बघायला मिळत आहे. कांद्याचे सरासरी भाव १००० ते १८०० रुपये प्रति क्विंटलवर आले आहेत. कांद्याला जास्तीत जास्त २२०० तर कमीत कमी २०० रुपये ते १००० बाजारभाव मिळत आहे.

---



### कमी दर मिळण्याची कारणे

कांद्याची दर्जा, रंग, डाग, उन्हाळी कांदा दर्जेदार नसतो. या महिन्यात फुरसुंगी कांदा असतो. कांद्याला कमी भाव असल्याचे कारण म्हणजे ७० टक्के कांदा हलक्या दर्जाचा आहे.

---

### निर्यात बंदी उठवली पण निर्यात शुल्क?

एका बाजूने निर्यात बंदी उठवली दुसऱ्या बाजूने निर्यात शुल्क मोठया प्रमाणात आकारण्यात येत आहे. कांदा निर्यातीचे धोरण सरकारचे चांगले असायला हवे. कांद्याचे उत्पादन जास्त झाले तर कांदा निर्यात करून कांद्याला योग्य दर मिळवता येऊ शकतो. कारण निर्यात शुल्क ४० टक्के असल्याने व्यापाऱ्यांना कांदा निर्यात परवडत नसल्याने सध्या तरी निर्यात होऊ शकत नाही, असे कांदा व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले.

कांदा निर्यात करून कांद्याला योग्य दर मिळवता येऊ शकतो. पण निर्यात शुल्क ४० टक्के केल्याने हे व्यापारी वर्गाला परवडत नाही.

**-अतिक नदाफ, कांदा व्यापारी, सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर.**





## टँकर मागणीसाठी धायटी सरपंच, ग्रामस्थांकडून आंदोलन

**सांगोला :** धायटी आणि परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई असल्याने गावाला टँकर सुरू ठेवावा अशी वारंवार मागणी करूनही प्रशासन दखल घेत नसल्याने, सरपंचांसह ग्रामस्थांनी सांगोला तहसील कार्यासमोर आंदोलन केले.

आंदोलनाची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी टँकर सुरू करु असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तालुक्यात पाणीटंचाई सुरू असताना टँकर मागणीसाठी आंदोलन करावे लागत आहे ही शोकांतिका आहे अशा तीव्र शब्दात आंदोलकांनी प्रशासनाला धारेवर धरले होते. धायटी व वाड्या वस्त्यांवर पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठासाठी जलजीवन योजनेअंतर्गत कामे सुरू आहेत. मध्यंतरी शेतकऱ्यांनी पाईपलाईनचे काम थांबवल्याने जलजीवन योजना अर्धवट आहे.

योजना पूर्ण झाल्यास गावाला दोन ऐवजी एक टँकरवर पाणीपुरवठा केला तर नागरिकांना पाणीटंचाई जाणवणार नाही, परंतु यावर शासनाकडून दखल घेतली नसल्याने धायटी गावातील सरपंच व ग्रामस्थांनी सांगोला तहसील कार्यासमोर आंदोलन केले.

शेकापचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी या आंदोलन स्थळी येऊन मागण्या शासनाने पूर्ण कराव्यात. अन्यथा येत्या काळात पाणीपुरवठा विभागाच्या कामकाजा संदर्भात या पुढील काळात तीव्र आंदोलन करू असा इशाराही दिला.

## संक्षिप्त वृत्त



### कारंबा शिबिरात १०१ जणांकडून रक्तदान

**उत्तर सोलापूर :** कारंबा (ता. उत्तर सोलापूर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त शंभू तक्त प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले शिबिरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमास प्रतिसाद दिला. रक्तदात्यांना पाण्याचे जार, भेटवस्तू, प्रवासासाठी चार बाकडे भेट देण्यात आले. गेल्या चार वर्षापासून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात येते. यंदा कारंबा ग्रामस्थ व सिद्धेश्वर ब्लड बँक, मेडिकेअर ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर झाले. यावेळी डॉ. हरिश्चंद्र गलियाल, अजय जाधव, काशिनाथ देवर-पाटील, समीर शेख, सागर झंपले, स्नेहा बंदगी, प्रियंका घंटे उपस्थित होते. शिबिरासाठी शंभू तक्त प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

---

### अवैध धंदे बंद न केल्यास लाक्षणिक उपोषण : देढे

**सोलापूर :** शहरातील मटका, जुगार, हातभट्टी विक्री असे अवैध धंदे बंद करावेत. अन्यथा १० जून रोजी लाक्षणिक उपोषण करणार आहे, असा इशारा भीम सैनिक सेवा प्रतिष्ठानचे वसंत देढे यांनी पोलिस आयुक्तांना दिला आहे. शहरातील फौजदार चावडी, जेलरोड, सदर बझार, विजापूर नाका, सलगर वस्ती, एमआयडीसी, जोडभावी पेठ पोलिस स्टेशन या सात पोलिस ठाण्याच्या हद्दीत ऑनलाईन मटका, चिठ्ठी मटका, वॉट्सअप मटका, हातभट्टी दारू विक्री व निर्मिती, जुगाराचे अड्डे, हवालाचे बेटिंग, ज्युसबार, डान्सबार, बिअरशॉपी आदी अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या धंद्यांमुळे कामगारांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. अवैध धंदे हे पोलिस प्रशासनाच्या मदती मुळेच चालू आहेत, असे संघटनेच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे अवैध धंदे बंद व्हावेत या बाबत लेखी निवेदन भीमसैनिक सेवा प्रतिष्ठानच्या वतीने पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांना दिले आहे. पोलिस आयुक्तांना निवेदन देताना पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुहास बनसोडे, उपाध्यक्ष वसंत देढे, विजय नागमोडे, अजय आव्हाड, खलिल कुरेशी आदी उपस्थित होते.

---

### चव्हाण स्मृती पुरस्काराने भालचंद्र साखरे सन्मानित

**सोलापूर :** पंढरपुरातील दिवगत साहित्यिक आप्पासाहेव चव्हाण याच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानानाठी देण्यात येणारा पुरस्कार सोलापूरच्या मनपा शिक्षण मंडळातील कर्मचारी मानचंद्र साखरे यांना प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते. पंढरपूर येथील हॉटेल विठ्ठल इन येथे युटोपियन साखर कारखान्याचे अध्यक्ष उमेश परिचारक यांच्या हस्ते आणि पंढरपूर पंचायत समितीचे माजी सभापती वामनराव माने यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार साखरे यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महाद्वार काल्याचे मानकरी ह.भ.प. मदन हरिदास, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड, जि.प.चे माजी सदस्य सुभाष माने, संगीता ओव्हाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

---

### इनर व्हील क्लबकडून 'रामकृष्ण व्हिला'त स्लोगन बोर्ड

**सोलापूर :** ईनरव्हील क्लब ऑफ सांगोला यांच्यावतीने रामकृष्ण व्हिला गार्डन लग्न कार्यालयात अन्न वाचवा, पाणी वाचवा असे विविध ठिकाणी स्लोगन बोर्ड लावण्यात आले. बोर्डचे उद्घाटन कार्यालयाचे मालक पांडुरंग पाटील, सुनिता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यालयामध्ये जे लोक जेवण करतील त्यांनी स्लोगन पाहून थोड्याच प्रमाणात अन्न घेऊन त्यांच्याकडून अन्नाची नासाडी होऊ नये यासाठी हा ब्रॅण्डिंग प्रोजेक्ट घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी संजय लाटणे, क्लब अध्यक्ष सविता लाटणे, एडिटर संगीता चौगुले, सुशीला नांगरे, विजया खरतडे उपस्थित होत्या. हा उपक्रम कार्यालयाचे मालक पांडुरंग पाटील यांना खूप आवडल्यामुळे त्यांनी इनरव्हील क्लबचे आभार मानले.

---



## एमआयएमतर्फे हजला जाणाऱ्या भाविकांसाठी औषध वाटप

**सोलापूर/प्रतिनिधी**

एमआयएम आरोग्य विभागातर्फे हज यात्रेकरुंना औषध वाटप करण्यात आले. सोमवारी दुपारी सोशल हायस्कूल येथे या उपक्रमासह आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अनेक मुस्लिम भविका यंदा हजला जाणार आहेत. विविध देशांतील नागरिकांच्या संपर्कात आल्याने भारतीय मुस्लिमाना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोलापुरातुन जाणाऱ्या मुस्लिम भाविकांसाठी एमआयएमने हा उपक्रम राबवला. सोलापूर शहरात औषध प्रतिनिधी म्हणून काम करणारे विविध मेडिकल रिप्रेझेन्टेटीव्ह यांनी एकत्रित येत एमआयएम आरोग्य विभाग स्थापन केला आहे. हाजी फारूक शाब्दी यांचा या आरोग्य विभागाला मोठा पाठिंबा आहे.

## एकल पालक योजनेच्या लाभार्थ्यांचे सत्कार

### चार महिन्याचे प्रत्येकी ९००० रूपये जमा

**उत्तर सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या बालसंगोपन योजनेसाठी पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांचा कारंबा (ता.उत्तर सोलापूर) येथील विश्वकर्मा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक सुतार यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी संजय आदाटे, अमोल सुतार उपस्थित होते. एकल पालक असणाऱ्या कारंब्यातील नऊ मुलांना बालसंगोपनासाठी दरमहा २२५० रुपये मिळणार आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतून दरमहा पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये नुकतेच चार महिन्याचे प्रत्येकी ९००० रूपये जमा झाले आहेत. फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक सुतार यांच्या पुढाकाराने गावातील अशा लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यातून पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. पुर्वी एक हजार शंभर रुपये मिळत होते. पण शासनाने या योजनेचे महत्व लक्षात घेऊन त्यामध्ये वाढ करत आता २२५० रुपये केले आहेत. विश्वकर्मा सोशल फाउंडेशनला या कामासाठी जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी रमेश काटकर व दीपक धायगुडे यांचे सहकार्य मिळाले.



**पात्र विद्यार्थी :** स्वरा काशिद, कार्तिक काशिद, गणेश होळकर, श्रावणी होळकर, अंकिता गुडे, जोया पठाण, पायल यादव, वैभव गायकवाड, अर्पिता घोडके

---

अनाथ बालकांच्या सेवेसह फाऊंडेशनच्या सहकार्याने यापुढेही आम्ही गरजू, उपेक्षितांच्या आधारासाठी कार्यरत राहु.

**-विनायक सुतार, अध्यक्ष, विश्वकर्मा सोशल फाउंडेशन.**

## काळे आयटीआयच्या प्रशिक्षणार्थींची एल अँड टी कंपनीत निवड

**पंढरपूर/प्रतिनिधी**

वसंतराव काळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था धोंडेवाडी येथील ५० विद्यार्थ्यांची एल अँड टी कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे.

शनिवारी (दि.१८) एल अँड टी कंपनीचे एच आर हेड एस. नंदकुमार, सीएसटी कांचीपुरम व एस.नागराजन यांनी फिटर, वेल्डर, इलेक्ट्रीशियन, यांत्रिक मोटार गाडी या व्यवसायातील प्रशिक्षणार्थींची धोंडेवाडी येथे आयटीआय कॉलेजमध्ये येऊन मुलाखत घेतली. मुलाखतीनंतर एल अँड टी कंपनीमध्ये ५० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी आयटीआय कॉलेजचे प्राचार्य संतोष गुळवे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी या संस्थेमध्ये उपलब्ध करून दिल्याने महाराष्ट्र व देशातील नामांकित कंपन्यांचे एच.आर. हेड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतच कॅम्पस इंटरव्यू साठी येत असल्याने शेकडो मुलांना नामांकित कंपनीतील रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे, असे त्यांनी सांगितले.

निवड झालेल्याप्रशिक्षणार्थींचे संस्थेचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांनी अभिनंदन केले. यावेळी आयटीआय कॉलेजचे प्राचार्य संतोष गुळवे व सर्व निदेशकांनीही निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी अभिनंदन केले.





## खुर्चीवरून पडल्याने वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर :** खुर्चीवर बसल्या ठिकाणी खाली पडल्याने ७४ वर्षीय वृद्धाचा जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना जुळे सोलापूर येथील श्रीकांत नगरात सोमवारी (दि.२०) सकाळच्या सुमारास घडली. भागवत तुकाराम गायकवाड असे त्या मृत्यू झालेल्या वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी सकाळी घरामध्ये खुर्चीवर बसले असताना अचानक चक्कर येऊन ते खुर्चीवरून खाली कोसळले होते. त्यांना उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात श्रीकांत बनसोडे (जावई) यांनी दाखल केले होते, अशी नोंद पोलिस ठाण्यात झाली आहे.

# पाणीटंचाई बरोबर चारा टंचाईही आ वासून उभी

- सांगोला तालुक्यातील चिंताजनक परिस्थिती
- विकतचा चारा घेऊन जनावरांचे संगोपन



**सांगोला/प्रतिनिधी**

उन्हाचा कडाका वाढल्याने तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. याचा फटका जनावरांनाही बसत आहे. पाणी टंचाईमुळे अनेक भागात सध्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासोबतच चाऱ्याचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रशासन ३० जूनपर्यंत पुरेल एवढा चारा असल्याचे सांगून वेळकाढूपणा करीत आहे. मात्र सध्या विकतचां चारा घेवून जनावरांचे संगोपन केले जात आहे. विकतचा चारा परवडत नसल्याने शासनाने तात्काळ चारा डेपो अथवा चारा छावण्या सुरु कराव्यात अशी मागणी होत आहे.

शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दूध व्यवसाय करतात. सांगोला तालुका पशुवैद्यकीय विभागाच्या आकडेवारीनुसार तालुक्यात शेळी-मेंढी एकूण २ लाख ३० हजार तर गाय व म्हैस १ लाख ४७ हजार असे एकूण ३ लाख ७७ हजार जनावरांची संख्या आहे. तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेकडून कागदोपत्री पुढील ३० जूनपर्यंत पुरेल एवढा चारा दाखवला असला तरी, तालुक्यातील बहुतांश गावामध्ये मागील वर्षी पाऊस न झाल्याने चारा उपलब्ध कुठून होणार असा प्रश्न आहे. सद्यस्थितीत तालुक्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्नदेखील शेतकऱ्यांना सतावत आहे. सध्या भीषण पाणीटंचाई असून नागरिकांवर पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. मागील अनेक दिवसापासून पशू पालक चारा विकत घेऊन जनावरांचे संगोपन करीत आहेत. प्रशासन मात्र ३० जून पर्यंत पुरेल एवढा चारा असल्याचे सांगून वेळकाढूपणा करीत आहे. प्रत्यक्षात जनावरांना बाहेरील विकतचा चारा पुरत नाही. आणि पशू पालक शेतकऱ्यांना तो विकत घेणे परवडत नाही. याचा परिणाम दूध उत्पादनावर होत आहे.

### शासनाने चारा छावण्या सुरू कराव्यात

चाऱ्याचे वाढते दर परवडत नसल्याने सध्या सांगोला तालुक्यात शेतकरी जनावरांना पुरेशा प्रमाणात चारा घालू शकत नाही. परिणामी दुग्णोत्पादनात घट झाल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे मुश्किल झाले आहे. बळीराजा पुरता बेजार झाला आहे. शासनाने तात्काळ चारा छावण्या सुरु कराव्यात अशी मागणी जोर धरत आहे.

## दारु प्यायला पैसे मागत मजुराला मारहाण

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

तालुक्यातील वागदरी येथील इंदिरानगर झोपडपट्टी येथे २० मे रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोन आरोपींनी संगनमत करून एका मजुराला तुझ्या पिशवीतील सामान आम्हाला दे व दारू प्यायला पैसे दे असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केली. संशयित आरोपी लक्ष्मण सकट, टेंभू हांडगे (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) यांच्याविरूद्ध अक्कलकोट उत्तर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला. फिर्याद कल्लाप्पा घोगरे, (वय ३९) यांनी दिली. अधिक तपास पोलीस हवालदार पांढरे हे करीत आहेत.

# पावणे नऊ लाखाच्या चोरीच्या मोटारसायकली ताब्यात

## सहा आरोपींना अटक; माढा पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी...

**माढा/प्रतिनिधी**

माढा, कुर्डूवाडी, ठाणे, मुंबई आदी परिसरातून चोरी केलेल्या ८ लाख ६५ हजार रुपयांच्या ११ मोटार सायकलींसह आरोपीला अटक करण्यात माढा पोलिसांना यश आले आहे. कामगिरीबद्दल माढा पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सुहास रमेश कदम रा उपळाई खुर्द असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडील ११ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. बार्शी येथील सुमित बोकेफोडे यांनी १ मे रोजी हिरो कंपनीची मोटारसायकल माढा स्टँडमधून चोरी गेल्याची तक्रार माढा पोलीस स्टेशनमध्ये दिली होती.घटनेचा सखोल तपास करताना तपास अधिकारी पो हे कॉ प्रणय शिंदे यांच्यासह माढा पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सखोल तपास केला. यावेळी उपळाई खुर्द येथील व्यक्तीने संबंधित गाडी चोरल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला ताब्यात घेत पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर कबूल झाला.

त्याच्याकडून आणखी चोऱ्या उघड करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयाकडून पोलीस कोठडी घेत तपास केला. तेव्हा त्याच्याकडे एकूण ८ लाख ६५ हजार रुपयांच्या ११ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकूल यांच्या मार्गदर्शनाखाली व सह पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी जगताप, हांडे, खंडागळे, मांजरे पोलीस हेड कॉन्स्टेबल शिंदे, निचळ, बनसोडे, एम वळ, शिंदे, एस.एस. घोळवे आदींनी ही कामगिरी पार पाडली.



चोरी केलेल्या मोटारसायकलीसह माढा पोलीस स्टेशन चे अधिकारी व कर्मचारी आणि आरोपी

# बिनव्याजी पैसे घेवून प्लॉट नावाने करतो म्हणून ३५ लाखाची फसवणूक

## एन.जी. कन्स्ट्रक्शनच्या मालकाविरूध्द गुन्हा

**सोलापूर/प्रतिनिधी**

निवृत्त चंद्रकांत पवार यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून बिनव्याजी ३५ लाख रूपये घेतले. ते ६ महिन्यात देतो नाहीतर प्लॉट तुमच्या नावाने करतो, असे म्हणून घेतलेले पैसे व प्लॉट न देता, त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी एन.जी. कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक नागनाथ गायकवाड (रा. आदित्य नगर, विजापूर रोड) याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.





या प्रकरणी चंद्रकांत पवार (वय ७२, रा. अर्जून टॉवर, नेहरू नगर ) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद केली आहे. यात म्हटले आहे की, त्यांच्या पुतण्याच्या ओळखीचे एन.जी. कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक नागनाथ गायकवाड यांनी त्यांच्याकडून ५ महिन्याकरिता बिनव्याजी ३५ लाख रूपये धनादेशाव्दारे दि. १८ एप्रिल २०१८ मध्ये पवार यांचा विश्वास संपादन करून घेतले. ठरल्याप्रमाणे रक्कम ५ महिन्यात परत केली नाहीतर त्यांच्या मालकीची सर्व्हे नंबर ४०१/२, नवीन सर्व्हे नंबर ५/१/२/८ या गटातील एन.ए. प्लॉट नंबर २५ ते ३० असे प्लॉट त्याचे एकूण क्षेत्र ११८३९.९६ स्क्वेअर फुट चंद्रकांत पवार हॉस्पिटलसाठी जागा विक्री करतो असे सांगून नोटरी केली. त्यानंतर ५ महिन्यात रक्कम परत केली नाही. त्यामुळे नागनाथ गायकवाड याने सुरूवातीपासूनच चंद्रकात पवार यांची फसवणूक करण्याचा हेतू ठेवून रक्कम प्राप्त करून पवार यांची फसवणूक केली.

या फिर्यादी वरून एन. जी. कन्स्ट्रक्शनचे मालक नागनाथ गायकवाड याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड हे करित आहेत.

# मृत व्यक्तिच्या नावाच्या जागी स्वत:चे नांव लावून वारसदाराची फसवणूक

## भोपळे बाप-लेकांविरूध्द गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

मृत व्यक्तिच्या नावाच्या जागी स्वतचे नांव लावून वारसदाराची फसवणूक केल्याप्रकरणी आप्पासाहेब भोपळे व त्याचा मुलगा अनिल भोपळे (दोघे रा. होटगी रोड ) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सुनिल पोतदार वय ६५ रा. शुक्रवार पेठ) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुनिल यांचे काका वामन पोतदार व यातील आरोपी आप्पासाहेब भोपळे यांचे वडिल उध्दवराव भोपळे हे दोघे मिळून भागीदारीमध्ये प्लॉट विक्री करित होते. मजरेवाडी, जुळे सोलापूर येथील जुना सर्व्हे नंबर ३०६/१ व नवीन सर्व्हे नंबर १५४/१ व जुना सर्व्हे नंबर ३०७/१ व नवीन सर्व्हे नंबर १५३/१ या दोन गटाचे मुळ मालक उध्दव भोपळे होते. दि. ७ डिसेंबर १९५५ रोजी उध्दव भोपळे यांनी सुनिल पोतदार यांचे काका वामन पोतदार यांना २६ एकर २० गुंठे जागेची विक्री केली होती. त्याचा दस्त क्रमांक १७६४/१९५५ असा आहे.

दि. ५ सप्टेंबर १९९१ मध्ये सुनिल पोतदार यांचे वडील मयत झाले. त्यांचा वारसदार म्हणून सुनिल पोतदार हे होते. दि. २५ मार्च १९९३ मध्ये सुनिल पोतदार यांचे काका मयत झाले. त्यांचे वारसदार म्हणून त्यांची ५ मुले होती. दोन्ही गटाच्या ७/१२ उताऱ्यावर एकूण ६ वारसांची नांवे आहेत. तरी देखील यातील आरोपीं आप्पासाहेब भोपळे व अनिल भोपळे यांनी यातील मयत उध्दव भोपळे यांचे ७/१२ वर नांव लावून ते मयत झाल्याचे पुरावा देवून आरोपी आप्पासाहेब भोपळे वारसदार आहे असे ७/१२ वर नमुद केले.

दि. ८ मार्च २०२३ ते आजतागायत वरील दोन्ही आरोपींनी गट नंबर १५४/१ यामध्ये दिवाणी न्यायालय, महसुल न्यायालय व फौजदारी न्यायालय अशा विविध स्वरूपाचे वाद विविध न्यायालयात चालू असताना गटामध्ये प्लॉटिंग पाडलेले असताना जागेतील हितसंबंधीत व्यक्ति मयत झालेली आहे, हे माहित असतानाही दिवाणी न्यायालयाचा मनाई आदेश असताना स्वत: च्या आर्थिक फायद्यासाठी सुनिल पोतदार या गटामध्ये हितसंबंधीत आहे अशी व इतर माहिती सादर न करता पोट हिस्सा मोजणी करून घेवून, पोट हिस्सा मोजणी नकाशा व आदेशाच्या आधारे स्वत:च्या एकट्याच्या नावाने ७/१२ उतारा तयार करून घेतला. त्या जागेवर अँगल व पत्र्याच्या सहाय्याने कब्जा घेवून ती जागा विक्री करण्याच्या उद्देशाने इसारा पावती केली.

अशा प्रकारे भोपळे पितापुत्राने सुनिल पोतदार यांची फसवणूक केली. या फिर्यादी वरून दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास फौजदार पोपटभळ हे करित आहेत.

# केकेआर संघ एसआरएच विरुद्ध खेळताही फायनलमध्ये पोहोचू शकतो

**नवी दिल्ली** : आयपीएलच्या अनोख्या नियमाचा फायदा कोलकाता नाईट रायडर्सला मिळू शकतो. केकेआरला आयपीएल २०२४ चा पहिला क्वालिफायर सामना हैदराबाद विरुद्ध खेळायचा आहे. हा सामना न खेळताही कोलकाता अंतिम फेरीत पोहोचू शकतो.

आयपीएल २०२४ मधील आता प्लेऑफ्सचे सामने सुरू होणार आहेत. २१ मे रोजी आयपीएल २०२४ चा पहिला क्वालिफायर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाईल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर हा सामना खेळवला जाणार आहे. या सामन्यात केकेआरला दुहेरी फायदा होणार आहे. आयपीएलच्या नियमानुसार केकेआर हैदराबादविरुद्ध सामना न खेळताही अंतिम फेरीत पोहोचू शकतो. त्यामुळे केकेआर अंतिम फेरीत पोहोचणार हे जवळपास निश्चित झाले आहे. केकेआरसाठी फायनलमध्ये पोहोचण्याचे समीकरण काय आहे? जाणून घेऊया.

कोलकाता नाईट रायडर्स गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. केकेआर हा आयपीएल इतिहासातील सर्वोत्तम नेट रन रेट असलेला संघ ठरला आहे. या हंगामात खेळल्या गेलेल्या एकूण १४ पैकी ९ सामने जिंकून २० गुणांसह गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय सनरायझर्स हैदराबाद संघ १४ पैकी ८ सामने जिंकून १७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमधील साखळी सामन्यानंतर आता प्लेऑफ्सच्या सामन्यातही पाऊस खोडा घालण्याची शक्यता आहे.

पहिला क्वालिफायर सामन्यात पावसाने अडथळा आणला, तर सर्व प्रथम पंच हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करतील की सामना कसा तरी किमान ५ षटकांचा खेळवता येईल. मात्र, पाऊस खूपच वेळ सुरु राहिला आणि सामना उशिराने सुरु झाला, तर पंच ५ षटकांऐवजी १ षटकांची सुपर ओव्हर खेळवण्याचा निर्णय घेतील. जर पावसामुळे हेही साध्य नाही आणि सामना रद्द झाला, तर गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेला केकेआर संघ सामना न खेळताच अंतिम फेरीत प्रवेश करेल.

# पंढरीतील मटका, जुगार, बेटींग अड्ड्यांवर पोलिसांची कारवाई

## दोन लाख ५७ हजाराचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर शहर, तालुक्यात प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक शुभमकुमार यांनी मटका, जुगार, ऑनलाईन बेटिंगवर कारवाई करत २ लाख ५७ हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

शुभम कुमार यांनी शहरातील नवीपेठ भाजी मंडईत बेकायदेशीरपणे ऑनलाइन संगणकाद्वारे कसिनोवर ० ते ९ ते ३६ अशा अंकांवर बीट लावून १ रूपयास ३६ रूपये असे जादा पैशांचे अमिष दाखवून जुगार चालविला जात असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलीस हवालदार गजानन माळी, नलवडे, उबाळे, मोरे, राठोड यांच्या पथकासह धडक कारवाई केली. संदीप देविदास झडे (रा.उत्पात गल्ली) व दिनेश अनंतलाल परदेशी (रा.झेंडे गल्ली) अशा दोघांना ताब्यात घेतले. कारवाईत रोख ६ हजार ६६० रूपये, १० हजार रूपये



किंमतीचे २ मोबाईल तसेच ४ संगणक, प्रिंटर, टीव्ही व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू असा एकूण ५० हजार ४६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. जुगाराचा मुख्य मालक मिरज येथील अभिजीत पाटील हा असल्याचे समोर आले. याबाबतची फिर्याद पोलीस हवालदार गजानन माळी यांनी दाखल केली.

संत गाडगे महाराज मठाच्या बाजुला पान टपरीजवळ 'मेन बाजार मुंबई' नावाचा मटका जुगार चालविला जात असल्याचे समजताच त्या ठिकाणी पोलीस पथकाने छापा टाकला. सोमनाथ नामदेव गांगुर्डे (रा.संतपेठ) याला ताब्यात घेऊन रोख रक्कम, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा १० हजार ९७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस हवालदार सुजित उबाळे यांनी फिर्याद केली आहे.

इंद्रप्रस्थ शॉपिंग सेंटरजवळ व जुन्या बसस्थानकासमोर मटका जुगार खेळला जात असताना गणेश चंद्रकांत जाधव (रा. टाकळी रोड), सचिन श्रीकृष्ण आरगडे (रा. भक्तीमार्ग), भाऊसाहेब धोंडीबा गावडे (रा. बडवेचर झोपडपट्टी) व अनिकेत नंदकुमार अवताडे (रा. अनिलनगर) या चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १ लाख ३६ हजार २७० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. संजय आत्माराम ननवरे (रा. झेंडेगल्ली) हा बुकीमालक असल्याचे समोर आले. याबाबतची फिर्याद पोलीस हवालदार गजानन माळी यांनी दाखल केली आहे.

भाजी मंडई येथे मारूती मंदिरामागे मटका जुगार अड्ड्यावरही छापा टाकला. मुकुंद विश्वनाथ काळुंखे (रा. सेंट्रल नाका), प्रशांत दिलीप परदेशी (रा. झेंडे गल्ली) या दोघांना ताब्यात घेऊन ट रक्कम, मोबाईल, जुगाराचे साहित्य असा १९ हजार ६८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. येथेही संजय ननवरे हा बुकी मालक असल्याचे समोर आले. फिर्याद हवालदार सुनिल मोरे यांनी दिली आहे.

### शुभम कुमारांचा अवैध धंदेवाल्यांना धसका

पंढरपूर तालुक्यासह शहरातही कारवाई होत असल्याने अवैध धंदे करणाऱ्यांनी प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक शुभम कुमार यांचा धसका घेतला असल्याचे दिसते. नागरिकांनी अवैध धंद्यापासून दूर राहावे कोणतेही अवैध धंदे चालू देणार नाही. कोठे असे धंदे सुरू असतील तर त्याची माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असेही शुभमकुमार यांनी सांगितले आहे.

### समाजसेवक की बुकीमालक

कारवाईतील बुकीमालक संजय ननवरे हा समाजसेवकाचे कार्य करतो. आजवर त्यांनी समाजसेवेच्या कार्यातून अनेकांना मदत केली. परंतु या कारवाईमुळे त्यांची वेगळी ओळख जनतेसमोर आली आहे. त्याच्या अटकेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# एलिमिनेटर सामना पावसामुळे रद्द झाल्यास कोणाला मिळणार क्वालिफायरची संधी?

## काय आहे आयपीएलचा नियम?

**नवी दिल्ली** : आयपीएल २०२४ मधील सर्व ७० साखळी सामने रविवारी पाडले. हंगामातील शेवटचा साखळी सामना राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार होता, तो पावसामुळे रद्द करण्यात आला. ज्यामुळे प्लेऑफ्ससाठी पात्र ठरलेल्या ४ संघाचे गुणतालिकेतील स्थान निश्चित झाले. आता प्लेऑफचे सामने होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे प्लेऑफ्समध्ये एकूण ४ सामने खेळवले जाणार आहेत. यापैकी एलिमिनेटर सामना २२ मे रोजी आरसीबी आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळवला जाणार आहे. जर हा सामना पावसामुळे रद्द झाला तर दुसरा क्वालिफायर सामना कोण खेळणार? याबद्दल जाणून घेऊया.

प्लेऑफ्स सामन्यांसाठी राखीव दिवस आहे का?

आयपीएल २०२४ वर पावसाचे संकट निर्माण झाले आहे. या हंगामात आतापर्यंत एकूण ३ सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. अशा स्थितीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील एलिमिनेटर सामन्याआधीच करोडो चाहत्यांच्या मनात एक प्रश्न उपस्थित होत आहे की, हा सामनाही पावसामुळे रद्द झाला, तर ट्रॉफीच्या या शर्यतीत कोण राहणार आणि कोण? या शर्यतीतून बाहेर पडणार?

आयपीएल २०२३ च्या हंगामापर्यंत, प्लेऑफ सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस नव्हता, तो फक्त आयपीएलच्या अंतिम सामन्यासाठी ठेवण्यात आला होता. पण या हंगाामापासून एलिमिनेटर सामना आणि क्वालिफायर सामन्यांसाठीही राखीव दिवस ठेवण्यात आले आहेत आहे. अशा परिस्थितीत आरसीबी आणि आरआर यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्यास हा सामना राखीव दिवशी खेळवला जाईल.

सामना रद्द झाल्यास कोणाला होणार फायदा?

राखीव दिवशीही हवामान सहकार्य करत नाही असे मानू या, तर पंच किमान ५-५ षटकांचा सामन आयोजित करण्याचा प्रयत्न करतील. हेही शक्य नसेल तर सुपर ओव्हर घेण्यात येईल. मात्र सुपर ओव्हर्सचा पण सामना खेळला गेला नाही, तर कोणता संघ क्वालिफायर खेळणार, हे पॉइंट टेबलवर ठरवले जाईल.

गुणतालिकेत दोन्हीपैकी जो संघ अव्वल स्थानावर राहिला होता, तो संघ दुसरा क्वालिफायर खेळण्यासाठी पात्र ठरेल. त्याचबरोबर दुसरा संघ बाहेर पडेल. या नियमामुळे आरसीबीला मोठा फटका बसणार आहे. जर सामना रद्द झाला, तर आरसीबी संघ बाहेर पडेल आणि राजस्थान रॉयल्स पुढच्या फेरीत म्हणजे दुसरा क्वालिफायर सामना खेळेल.

### आयपीएल २०२४च्या प्लेऑफ्सचे वेळापत्रक

क्वालिफायर-१: केकेआर विरुद्ध एसआरएच, २१ मे, अहमदाबाद

एलिमिनेटर: आरसीबी विरुद्ध आरआर, २२ मे, अहमदाबाद

क्वालिफायर -२: क्वालिफायर १ पराभूत वि एलिमिनेटर विजेता, २४ मे, चेन्नई

फायनल - क्वालिफायर १ विजेता विरुद्ध क्वालिफायर २ विजेता, २६ मे, एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई.





# कोलकाताने मुंबईचा विक्रम मोडत रचला इतिहास

## हा पराक्रम करणारा ठरला पहिला संघ

**नवी दिल्ली** : आयपीएल २०२४ च्या शेवटच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होणार होता, परंतु पावसामुळे हा सामना होऊ शकला नाही. हा सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. यासह प्लेऑफ्समधील अव्वल ४ संघही निश्चित झाले. मात्र, राजस्थानचे टॉप-२ मध्ये पोहोचण्याचे आशा धुळीस मिळाल्या. आयपीएल २०२४ च्या पॉइंट टेबलमध्ये कोलकाता नाइट रायडर्स संघ पहिल्या स्थानावर आहे. केकेआरचे शेवटचे दोन सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. यासह केकेआरने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. असे करणारा तो पहिला संघ ठरला आहे.

**केकेआरने मोठा विक्रम केला -**

कोलकाता नाईट रायडर्सचे पॉइंट टेबलमध्ये २० गुण आहेत. इतर कोणत्याही संघाकडे इतके गुण नाहीत. नेट रनरेटच्या बाबतीतही त्याचा संघ खूप पुढे आहे. त्याने +१.४२८ च्या प्रभावी नेट रन रेटने प्लेऑफमध्ये पहिले स्थान मिळवले आहे. आयपीएलच्या इतिहासातील हा सर्वोत्तम नेट रन रेट आहे. आत्तापर्यंत, लीग टप्पा संपल्यानंतर कोणत्याही संघाचा नेट रन रेट इतका जास्त नव्हता. यापूर्वी, मुंबई इंडियन्स संघाने २०२० चा लीग टप्पा +१.१०७ च्या नेट रन रेटने पूर्ण केला होता.

**आयपीएल इतिहासातील टॉप- ५ सर्वोत्तम नेट रन रेट -**

कोलकाता नाइट रायडर्स - २०२४ मध्ये +१.४२८

मुंबई इंडियन्स - २०२० मध्ये +१.१०७

मुंबई इंडियन्स - २०१० मध्ये +१.०८४

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु - २०१५ मध्ये +१.०३७

किंग्ज इलेव्हन पंजाब - २०१४ मध्ये +०.९६८

कोलकाता नाइट रायझर्स व्यतिरिक्त, आयपीएल २०२४ च्या प्लेऑफसाठी पात्र ठरलेल्या चार संघांमध्ये राजस्थान रॉयल्स, सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांचा समावेश आहे. या चारही संघांची यंदाच्या मोसमात चांगली कामगिरी झाली. केकेआर संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे.

## संक्षिप्त वृत्त

### दलित वृध्द दाम्पत्याला बेदम मारहाण

**अशोक नगर :** मध्य प्रदेशातील अशोक नगर जिल्ह्यातील एका गावात शुक्रवारी एका वृद्ध दलित जोडप्याला खांबाला बांधून गावकऱ्यांकडून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या जोडप्याला मारहाणीनंतर ग्रामस्थांनी चपलांचा हार घातला होता. या जोडप्याचा मुलगा काही महिन्यांपूर्वी लैंगिक छळाच्या प्रकरणात अडकला होता. यामुळे पीडित कुटुंबातील संतप्त सदस्यांनी जोडप्यावर हल्ला केला असावा असा संशय आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी (मुंगोली) सनम बी खान यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, काही महिन्यांपूर्वी या जोडप्याचा मुलगा विनयभंगाच्या घटनेत आरोपी होता व त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेमुळे महिलेच्या कुटुंबातील सदस्य प्रचंड भडकले होते. याच रागातून त्यांनी संबंधित दाम्पत्याला मारहाण केली. आम्ही दाम्पत्याने केलेल्या आरोपांची चौकशी करत आहोत. १० जणांविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला असून आरोपींना पकडण्यासाठी शोध सुरू आहे.
पोलिसांनी सांगितले की, मुलावर विनयभंगाचा आरोप लागल्यावर या जोडप्याने त्यांचे मुंगोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किलोरा गाव सोडले होते. प्रकरण थोडे निवळल्याचे वाटल्यावर ते शुक्रवारीच परतले होते. परत आल्याचे समजताच ६५ वर्षीय व्यक्ती आणि त्याच्या ६० वर्षीय पत्नीला खांबाला बांधून काहींनी मारहाण केली त्यांना चपलांचा हार घालायला लावला.

### तब्बल १८ लाखांहून अधिक सिम बंद होणार

**मुंबई :** ऑनलाइन फसवणूक आणि सायबर गुन्हे सरकारसाठी चिंतेचा विषय बनला असून त्यांच्यावर आता केंद्र सरकारकडून मोठी कारवाई होणार आहे. देशात १८ लाखांहून अधिक संशयास्पद सिम बंद होणार आहेत. या सर्जिकल स्ट्राईकमध्ये सर्व टेलिकॉम कंपन्या सरकारला सहकार्य करणार आहेत. केंद्रीय तपास यंत्रणांनी अशा संशयास्पद सिमची या आधीच तपासणी केली होती. या सिमकार्डच्या मदतीने अनेक प्रकारचे आर्थिक गुन्हे केले जात असल्याचे आढळून आले. इकॉनॉमिक टाईम्सच्या एका रिपोर्टनुसार, तपासादरम्यान अशा प्रत्येक मोबाईलमध्ये हजारो सिमकार्ड वापरले जात असल्याचे आढळून आले. दूरसंचार विभागाने ९ मे रोजी कंपन्यांना आदेश दिले होते की, २८,२२० मोबाईल फोन आणि सुमारे २० लाख सिमकार्डचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यापैकी १८ लाख सिम आणि हजारो मोबाईल फोन प्रभावित होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. मोबाईल फोन आणि सिमकार्डच्या मदतीने अलीकडच्या काळात अनेक मोठे आर्थिक गुन्हे घडले आहेत. ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत ही कारवाई करणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

### राहुल आजोबा फिरोज खानच्या नावावर मतं का नाही मागत

**नवी दिल्ली :** देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधकांकडून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहे. अशातच एका भाजप नेत्यानं राहुल गांधी यांच्यावर केलेल्या टीकेनं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. राहुल गांधी त्यांच्या आजोबांच्या नावावर मतं का मागत नाहीत? असा सवाल भाजप नेत्यानं उपस्थित केला आहे. उत्तर प्रदेशातील रायबरेली येथील भाजपचे उमेदवार दिनेश प्रताप सिंह यांनी राहुल गांधींवर जहरी टीका केली आहे.

### तमन्ना भाटियाच्या चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

**मुंबई :** अभिनेत्री तमन्ना भाटियाची प्रमुख भूमिका असलेल्या तामिळ चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा चित्रपट आता हिंदीतमध्येही प्रदर्शित होणार आहे. 'अरनमानाई ४ या तमिळ चित्रपटाने रसिकांवर मोहिनी घातली आहे. आता चित्रपट जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने हा चित्रपट हिंदीतही डब करण्यात आला आहे. येत्या २४ मे रोजी 'अरनमानाई ४' हिंदीमध्येही रिलीज होणार आहे. या हॉरर-कॉमेडी चित्रपटाने प्रेक्षकांना थरारक अनुभव देत मंत्रमुग्ध केले. आता हा चित्रपट हिंदी चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यात येणार आहे. त्याशिवाय रजनीकांत यांची भूमिका असणारा 'लाल सलाम' हा चित्रपटही हिंदीत झळकणार आहे. 'अरनमानाई ४'मध्ये मुख्य भूमिका साकारणाऱ्या सुंदर सी. यांनीच या चित्रपटाचं दिग्दर्शनही केलं आहे. खुशबू सुंदर आणि एसीएस अरुण कुमार यांच्यासह साजिद कुरैशी आणि सुशील लवानी यांनी यशस्वीपणे चित्रपट निर्मितीची धुरा सांभाळली आहे. बाक नावाच्या भयानक भूताच्या विश्वात नेणारा 'अरनमानाई ४' पूर्व भारतीय लोककथांच्या सफरीवर नेणारा आहे. तमिळनाडूच्या कोवूरमधील रहस्यमय पार्श्वभूमीवर आधारलेला हा चित्रपट कुटुंबातील चांगल्या आणि वाईट शक्तींमधील संघर्षाचे चित्रणही करतो. उत्तर प्रदेशातील रायबरेली येथील भाजपचे उमेदवार दिनेश प्रताप सिंह यांनी काँग्रेसचे उमेदवार राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. राहुल गांधी आजोबांच्या नावावर मतं का मागत नाहीत?



# इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसींचा अपघाती मृत्यू

## मोहम्मद मोखबर अंतरिम राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारणार, ५० दिवसात निवडणूक होणार

इराण/वृत्तसंस्था

**इराणचे अध्यक्ष इब्राहिम रायसी, परराष्ट्र मंत्री, होसेन अमीर-अब्दोल्लाहियान यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. इराण-अज़रबैजान सीमेवरील क्रिझ कलासी धरणाच्या उद्घाटनानंतर इराणच्या ताब्रिझ शहराकडे जात असताना उच्च अधिकाऱ्यांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर दाट धुक्यात डोंगराळ प्रदेश ओलांडताना कोसळले. रायसी यांच्या मृत्यूनंतर उपाध्यक्ष मोहम्मद मोखबर अंतरिम क्षमतेने अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारतील.**

सर्वोच्च नेते अली खमेनेई यांच्याशी जवळचे संबंध असलेले एक अनुभवी राजकीय व्यक्तिमत्व मोखबर यांचा राजवटीत महत्त्वपूर्ण प्रभावाचा इतिहास आहे. ते पूर्वी सेताड या शक्तिशाली सरकारी मालकीच्या फाउंडेशनचे प्रमुख होते आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय कायदा आणि व्यवस्थापनात प्रगत पदवी घेतली आहे. मोखबर, संसदीय अध्यक्ष मोहम्मद बाकेर कालिबाफ आणि न्यायपालिका प्रमुख घोल्लामहोसेन मोहसेनी एझेई यांचा समावेश असलेल्या





परिषदेला ५० दिवसांच्या आत नवीन राष्ट्रपतीपदाची निवडणूक आयोजित करण्याचे काम देण्यात आले आहे. १ सप्टेंबर १९५५ रोजी जन्मलेले मोहम्मद मोखबर हे इराणच्या राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात अनुभवी व्यक्तिमत्त्व आहे. रायसी यांच्या निवडीनंतर त्यांनी २०२१ मध्ये पहिल्या उपाध्यक्षाची भूमिका स्वीकारली. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर जप्त केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी सुरुवातीला तयार केलेल्या सेताड येथील मोखबरचा कार्यकाळ वाद आणि निर्बंधांनी चिन्हांकित झाला आहे. २०१० मध्ये, युरोपियन युनियनने आण्विक आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांमध्ये कथित सहभागासाठी प्रतिबंधित यादीत टाकले होते. दोन वर्षांनी त्या यादीतून काढून टाकण्यात आले.

इराणमधील एका वृत्तवाहिनीने या हेलिकॉप्ट क्रॅशबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. क्रॅश झालेल्या हेलिकॉप्टरची स्थिती पाहता या अपघातात प्रवाशी बचावण्याची शक्यता कमी आहे, असे या टीव्हीने म्हटले आहे. तर दुसरीकडे इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांनी या अपघाताचा देशाच्या कारभारावर परिणाम पडणार नाही, असे म्हणत नागरिकांना धीर दिला आहे.

### हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले

मिळालेल्या माहितीनुसार इराणचे राष्ट्रअध्यक्ष इब्राहीम रईसी हे हेलिकॉप्टरमधून प्रवास करत होते. मात्र पूर्व अजरबैजानमध्ये जंगलात या हेलिकॉप्टरचा अपघात झाला. हा अपघातग्रस्त प्रदेश जबरीजपासून साधारण १०० किमीच्या अंतरावर आहे. प्रवासादरम्यान खराब हवामान आणि घनदाट धुक्यामुळे रईसी यांच्या हेलिकॉप्टरचे हार्ड लँडिंग करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र यामध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले आणि रईसी यांचे यात निधन झाल्याचे म्हटले जात आहे.

# पुण्यातील पोर्श गाडी अपघात प्रकरणाची फडणवीसांकडून दखल

## आरोपीवर कठोर कारवाईचे करण्याचे आदेश

**पुणे :** शहरातील कल्याणी नगर परिसरात रविवारी पहाटे नंबरप्लेट नसलेल्या पोर्शे या अलिशान गाडीने मोटरसायकलला धडक दिल्याची घटना घडली होती. या घटनेत दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाला. या भीषण अपघात अपघातातील पोर्शे कार आणि त्या कारचा चालक हा अल्पवयीन (वय १७) वर्षांचा आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या अपघात प्रकरणात १७ वर्षांच्या अल्पवयीन आरोपीला जामीन मंजुर झाला होता. पुण्यातील एका बड्या बांधकाम व्यावसायींकाचा मुलगा ही अलिशान कार चालवत होता. या अपघाताचा व्हिडीओही आता समोर आला आहे.

१७ वर्षीय मुलाला न्यायालयाने काही अटींवर जामीन मंजूर केला. तसेच अपघातावर ३०० शब्दाचा निबंध लिहावा, असे आदेश दिले होते. यानंतर आता या अपघाताची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. तसेच या घटनेतील आरोपीवर कठोर कारवाईचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. या घटनेसंदर्भातील माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिस आयुक्तांना फोन करून घेतली, तसेच तात्काळ कारावाईचे आदेश दिले आहेत. याबरोबरच या अपघातातील आरोपीला जामीन मिळाला असला तरी त्याविरुद्ध अपील दाखल करण्याच्या सूचना पुणे पोलिस आयुक्तांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आल्याची माहिती आहे. याबरोबरच या प्रकरणातील आरोपीला कोणती विशेष ट्रिटमेंट दिली असल्यास त्यावेळचे पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासून ते खरे असेल तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा, अशा सूचना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत.



### न्यायालयाने दिले निबंध लिहिण्याचे आदेश

न्यायालयाने अल्पवयीन मुलाला जामीन देताना कार अपघातावर निबंध लिहिण्यास सांगितलं आहे. पोर्शे ने दुचाकीला टक्कर दिली आणि त्यात दोन जणांचा मृत्यू झाला. पुण्यातल्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. आरोपीने १५ दिवस येरवडा विभागात ट्राफिक कॉन्स्टेबलसोबत वाहतुकीचं नियोजन करावं. अपघातावर त्यानं ३०० शब्दाचा निबंध लिहावा आणि मद्य सोडायला मदत होईल, अशा डॉक्टरकडून उपचार घ्यावेत, असं सांगितलं. तसंच मानसोपचार तज्ज्ञांचे समुपदेशन घेऊन त्यासंदर्भात अहवाल न्यायालयात सादर करण्यास सांगितलं आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त यांनी दिली होती.

### ठाकरे गटाचे कार्येकर्ते पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई :** रशिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या दोन कार्यकर्त्यांनी सोमवारी सकाळी भांडुप परिसरात मतदारांना दाखवण्यासाठी कागदाने तयार केलेली मतदान यंत्रे टेबलावर ठेवली होती. त्यावरून भांडुप पोलिसांनी दोन्ही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले असून पोलीस त्यांच्याकडे अधिक तपास करत आहेत.

भांडुप तलाव परिसरात सोमवारी सकाळी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या दोन कार्यकर्त्यांनी मतदारांना दाखवण्यासाठी पोलिंग बूथवर कागदाने तयार केलेली यंत्रे ठेवली होती. त्याठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ पोलिंग बूथवर धाव घेत यंत्रे ताब्यात घेतली. तसेच ती यंत्रे तेथे ठेवणाऱ्या दोन कार्यकर्त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. ही माहिती आमदार सुनील राऊत यांना मिळाल्यानंतर त्यांनी देखील घटनास्थळी धाव घेतली.

# कबरीतून मृतदेह उकरून बाईकवरून आणला, मग किचनमध्ये पेटवला

**राजस्थान :** राजस्थानच्या जैसलमेर येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. वैयक्तिक वैमनस्यातून कुटुंबाचा बदला घेण्यासाठी जैसलमेरमध्ये एका तरुणाने स्मशानभूमीत पुरलेला मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर तो मृतदेह शेजाऱ्यांच्या स्वयंपाकघरात आणून जाळला. किचनमध्ये मृतदेह जळालेल्या अवस्थेत आढळून आल्यावर पोलिसांना माहिती देण्यात आली. पण पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा बनाव उघडा पडला.

पोलिसांनी आरोपी लक्ष्मण सिंह याला बेड्या ठोकल्या आहेत. त्याने वैयक्तिक वैमनस्यातून शेजारी असणाऱ्या हेमसिंह यांच्या कुटुंबाला अडकवण्यासाठी हा बनाव आखला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ मे रोजी हेमसिंह हे कुटुंबासह शेजारच्या गावात गेले होते. रात्रभर ते तिकडेच थांबले होते. त्याच रात्री लक्ष्मण सिंह याने कट रचला. हेमसिंह आणि कुटुंबियांना कोणत्या ना कोणत्या प्रकरणात गोवण्याची योजना आखली होती. त्यासाठी स्मशनभूमीतून पुरलेला मृतदेह आणला अन् किचनमध्ये जाळला.

**किचनमधीलच तेलानं जाळला मृतदेह :** लक्ष्मण सिंह यानं मध्यरात्री स्मशानभूमीपासून १५ किलोमीटर अंतरावरून बाईकवरुन मृतदेह घेऊन हेमसिंहचे घर गाठले. त्यानंतर स्वयंपाकघरात तेल शिंपडून मृतदेह जाळला. पोलिसांच्या तपासात ही धक्कादायक माहिती समोर आली. हा सर्व प्लॅन पूर्ण करण्यासाठी लक्ष्मण सिंह याला पहाटेचे पाच वाजले होते. मृतदेह दुचाकीवर घेऊन लक्ष्णण हेमसिंहच्या घरी पोहोचला तेव्हा गावातील एका व्यक्तीने पाहिले होते. सकाळी हेमसिंहचे नातेवाईक घरी पोहोचले असता गावकऱ्यांनी त्यांना संपूर्ण प्रकार सांगितला.

### शेतकरी गळ्यात कांद्याची माळ घालून मतदानाला

**नाशिक :** नाशकात कांद्याचा प्रश्न संपूर्ण निवडणुकीत गाजला. नरेंद्र मोदी हे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आले होते, तेव्हाही त्यांच्या सभेत कांद्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

आता मतदानाच्या दिवशीही हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. नाशकातील शेतकऱ्यांनी चक्क गळ्यात कांद्याच्या माळा घालत मतदान केंद्रावर हजेरी लावली. हे पाहून सारेच आश्चर्यचकित झाले. नाशकातील चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू येथे शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून मतदान केंद्रावर हजेरी लावली. गळ्यात कांद्याची माळ घातलेल्या मतदारांना पाहून साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. मात्र, पोलिसांनी या शेतकऱ्यांना जागीच अडवले आणि माळा काढून मतदान करण्याचं आवाहन केलं. यामुळे मतदानकेंद्र परिसरात जमाव जमला होता.

# 'ऑनलाइन रमी'च्या व्यसनामुळे अंगरक्षकाची आत्महत्या?

## बच्चू कडू पुन्हा एकदा आंदोलन करणार

सचिन तेंडुलकर यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकाने १५ मे रोजी जळगाव येथे राहत्या घरात आत्महत्या केली होती. याप्रकरणी बच्चू कडू यांनी मोठा दावा केला आहे.

ऑनलाइन रमीच्या व्यसनातूनच सचिन तेंडुलकरच्या अंगरक्षकाची आत्महत्या झाल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. ऑनलाइन गेममुळे तेंडुलकर यांच्या अंगरक्षकानं आत्महत्या केली. हे निषेधार्थ आणि संताप आणणारं आहे. सचिन तेंडुलकर यांनी ऑनलाइन रमीची जाहीरात बंद करावी किंवा भारतरत्न पुरस्कार सोडावा. नाही तर ६ जून शिवराज्यभिषेक दिनाच्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ७ जून सचिन तेंडुलकर यांच्या घरासमोर त्यांचा पुतळा जाळून आंदोलन करणार, असे आव्हान बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा दिले आहे. याआधीही बच्चू कडू यांनी सचिन तेंडुलकरच्या विरोधात आंदोलन केले होते.

बच्चू कडू माध्यमांशी बोलताना म्हणाले की, जो अंगरक्षक सचिन तेंडुलकरचे जीव वाचविण्याचे काम करत होता, त्याच अंगरक्षकाला सचिन करत असलेल्या जाहिरातीमुळे जीव गमवावा लागला आहे. अंगरक्षकाला आत्महत्या करायची वेळ अली असेल तर सचिन तेंडुलकरने ही जबाबदारी उचलली पाहीजे. ज्याला भारतरत्न म्हणून



आपण गौरविले, त्याच्या जाहिरातीमुळे अशी आत्महत्या करावी लागत असेल तर हे दुर्दैव आहे.

भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या सुरक्षा व्यवस्थेतील राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) अंगरक्षक जवानाने १५ मे रोजी पहाटे जामनेर येथील निवासस्थानी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. गेल्या १५ वर्षांपासून राज्य राखीव पोलीस दलाच्या सेवेत असलेले प्रकाश कापडे (३९) यांनी याआधी मंत्री छगन भुजबळ, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याकडेही सुरक्षाव्यवस्थेतील अंगरक्षक म्हणून काम केले होते. सध्या ते सचिन तेंडुलकरच्या मुंबई येथील निवासस्थानी सुरक्षाव्यवस्थेत अंगरक्षक म्हणून तैनात होते. आठवडाभरापूर्वी ते जामनेर येथील गणपतीनगर भागातील आपल्या निवासस्थानी परतले होते. कापडे यांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला होता. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर आणइ तपासानंतर कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले होते. कापडे यांच्यामागे आई-वडील, पत्नी, दोन मुलगे असा परिवार आहे.

कापडे हे गोरेगाव (मुंबई) येथे राज्य राखीव पोलीस दलात (एसआरपीएफ) प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. बच्चू कडू लोकसभा निवडणुकीबाबत बोलताना म्हणाले की, ही निवडणूक धर्मयुद्धासारखी लढली गेली. धर्म आणि जातीच्या नावावर निवडणुका लढल्या जात आहेत. सर्व मतदारसंघावर नजर मारली तर जातीचे गणित मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी हा प्रयत्न केला. मुळ मुद्द्यांपासून ही निवडणूक दूर गेली आहे. आजही मुंबईत सहा ते सात लाख लोकांना फुटपाथवर झोपावं लागतं आणि ६ हजार एकर जमीन सहा कुटुंबाकडे आहे.

# अहमदाबाद विमानतळावर इसिसच्या ४ दहशतवाद्यांना बेड्या

## घातपाताचा कट उधळला, चौघेही श्रीलंकन



अहमदाबाद/वृत्तसंस्था

अमहदाबाद एटीएसने आयएसआयएसच्या चार दहशतवाद्यांना बेड्या ठोकल्या आहेत. अहमदाबाद विमानतळावरुन चार दहशतवाद्यांना एटीएसने अटक केली आहे. अटक करण्यात आलेले चारही दहशतवादी मूळचे श्रीलंकेचे आहेत. दरम्यान, गेल्यावर्षी २०२३ मध्ये एटीएसने राजकोटमधून तीन आरोपींना बेड्या ठोकल्या होत्या. ते तिन्ही दहशतवादी बांगलादेशी हॅंडलकरसाठी काम करत होते. दहशतवादी संघटनेसाठी लोकांची भरती करण्यात त्यांचा सहभाग होता. ते तिन्ही आरोपी तरुणांना कट्टरतावादी करत तयार करत होते. अटक करण्यात आलेले चारही दहशतवादी श्रीलंकेतून चेन्नईमार्गे अहमदाबादला पोहोचले

- **चेन्नईमार्गे अहमदाबादमध्ये दाखल :** गुजरात पोलिसांच्या मदतीने एटीएसने चार आरोपींना बेड्या ठोकल्या. गुजरात पोलिसांतील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतामध्ये मोठा दहशतवादी हल्ला करण्याच्या इराद्याने श्रीलंकेतून दहशतवादी पाठवण्यात आले होते. ते श्रीलंकेहून चेन्नईमार्गे अहमदाबादला पोहोचल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुजरात एटीएसने मिळालेल्या माहितीच्या आधारावर चारही आरोपींना बेड्या ठोकल्या. दहशतवाद्यांना टार्गेट लोकेशनवर पोहचण्याआधीच ताब्यात घेण्यात आलेय. अहमदाबाद विमानतळावरून इस्लामिक स्टेटच्या दहशतवाद्यांना अटक केली.

- **एटीएसच्या हातात मोठा पुरवा :** अटक करण्यात आलेले चारही पाकिस्तानमधील हँडलरच्या संपर्कात होते. त्यांनी मोठा कट आखला होता. हे दहशतवादी पाकिस्तानातील आदेशाची वाट पाहत होते, असेही समोर आले आहे. या दहशतवाद्यांना शस्त्रेही स्वतंत्रपणे पोहोचवली जाणार होती. एटीएसने या दहशतवाद्यांच्या फोनमधून एन्क्रिप्टेड चॅट जप्त केले आहेत. एटीएसकडून चारही दहशतव्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. चॅट्समधून बरीच माहिती उघड झाली आहे.

- **गुजरात पोलिस अलर्ट मोडवर :** सुरत पोलिसांकडून मौलवी सोहेल अबुबकरच्या प्रकरणाचा तपास सुरु आहे. त्यावेळीच गुजरातमध्ये चार खड्खड दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नाही. पण हे दहशतवादी अहमदाबादमध्ये पोहोचल्यानंतर गुजरात पोलीस अलर्ट मोडमध्ये आले आहेत. गुजरात पोलिसांकडून सर्व यंत्रणा अलर्टमोडवर ठेवण्यात आल्या आहेत. बारकाईने सर्व ठिकाणी लक्ष देण्यात येत आहे.

- **आयपीएल सामन्याआधीच अटक :** अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर २१ मे रोजी आयपीएलमधील प्लेऑफचा सामना होणार आहे. हैदराबाद आणि कोलकाता यांच्यात ही लढत होणार आहे. खेळाडू अहमदाबाद विमानतळावर दाखल होणार होते, काही झाले आहे. त्यावेळीच एटीएसने चार दहशतवाद्यांना अटक केली आहे. दहशतवाद्यांचा नेमका काय कट होता? याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

# प्रशासकाकडून आरक्षण व रस्ता बदलाचीच कामे

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

**अक्कलकोट, मैंदर्गी व दुधनीनगर परिषदेवर गेल्या २ वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहे. या कार्यकाळात तिन्ही शहरातील कलम ३७ अन्वये जागा आरक्षण व रस्ता बदल अशी बहुतांश कामे झाली आहेत. शहर विकासापेक्षा या कामाकडे प्रशासक असलेले मुख्याधिकारी व त्यांच्या टीमने अधिक लक्ष केंद्रित केल्याने गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित प्रकरणे लक्ष्मी दर्शनाने मार्गी लागलेली आहेत.**

### शहर विकासकामांकडे दुर्लक्ष; चौकशीची मागणी

अक्कलकोट, मैंदर्गी व दुधनी नगर परिषदेवर गेल्या २ वर्षांपासून प्रशासक म्हणून मुख्याधिकारी कार्यरत आहे. येथे कार्यरत असलेल्या मुख्याधिकाऱ्यांची बदली केवळ लोकसभा निवडणुकीमुळे रखडली आहे. याचा फायदा उठवत स्व लाभाच्या कामांना अग्रक्रमाने प्राधान्य दिले जात आहे.

शहर विकासाचा पुढील दोन तीन दशकाचा विचार करून डीपी योजनेंतर्गत नगर रचना करण्यात येते. मात्र यामध्ये धनदांडग्या जमीनदारांना मोकाट सोडून गरीब शेतकऱ्यांच्या जमिनीवर विविध आरक्षण टाकण्यात आल्याची चर्चा होत आहे. याबाबत चौकशीची मागणी पुढे येत आहे.

धनदांडग्या जमीनदारांना अभय देणारे कोण आहेत, असा सवाल देखील होत आहे. हे केवळ प्रशासकाच्या गलथान कारभारामुळे होताना दिसत आहे. याबाबत एका सामाजिक संघटनेकडून धनदांडगे जमीनदारांच्या विरोधात सक्तवसुली संचालनालय (ईडी) येथे धाव घेतल्याने अक्कलकोट शहरात एकच खळबळ उडाली आहे.

#### पाणीपुरवठ्याचे नियोजनाकडे लक्ष देणे आवश्यक

मुख्याधिकाऱ्यांनी बाकीचे कामे थांबून पाणी पुरवठ्याला महत्व देऊन कार्यरत राहण्याची मागणी शहरवासियांतून होत आहे. तर तालुक्यातील ग्रामीण भागातील ४९ गावांच्या पाणीटंचाई आराखड्यांतर्गत प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. सध्या तालुक्यात पाणी टंचाईने मात्र रौद्र रूप धारण केले आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात पाण्याचे नियोजन होणे गरजेचे आहे. श्रीक्षेत्र अक्कलकोट मध्ये सुरु असलेल्या विविध ठिकाणाच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे कामे ही संथ गतीने सुरु आहेत.




#### कचरा डेपोचे आरक्षण उठवण्याची मागणी

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी विविध राज्यासह परदेशातून दररोज लाखो भाविक येत आहेत. मात्र अक्कलकोटमध्ये प्रवेश करताना सोलापूर रस्त्यावर असलेल्या भल्या-मोठ्या कचरा डेपो व दुर्गंधीने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. शहरातील कलम ३७ अन्वये जागा आरक्षण व रस्ता बदल अशी बहुतांश कामे आपल्या प्रशासकांत झालेली आहेत. तरी साहेब, कचरा डेपोचे आरक्षण उठवा, अशी मागणी स्वामी भक्तांकडून होत आहे.

---

## संक्षिप्त वृत्त

### वीज पडून जनावरे दगावलेल्या शेतकऱ्यांना मदत वाटप

✔ **सांगोला** : सांगोला तालुक्यात महिन्यापूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसात वीज पडून मृत झालेल्या जनावरांच्या नुकसानीपोटी राज्याच्या नैसर्गिक आपत्ती निधीतून १ लाख ८६ हजार रुपयांची मदत ५ शेतकऱ्यांना वितरीत केल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांनी सांगितले. लिगाडेवाडी येथील अजित शिंदे यांची म्हैस ३७,५०० रुपये, नवी लोटेवाडी सातारकर वस्ती येथील पोपट सावंत यांची जर्सी गाय ३७,५०० रुपये, आलेगावमधील सयाजी बाबर यांची जर्सी गाय व तिची पाडी ५७,५०० रुपये, सावेतील आनंदा शेजाळ यांची जर्सी गाय ३७,५०० रुपये, जुनी लोटेवाडी येथील गोविंद लवटे यांच्या दोन शेळ्या, एक बोकड व शेळीचे पिल्लू असे मिळून १६ हजार रुपये असे एकूण १ लाख ८६ हजार रुपयांचे धनादेश संबंधित शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहेत.

### दारू पिण्यास पैसे दिले नाही म्हणून कोयत्याने मारहाण

✔ **सोलापूर** : दारू पिण्यासाठी पैसे दिले नाही या कारणावरून कोयत्याने मारहाण करण्यात आली. ही घटना बार्शी येथील म्हेत्रे मळा येथे शनिवारी (दि.१८) सायंकाळच्या सुमारास घडली. मुकेश काळे (वय वर्षे - ३५) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बबन चव्हाण (रा.भवानी पेठ, बार्शी) याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शनिवारी सायंकाळच्या सुमारास मुकेश काळे हे घरासमोर बसले होते. त्यावेळी आरोपी बबन हा नशेत तेथे आला आणि दारुसाठी पैशाची मागणी केली. पैसे नाही म्हणताच त्याने कोयत्याने त्यांच्यावर हल्ला केला, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार ठोंगे याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

### सोरेगाव परिसरातील नागरिक उकाड्याने हैराण

✔ **सोलापूर** : गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा वाढत चालला होता. अशातच काही दिवस पूर्व हंगामी पावसाने सोलापूर शहरासह लगतच्या सोरेगाव भागात उपस्थिती लावली. त्यानंतर काही दिवस तापमानात बऱ्यापैकी घट झाली होती, नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र गेल्या तीन-चार दिवसांपासून सोरेगाव परिसरात पुन्हा उकाडा वाढत आहे. परिणामी सोरेगाव, कल्याणी ड्रीम सिटी, अनंत स्मार्ट सिटी, लोकू तांडा, प्रतापनगर तांडा भागातील नागरिकांची उकाड्याने घालमेल होत आहे.

### चारित्र्याच्या संशयावरून मारहाण

✔ **सोलापूर** : चारित्र्याच्या संशयावरून लाथाबुक्क्या आणि दांडक्याने मारहाण करून पत्नीला जखमी करण्यात आले. बार्शी येथील गादेगाव रस्त्यावर रविवारी (दि.१९) सकाळच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी जखमीच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला. रेश्मा शेख (वय वर्षे - ३४, रा. गादेगाव रोड, बार्शी) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिचा पती अहमद रसूल शेख याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. रेश्मा शेख या धुणी-भांडीचे काम करतात. यावरुन तू कुठे गेले होती, खरे सांग असे म्हणत त्याने मारहाण करून डोके फोडले, असे फिर्यादीत नमूद आहे. हवालदार अडसूळ पुढील तपास करीत आहेत.

---

# गावाचा विकास झाल्यावरच देश सुधारेल : पेरे-पाटील

### तडवळेत नेत्यांसह ग्रामस्थांना प्रबोधन

✔ बार्शी/प्रतिनिधी

गावगाडा हाकत असताना एकमेकांवर जळायचं सोडले तर गावाचा विकास होईल. गावाचा विकास होईल तेव्हाच देश सुधारेल, असा विश्वास दोन वेळा राष्ट्रपती पुरस्कार विजेते भास्करराव पेरे-पाटील यांनी व्यक्त केला.

तडवळे (ता. बार्शी) ग्रामपंचायतची धुरा सलग १५ वर्षे सांभाळणाऱ्या सुहास आवारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनानिमित्त आयोजित प्रबोधनात्मक कार्यक्रमात ते बोलत होते. तसेच यावेळी युवा कीर्तनकार हभप कबीर महाराज आतार यांच्या कीर्तनाचे आयोजन केले होते.

अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्य दत्ता नवले हे होते. यावेळी सहकार खात्याचे उपसचिव संतोष पाटील, माजी शिक्षण आणि आरोग्य सभापती मकरंद निंबाळकर, उद्योजक बाळासाहेब आवारे, तडवळे बृहद विकास सोसायटीचे माजी चेअरमन भीम आवारे, प्राचार्य संतोष सरवळे, सुधीर आवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना भास्करराव पेरे-पाटील यांनी पंचसूत्री प्रदान केली. यामध्ये त्यांनी पुढच्या पिढीला १०० वर्षांचे आयुष्य देण्यासाठी प्रथम स्वच्छ पाणी आणि वृक्षारोपण करण्याचा सल्ला दिला. स्वतःच्या गावाला स्वयंपूर्ण बनवून गावात तयार होणारे उत्पादन गावामध्येच खरेदी करायला शिका, फळांची झाडे लावा, मुलांच्या शिक्षणावर भर द्या, वयस्कर लोकांना जीव लावा. जोपर्यंत ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच हातात हात धरून काम करत नाहीत, तोपर्यंत गावे कुठलीही सुधारत नाही, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमावेळी सुहास आवारे यांच्या कार्याचा मरणोत्तर गौरव करताना त्यांच्या कुटुंबियांना मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक रामेश्वर स्वामी यांनी केले. आभार गणेश जगदाळे यांनी मानले. सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले.




सोलापूर : तडवळेतील कार्यशाळेत ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना भास्करराव पेरे - पाटील. यावेळी उपस्थित अन्य मान्यवर.

---

# दत्तनगर खंडाळीमधील शिबिरात ७१ जणांकडून रक्तदान



सोलापूर : खंडाळी दत्तनगर येथील रक्तदान शिबिरात पुरुषांसह महिलांनीही उत्स्फुर्तपणे रक्तदानाच्या सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

✔ वेळापूर/प्रतिनिधी

खंडाळी दत्तनगर (ता. माळशिरस) येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरात ७१ जणांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन प्रदेश भाजपचे कार्यकारणी सदस्य तथा सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य के. के. पाटील, विशेष समाज कल्याण परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर दोलतडे, सोलापूर जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सरगर, राष्ट्रीय किसान संघाचे पदाधिकारी सपकाळ, भाजपाचे नेते अमोल मेथा, शहाजीआप्पा पताळे, भाजयुमोचे सरचिटणीस विनोद थिटे, मेजर नवनाथ पवार, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र पवार, युवराज वाघमोडे, सुशांत जाधव, अमर मगर, मिनीनाथ मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबीर पार पडले. रक्तदान शिबिराचे यंदाचे हे १३वे वर्ष होते.

उन्हाळ्यात रक्ताची गरज अधिक असल्याने हे शिबिर घेतले. शिबिरामुळे रक्ताचा तुटवडा कमी होऊन गरजू रुग्णांना निश्चित मदत होईल, असा विश्वास के. के. पाटील यांनी व्यक्त केला. तसेच ग्रुपच्या रक्तदान शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

एखादा उपक्रम चालू करणे सोपे असते परंतु तो सलग १३ वर्षे चालू ठेवणे ही निश्चितच कौतुकाची बाब आहे, अशा शब्दात पाटील यांनी या मंडळाची प्रशंसा केली. स्वप्नाली पवार व शाहीन शेख या महिलांनीही या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून सामाजिक कार्यात महिलाही कमी नाही हे दाखवून दिले. अक्षय ब्लड बँक सोलापूर यानी रक्त संकलन केले. डॉ. रुपनर व डॉ. वाघमोडे यांचे या उपक्रमासाठी सहकार्य मिळाले.

शिबिरासाठी अमोल पिंपळे, समीर इंगळे, वासुदेव पवार, मनोज थिटे, अमोल भोसले, विक्रम मेथा, अर्जुन इंगळे, आबा गोसावी, रावसाहेब कदम, हरी कटके, अमीन शेख, शिवाजी खुळे, सचिन गोसावी, रणजित गायकवाड, सज्जन पवार, देवा कांबळे, आकाश पवार, स्वप्निल गायकवाड, गणेश लोखंडे, किशोर सगट, किसन काळे, मनोज सोनवणे, यश चित्राव, अभिजीत जावळे, साईराज थिटे, प्रणिती थिटे, यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक संदेश नरळे यांनी केले. आभार सुरज कुदळे यांनी मानले.

---

## जुगार अड्ड्यावर छापा

### सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

✔ लक्ष्मीदहीवडी/प्रतिनिधी

फटेवाडी येथील मरवडेकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या बंद हॉटेलमधील खोलीत जुगार अड्ड्यांवर प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी शुभमकुमार यांच्या पथकाने धाड टाकली. दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला. २७ जणांवर गुन्हे दाखल केले. शनिवारी (दि.१८) ही घटना घडली.

जुगार अड्डा मालक अनिल डांगेसह शंकर देवकर, सुभाष ओहाळे, नवनाथ कांबळे, रमेश अनुसे, विकास मासाळ, राजेंद्र वाकडे, विष्णू वाकडे, संदेश लोखंडे, योगेश पाटील, जेटलिन कोरे, नवनाथ दंडवते, निखिल कोळी, सतिश पाटील, प्रविण बुरकूल यांच्याविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंद कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. छापा टाकला तेव्हा पोलिसांनी १ लाख ३० रुपये रोख रक्कम, ७० हजार ५०० रुपयांचे १५ मोबाईल, २० हजार रुपयांची मोटार सायकल, २५० रुपयांचा पत्त्याचा बॉक्स असा एकूण १ लाख ९० हजार ७८० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

दुसरी कारवाई तळसंगी फाटा येथे केली असून येथे १३ लोक गोलाकार बसून तिरट नावाचा जुगार खेळताना सापडले. समाधान बंडगर, सिध्देश्वर कोकरे, तानाजी खंदारे, विजय शिंदे ,हरिदास भोसले, धनंजय पवार, रावसाहेब साठे, गणेश चव्हाण, तानाजी लांडगे, बापू जाधव, प्रकाश कोळेकर, दयानंद काळे, चिदानंद मैंदर्गी, जुगार अड्डा मालक चांगदेव फराटे आदी १४ जणांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. जवळपास २ लाख २२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या दोन्हींची फिर्यादी पोलीस हवालदार गजानन माळी व पोलीस अंमलदार विजयकुमार आवटे यांनी दिल्या आहेत.

---

### ई-केवायसीनंतरही अनेक शेतकरी दुष्काळी निधीपासून वंचित

✔ **पिलीव** : गतवर्षी खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्यामुळे केंद्रशासनाने माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी निधी जाहीर केला होता. याच्या प्रत्येक गावातील याद्या प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होण्यासाठी ई-केवायसी करणे आवश्यक होते. तशी शेतकऱ्यांनी ई-केवायसी केली, मात्र बरेच दिवस झाले तरी अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमाच झाले नाहीत, अशी चर्चा सध्या शेतकऱ्यांमध्ये सुरु आहे.

# भरदिवसा घरफोड; ३१ हजार लंपास

✔ **सोलापूर** : विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत पद्मावती रेसिडन्सी व लोखंडवाला आईसलॅन्ड कॉम्प्लेक्समधील दोन घरे फोडून चोरट्याने ३१ हजाराची रोकड लांबविली.

पहिल्या घटनेत दिपक मठपती (वय ४६ रा. पद्मावती रेसिडन्सी, कोनार्कनगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिपक मठपती हे रविवारी (दि.१९) सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घरास कुलूप लावून बाहेर गेले होते. सकाळी १०.३० ते दुपारी १.४० या दरम्यान चोरट्याने मठपती यांच्या घराच्या मुख्य दरवाजाच्या कडी-कोयंड्याचे स्क्रू काढून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाट उचकटून तिजोरीत ठेवलेली १२ हजार ५०० रूपयांची रोकड लांबविली. या फिर्यादी वरून चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक गायकवाड हे करित आहेत.

दुसऱ्या घटनेत आतिष निंबाळकर (वय ३२ रा. लोखंडवाला आईसलॅन्ड कॉम्प्लेक्स) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की ते रविवारी (दि.१९) दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास घरास कुलूप लावून बाहेर गेले होते. दुपारी १२.३० ते २.३० या दरम्यान चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाट उचकटून १८ हजार ५०० रूपयाची रोकड लांबविली. या फिर्यादीवरून चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा



✔ नातेपुते/प्रतिनिधी

धर्मपुरी (ता. माळशिरस) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये १९९६-९७ मध्ये इ. दहावीमध्ये शिकलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा तब्बल २७ वर्षांनंतर पार पडला. यावेळी सारे मित्र जुन्या आठवणीत रंगून गेले होते.

व्यासपीठावर तिवाटणे, राऊत, शिंदे, सावंत, अर्निकर, गूजर, घाडगे आदी शिक्षक उपस्थित होते. गुरुजनांचे शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, ट्रॉफी, झाडे देऊन सन्मान करण्यात आला. २७ वर्षांनंतर एकमेकांना भेटल्याने अनेक जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला. सर्वजण थट्टा मस्करीत दंग झाले. वर्ग मित्र मैत्रिणींबरोबर शिक्षकही जुन्या आठवणींत रमले. ख्याली-खुशाली विचारत गळाभेट घेतली. अनेकांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील आठवणी सांगितल्या.

सर्वांना झाडे देऊन वसुंधरा वाचवा हा संदेश देण्यात आला. सूत्रसंचालन धनंजय माने यांनी केले. प्रास्ताविक आप्पासाहेब पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी रमेश कुलाळ, अनिल काटकर, भगवान रणदिवे, राजू झेंडे, केशव कदम, महेश मोरे, नवनाथ निगडे, विक्रांत माळवदकर, अमोल पाटील, आप्पासाहेब पवार, संदीप काटकर, आण्णा शेंडगे, मनीषा घाडगे, छाया भोईटे, चतुरा माने आदींनी विशेष परिश्रम घेतले.

---




फलकावर आपल्या नावापुढे आईवडिलांचे नाव लावल्यानंतर गटविकास अधिकारी योगेश कदम.

# स्वत:च्या नावापुढे वडिलांसह आईचेही लावले नाव

- मंगळवेढा गटविकास अधिकाऱ्यांकडून शासकीय आदेशाचे पालन
- मंगळवेढा तालुक्यातील पहिले अधिकारी

✔ मंगळवेढा/प्रतिनिधी

मंगळवेढा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी आपल्या आईचे व वडिलांचे फलकावर नाव लावले आहे. अशाप्रकारे नाव लावणारे ते मंगळवेढा तालुक्यातील पहिलेच शासकीय अधिकारी ठरले आहेत.

तालुक्यातील इतर कार्यालयात अद्याप तरी कुठल्याही अधिकाऱ्याने आपल्या नावापुढे आई, वडिलांचे नाव लावल्याचे निदर्शनास आले नसल्याची चर्चा कामानिमित्त पंचायत समितीत आलेल्या नागरिकांमध्ये सुरु आहे. राज्य शासनाने वडिलांच्या नावाअगोदर आईचे नाव लावावे असा आदेश काढला आहे. मात्र, याची अंमलबजावणी म्हणावी तशी अद्याप झालेली दिसून येत नाही.

#### कामास आलेल्यांचे लक्ष फलकाकडेच !

मंगळवेढ्यातील शासकिय अधिकाऱ्यांमध्ये प्रथमच गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी आपल्या नावाच्या पुढे आईचे व वडिलांचे नाव लावल्याने कार्यालयात काम घेऊन येणाऱ्या नागरिकांचे लक्ष तो फलक खेचून घेत आहे.

शासनाने महिलांना आरक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा विशेष प्रयत्न केला. त्याचबरोबर कुटुंबातील सदस्यांच्या नावापुढे वडिलांबरोबर आईचेही नाव लावणे बंधनकारक केले आहे. यापूर्वी प्रथमतः रेशन कार्डावर कुटुंबातील स्त्रीचे नाव देऊन प्राधान्य दिले होते. त्याचबरोबर दाखल्यावर तसेच संपत्तीवरही स्त्रियांना नावात प्राधान्य देण्यात आले होते. यापाठोपाठ आता शासकिय अधिकाऱ्यांनी आपल्या नावापुढे आईचे व वडिलांचे नाव लावा, असा आदेश निघाला आहे.

# वृद्धास पळवून नेऊन मारहाण

✔ **सोलापूर** : तुझ्या पुतण्यामुळे आमच्या व्यवसायावर परिणाम झाला, असे म्हणत वृद्धाला दुचाकीवरून पळवून नेऊन गज, काठी, केबलने मारहाण केली. ही घटना उजनी (ता. माढा ) येथे शनिवारी (दि.१८) घडली. कुर्डूवाडी पोलिसांनी ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अनंत जाधव (वय ६२ रा. उजनी) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सिद्धनाथ जाधव, पप्पू जाधव, संतोष चव्हाण, रमेश जाधव, महेश लोंढे (सर्व रा. उजनी) आणि अन्य दोन अशा ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी रात्री ८च्या सुमारास सिद्धनाथ आणि त्याचा भाऊ पप्पू यांनी अनंत जाधव यांच्या घरात घुसून त्यांना बळजबरीने दुचाकीवर बसवून आपल्या घरात नेले. तुझा पुतण्या विलास जाधवमुळे आमचा ट्रॅक्टर ८ दिवसापासून उभा आहे. त्यामुळे आम्हाला गाई कमी किमतीत विकाव्या लागत आहेत. तू २ लाख रुपये दे आणि पुतण्याला बोलावून घे, असे म्हणत सर्वांनी मारहाण केली. हवालदार हराळे याप्रकरणी तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### श्रीपूरमध्ये परशुराम जयतीनिमित्त शोभायात्रा उत्साहात

**वेळापूर** : येथील ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने भगवान परशुराम यांची जयंतीनिमित्त श्रीपूर मधील प्रमुख मार्गावरून प्रतिमेची फटाक्यांच्या आतषबाजी सह सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. विठ्ठल मंदिरापासून सुरू झालेली मिरणुकीची सांगता हनुमान मदिरात करण्यात आली . मिरवणुकीत श्रीपूरसह बोरगाव , नेवरे , महाळूंग येथिल नागरिक सहभागी झाले होते. प्रथम बंडोपंत सुमंत यांच्या हस्ते श्रीविठ्ठल रुक्मिणी व परशुराम यांच्या प्रतिमेची पूजा करण्यात आली. ग. बा. कुलकर्णी यांनी आज या बदललेल्या परिस्थितीत माणूस माणसापासून दुरावत चालला असल्याने या निमित्ताने ब्राह्मण समाजा मध्ये संवाद व्हावा एकत्रीकरण व्हावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात प्रा . नितीन देशपांडे यांनी संघाचे कार्याचा आढावा घेऊन संघाच्या वतीने १० वी व १२ वी मध्ये तसेच अन्य क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा सन्मान करण्यात येणार आहे. ज्या पाल्यांना ८० टक्क्यांच्या वर गुण मिळाले आहेत त्यांनी संपर्क करण्याचे आवाहन केले. कार्यक्रासाठी प्रा. नितीन देशपाडे, योगेश जोशी, अभिजित आहेरसिंग, प्रविण कुलकर्णी, श्रीपाद सुमंत, चैतन्य थत्ते, कृष्णा गोडसे, यांनी परिश्रम घेतले.



### प्लास्टिक बॉटलपासून थ्रीडी प्रिंटर फिलामेंट निर्मिती

**सोलापूर** : सैफुर विजापूर रोड भागातील ए. जी. पाटील तंत्रनिकेतन मधील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी मिनरल वॉटरच्या टाकाऊ बॉटल पासून थ्रीडी प्रिंटर मशीन साठी लागणाऱ्या फिलामेंटची निर्मिती केली आहे. यामध्ये हमीद पाटील, पियुष गायकवाड, समृद्ध बगले, प्रथमेश कदम व रोहित गडदुरे या विद्यार्थ्यांच्या प्रकल्प समूहाने प्राध्यापक श्री. जे. जी. ढालाईत यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प तयार केला आहे. या विद्यार्थ्यांच्या समूहाने टाकाऊ प्लास्टिकला प्रथम कापून त्याचे धागे तयार केले व त्याला विशिष्ट तापमान देऊन त्याचे फिलामेंटमध्ये रूपांतर केले. यामुळे रोजच्या वापरातील व टाकाऊ बॉटलच्या घनकचऱ्यापासून विविध वस्तू बनवण्यासाठी वापर होऊ शकतो. सदर प्रकल्पास विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये पुरस्कार देखील मिळाले आहे अशी माहिती प्रा. आर. एस. मोटगी यांनी दिली.




### स्वेरीत राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसानिमित्त कार्यशाळा

**पंढरपूर** : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडन्टस असोसिएशन आणि आयआयसी' अर्थात इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिलच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवसा'च्या निमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत डॉ.एन.यु.कौटकर हे प्रमुख मार्गदर्शक होते. प्रास्तविकात मेसाचे समन्वयक प्रा. संजय मोरे यांनी केले. डॉ. कौटकर यांनी भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती आणि देशाच्या विकासासाठी भारतीय शास्त्रज्ञ, अभियंते आणि तंत्रज्ञांनी केलेल्या योगदानाचे स्मरण व्हावे म्हणून हा दिवस साजरा केला जात असल्याचे सांगितले. यावेळी विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संजय मोरे मेसा समन्वयक यांनी केले तर आभार सुप्रिया शेलार यांनी मानले.

# 'सैराट'मुळे प्रसिद्ध झालेला इनामदार वाडा पडला उघडा

## किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढली

**सोलापूर/प्रतिनिधी**

उजनी धरणाची पाणी पातळी वजा ५५ टक्क्यांपर्यंत गेल्याने उजनी धरणात असलेला कुगाव येथील प्रसिद्ध इनामदार वाडा पूर्णपणे उघडा झाल आहे. हा वाडा पाहण्यासाठी विविध ठिकाणचे पर्यटक गर्दी करू लागले आहेत.

सैराट चित्रपटामुळे या वाड्याला प्रसिद्धी मिळाली असली तरी धरणाच्या मध्यभागी असणाऱ्या या इनामदार वाड्याला मोठा इतिहास आहे. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचा उत्तम प्रशासक म्हणून लौकिक होता. त्यांनी आपल्या कामगिरीने निजामाचा विश्वास संपादन केला. त्यांची जहागिरी असलेल्या इंदापूरच्या बाजूच्या शत्रूचा बंदोबस्त करण्याची कामगिरी निजामाने मालोजीराजेंवर सोपवली होती.

मालोजीराजे भोसले यांनी हनुमानाचे जन्म स्थान असणाऱ्या भीमा नदी काठच्या कुर्मग्राम (कुगाव) या ठिकाणी सैन्यांना रसद मिळण्यासाठी मदत व्हावी म्हणून एक किल्ला बांधला. हाच किल्ला पुढे इनामात १८९३ साली यशवंत मेघश्याम इनामदार यांच्याकडे देण्यात आला. आता या किल्ल्याला इनामदार वाडा से संबोधले जाते. सध्या हा किल्ला उजनी बॅकवॉटर परिसरातील पाणी उथळ झाल्याने उघडा पडायला लागला आहे. फक्त उन्हाळ्यातच हा किल्ला उघडा पडत असल्यामुळे पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत. करमाळा तालुक्यातील दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी आपल्या सैराट या चित्रपटाचे चित्रीकरण या ठिकाणी केले होते.



**वाड्यात जाताना नौकानयनाचा आनंद घेता येणार**

उन्हाळ्याच्या सुट्टीत उजनी धरण परिसरातील कोटलिंग मंदिर व कुगाव येथील ऐतिहासिक इनामदार वाडा व परिसरातील इतर ठिकाणाला भेट देऊन उजनी धरणातील पाण्यात नौकानयनाचा आनंद लुटण्यासाठी अनेक शालेय मुले व नोकरदार मंडळी येत आहेत. जेऊर या गावापासून पश्चिम दिशेला शेटफळ, चिखलठाणमार्गे पंधरा किलोमीटर अंतरावर हा इनामदार वाडा आहे.



## सैफूलजवळील आढळला विषारी घोणस साप

**सोलापूर/प्रतिनिधी**

सैफूलजवळील हेरिटेज पाम सोसायटीत विषारी घोणस साप आढळला. यामुळे भयभीत झालेल्या नागरिकांनी जेसीबी लावून सापाला शोधले. दोन दिवस चाललेल्या मोहिमेनंतर सापाला पकडले.

१८ मे रोजी सोसायटीच्या परिसरात साप दिसला. तिथल्या रहिवाशांनी त्याची माहिती सर्पमित्राला दिली. निसर्गप्रेमी सर्पमित्र संघटनेचे अध्यक्ष सर्पमित्र रविचंद्र स्वामी व सर्पमित्र अक्षय रजपूत हे घटनास्थळी गेले. त्यांनी सगळीकडे पाहिले; पण साप आढळला नाही. त्याच दिवशी रात्री ८ वाजता साप मातीचा ढीग व काटेरी झाडांकडे जाताना दिसला. त्यावेळी सर्पमित्रांना परत बोलविण्यात आले. याहीवेळी साप दिसला नाही. शेवटी जेसीबी आणून मातीचा ढिगारा व काटेरी झुडपे काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. मात्र, साप न सापडल्याने सर्पमित्र कंटाळून घरी गेले. तेवढ्यात एका व्यक्तीला साप फरशीच्या आत लपून बसल्याचे दिसून आले. पुन्हा सर्पमित्रांना बोलविण्यात आले. त्यावेळी सर्पमित्रांनी सुरक्षितरीत्या सापाला पकडले.

## कुर्डूवाडीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा उपोषणाचा इशारा

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

गेल्या वर्षभरापासून वेळेवर निवृत्तीवेतन मिळत नसल्याने येथील नगरपालिकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत आहे. वेळेवर औषधोपचार सुद्धा घेता येत नाही. वेळेवर निवृत्तीवेतन मिळावे यासह इतर मागण्या पूर्ण कराव्यात अन्यथा दि. १८ जून पासून उपोषणाचा इशारा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिला आहे.

कुर्डुवाडी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन वेळेवर मिळावे या मागणीचे निवेदन नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीच्यावतीने वारंवार देऊनही त्याबाबत ठोस पावले उचलली गेली नाहीत. वेळेवर पेन्शन होत नसल्यामुळे पेन्शनधारक ज्येष्ठ नागरिकांना वेळेवर औषध उपचार करता येत नाही.

जगण्यासाठी आवश्यक उपयुक्त वस्तूंची खरेदी करता येत नाही. आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी या मागण्या मान्य न झाल्यास १८ जून पासून कुर्डुवाडी नगरपालिकेसमोर उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर समितीचे अध्यक्ष गा. रा. व्यवहारे, उपाध्यक्ष अरुण पवार, कार्याध्यक्ष रामचंद्र डांगे, सचिव तुकाराम पायगण यांच्या स्वाक्षरी आहेत.

**या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

दर महिन्याच्या एक तारखेला निवृत्तीवेतन मिळावे . जुन्या निवृत्तीवेतन धारकांची देय रक्कम त्वरित अदा करावी, सातव्या वेतन आयोगाचा शेवटचा हप्ता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्वरित अदा करावा, नगरपालिका प्रशासनाकडून सेवानिवृत्त धारकांना सन्मानाची वागणूक मिळावी, कुर्डुवाडी नगरपालिकेस वेळोवेळी दिलेल्या लेखी निवदेनास लेखी उत्तर मिळावे.

## मयूर सुतार यांच्या मृदंगवाणीने सांगवीसह पंचक्रोशीतील श्रोते मंत्रमुग्ध

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बु येथे अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चालू असून, या सप्ताह दरम्यान पहाटे काकडा, आरती, भजन, कीर्तन, ज्ञानेश्वरी वाचन, प्रवचन, असे अनेक भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताह दरम्यान केले असून, या सप्ताला कोल्हापूर जिल्ह्यातील मृदंग वादक मयूर बाळासाहेब सुतार (वय - ३०) यांनी आपल्या मृदंगाच्या जादुणे सांगवी बु. सह पंचक्रोशीतील भाविक भक्त, श्रोते यांच्या मनात घर केले.



तालात, व मृदंग वाजवण्यात पटाईत असलेले मयूर हे मूळचे कोल्हापूर तालुक्यातील गारगोटी येथील राहिवासी असून, ते वारकरी संप्रदाय तीर्थछेत्र देहू आळंदी येथे २००५ साला पासून आप्पासाहेब वासकर महाराज अध्यात्मिक शिक्षण संस्था आळंदी येथे मृदंग शिकत आहेत. त्यांचे गुरु पंडित सुखद दादा मुंडे, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे मृदंग वादनाचे शिक्षण पूर्ण होऊन, मयूर जी हे स्वतः आता संपूर्ण भारत भर ऑनलाईन मृदंग वादनाचे क्लास घेत आहेत. आता त्यांच्याकडे ३०० हून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. शिवाय महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, येथे क्लास चालू आहेत.

## कुसमोड परिसरात जोरदार वादळी वारे

**पिलीव/प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड, काळमवाडी, साळमुखवाडी, बचेरी व शिंगोर्णी या गावात रविवारी सायंकाळी सुटलेल्या वाऱ्यामुळे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे.

बचेरी, शिंगोर्णी व काळमवाडी गावात थोडाफार पाऊस झाला पण कुसमोड गावात प्रचंड वेगाने वाहणारे वादळ सुटल्यामुळे अनेकांच्या घरावरचे पत्रे उडुन गेले तसेच डाळींब, आंब्यांच्या व इतर बागांचे तसेच मका ऊस कडवळ ही पिके भुईसपाट झाली. कुसमोड येथील श्रीमंत कचरे, नंदकुमार लोखंडे, अरुण पवार, बाबु पवार, उमेश मेटकरी, कमल लवटे, भिमराव खरात, मधुकर व्होनमाने, नागेश कचरे, अंकुश मदने, दत्तु धायगुडे, अमोल वाघमारे, मधुकर धायगुडे, अशोक धायगुडे, सचिन व्होनमाने, अर्जुन वाघ,अण्णा कचरे, शहाजी कचरे,दादा कचरे,दिलीप चौगुले, निवृती मदने, सुनील सोलंकर, अनिल धायगुडे, रमेश धायगुडे, सचिन तानाजी व्होनमाने या सर्वांचे घरावरील पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडून गेले आहेत. कुसमोड येथील पवारवस्ती शाळेजवळील हायमास्ट दिवासुद्धा वाऱ्यामुळे पडला. सचिन शिंदे यांच्या झाडाखाली बांधलेली देशी गाई व म्हैस झाड पडुन दोन्ही जनावरे दगावली आहेत. पिलीव परीसरातही जोरदार वाऱ्यामुळे अनेक झाडे उन्मळुन पडली तसेच विजेचे खांब पडल्यामुळे विजपुरवठा खंडीत झाला होता.



## लऊळ पालखी मार्गालगतच्या झाडांचे अस्तित्वच पाण्यावाचून आले धोक्यात

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

लऊळ (ता. माढा) येथे सामाजिक वनीकरण विभागाकडून सन २०१९ च्या दरम्यान ग्राम पंचायत मालकीच्या जागेत पालखी मार्गाच्या लगत लागवड केलेल्या तब्बल ५ हजार ५५५ झाडांचे अस्तित्वच पाण्याअभावी धोक्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे त्यांना पुन्हा नव्या जोमाने पालव्या फुटू लागल्या आहेत. त्यामुळे येथील झाडांना ग्रामपंचायत किंवा सामाजिक वनीकरण विभागाने कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी वृक्ष प्रेमींकडून होऊ लागली आहे. लऊळ ग्रामपंचायतीने वृक्ष लागवड पाच वर्षांपूर्वी करण्यात आलेली होती. ती पाच फुटांपर्यंत चांगल्या पद्धतीने बहरली आहे. परंतु, आता झाडांच्या बुडाशी गवताचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणात वाढले आहे. येथील संपूर्ण क्षेत्र हे जळालेल्या गवताने वेढलेले दिसून येत आहे.

**वृक्षांना कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था करणार : माडेकर**

सामाजिक वनीकरणाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत संपर्क करून संबंधित लागवड करण्यात आलेल्या वृक्षांना पाण्याची कायम स्वरुपी व्यवस्था करण्यात येईल. यामुळे वृक्षांची निगा राखण्यास मदत होईल, असे लऊळचे ग्रामविकास अधिकारी विजयकुमार माडेकर यांनी सांगितले.

सन २०१९ मध्ये लागवड करण्यात आलेल्या ५ हजार ५५५ रोपापैंकी ३ हजारांच्या आसपास रोपे सध्या अस्तित्वात आहेत. त्यामुळे येथील जिवंत असणाऱ्या झाडांकडे लक्ष देऊन त्याची निगा राखण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढे यावे, अशी मागणी वृक्षप्रेमी दिनेश शिंदे यांनी केली आहे.

## खो-खो असोसिएशन पुरस्कार छाननी समिती चेअरमनपदी श्रीकांत ढेपे

**प्रसिद्धी समिती चेअरमनपदी संगवे**

**सोलापूर/प्रतिनिधी**



महाराष्ट्र खो खो असोसिएशनच्या वतीने विविध उपसमित्याची नियुक्ती असोसिएशिनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी जाहीर केली असून यात पुरस्कार छाननी समिती चेअरमनपदी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे व प्रसिद्धी समिती चेअरमनपदी सोलापूर म्युचर खो खो असोसिएशनचे सरचिटणीस अजितकुमार संगवे यांचा समावेश आहे.

पूणे येथील महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या कार्यालयात झालेल्या असोसिशनच्या बैठकीत या उपसमित्यांची घोषणा डॉ. जाधवा यांनी केली. पंच मंडळ सदस्यपदी सोलापूर म्युचर खो खो असोसिएशनचे सदस्य शरद व्हनकडे, किशोर व किशोरी संघाचे निवड समिती सदस्यपदी असोसिएशनचे सहसचिव राजाराम शितोळे आणि किशोरी संघाचे प्रशिक्षकपदी वाडीकुरोलीचे प्रशिक्षक अतुल जाधव यांच्यासह येथील पाच जणांची नियुक्ती करण्यात आली. त्यांचे सोलापूर म्युचर खो खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.



सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधींना समाविष्ट करतानाच ज्येष्ठ आणि नव्या दमाच्या फळीला काम करण्याची संधी देण्यात आली. यामध्ये स्विकृत उपाध्यक्षपदी लातूरचे आमदार अभिमन्यू पवार, पालघरच्या ग्रीष्मा पाटील, पुण्यातील अश्विनी पाटील यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीस अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ड. गोविंद शर्मा यांच्यासह सर्व संयुक्त चिटणीस आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या सर्व उपसमित्या २०२४ ते २०२८ या कालावधीसाठी काम पाहणार आहेत.

# घनकचरा विभागातील बिगारी कामगारांची झोनकडील बदली रद्द करा

**कामगार क्रांती युनियनची मागणी ▶▶ महापालिकेचे कामगार घंटागाडीवर राबविले जात असल्याचा आरोप**

**सोलापूर/प्रतिनिधी**

महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागातील १९० बिगारी कामगारांची झोन कडे करण्यात आलेली बदली रद्द करावी. पूर्ववत प्रभागात त्यांना काम देण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कामगार क्रांती युनियनच्या वतीने देण्यात आला आहे.

कामगार क्रांती युनियनच्या वतीने कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. १९६४ सालापासून पूर्वी आरोग्य खाते व आताचे घनकचरा विभागात कार्यरत असलेले १९० बिगारी सेवकांना प्रत्येक झोनकडे तात्पुरते स्वरुपात कामाच्या सोईसाठी वर्ग करण्यात आले. ते प्रत्येक वेगवेगळ्या प्रभागात त्यांना स्वतंत्र हद्द देवून दैनंदिन साफसफाई गटार काम, कचरा उचलणे, घरजोड ड्रेनेज सोडविणे इत्यादी प्रभागातील कामे ते करत होते. अशा प्रकारे त्यांच्या कामाचे स्वरुप असताना १९० बिगारी सेवकाना वेगवेगळ्या झोन मध्ये बदल्या करुन पाठवून सुमारे दोन वर्षाचा कालावधी होत आला. त्यामुळे त्यांचे कामाचे स्वरुप बदलून गेले. झोनल अधिकारी सांगतील ती कामे करावी लागतात. नगरअभियंता सार्वजनिक आरोग्य अभियंता यांच्या विभागातील नागरी कामे या बिगारी सेवकांकडून करुन घेतली जात आहेत. हे १९० बिगारी सेवकांच्या इच्छे विरुध्द आहे. आजही १९० बिगारी सेवकांचा मासिक पगार घनकचरा विभागातय काढला जात आहे. घनकचरा विभागातील प्रत्येक प्रभागातून ठराविक बिगारी सेवकांची एकूण १९० संख्या आहे. वरील प्रमाणे बदल केल्यामुळे घनकचरा विभागात बिगारी पदाची संख्या कमी झाली. त्यामुळे काम काजात कमालीचा गोंधळ निर्माण झाला आहे. घंटागाडीचे काम कंत्राटी असून कामगार लावणेची जबाबदारी कंत्राटदारांची असतांना घनकचरा विभागातील कायम कामगारांना घंटागाडीवर पाठविले जाते. त्यांचा पगार कंत्राटदार मनपाकडून म्हणजे त्या कामगाराचा दोन्ही ठिकाणी पगार निघतो, पण प्रत्यक्ष त्यास घनकचरा कडील एकच पगार अदा केला जातो. कंत्राटदार महापालिकेकडून जादा पगार वसूल करुन आर्थिक गैरव्यवहार करतात, असा आरोप केला आहे. निवेदन देतेवेळी शशिकांत शिरसट, लिंबराज जेटीथोर, अनिल बनसोडे, दत्ता तुळसे आदींसह पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**प्रभागातील एकही बिगारी सेवकास घंटागाडीवर पाठवू नये**

घंटागाडीवर कंत्राटदाराचे कामगार लावावेत. प्रभागातील एकही बिगारी सेवकास घंटागाडीवर पाठवू नये. सेवानिवृत्तीमुळे गेल्या दोन वर्षात, झाडूवाले, बिगारी यांच्या सुमारे २५० जागा रिक्त असल्याने कार्यरत कामगारांना आपले काम सांभाळून रिक्त जागेवरचे जादा काम करावे लागत आहे. याची नोंद घेवून सुधारणा करावी अन्यथा भविष्यात आंदोलन करावे, लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे कामगार नेते अशोक जानराव यांनी दिला आहे.

# केजरीवाल यांच्या हत्येचा कट?

## मोदींच्या सांगण्यावरून दिल्ली मेट्रोमध्ये लिहिल्या धमक्या, आपचा भाजपवर आरोप

**आपच्या खासदार स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणामुळे सध्या दिल्लीत राजकीय युद्ध सुरू आहे. अशातच एक नवीन प्रकरण समोर आले असून दिल्ली मेट्रोमध्ये अरविंद केजरीवाल यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे आरोप आम आदमी पार्टीने सोशल मीडिया पोस्टद्वारे केले आहेत.**

### नरेंद्र मोदींच्या सांगण्यावरून दिल्या धमक्या

या प्रकरणावरुन आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी आणि खासदार संजय सिंह यांनी पत्रकार परिषद घेतली. तसेच या दोन्ही नेत्यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले की, '' भाजप आणि नरेंद्र मोदी यांच्या सांगण्यावरून राजीव चौक, पटेल नगर मेट्रो स्टेशनवर धमकी लिहिली आहे. अरविंद केजरीवाल यांना काही झाले तर त्याला थेट भाजप आणि नरेंद्र मोदी जबाबदार असतील.''

### आतिशी यांनी फोटोकॉपी दाखवल्या

केजरीवाल यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचला जात असल्याचे आपच्या नेत्या आतिशी यांनी म्हंटलं आहे. त्याचबरोबर धमकी बाबतच्या फोटोकॉपी देखील मीडियाला दाखवल्या आहेत.

### मोदी केजरीवालांना घाबरतात

केजरीवाल यांना केलेल्या अटकेवरून आपच्या नेत्या आतिशी यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे त्या म्हणाल्या की, ''भाजप आणि नरेंद्र मोदी हे अरविंद केजरीवाल यांना घाबरतात. निवडणुकीच्या मैदानात ते केजरीवाल आणि आम आदमी पार्टीला तोंड देऊ शकत नाहीत हे या लोकांना माहीत आहे. अरविंद केजरीवाल तुरुंगातून बाहेर आल्यानंतर भाजप आणि नरेंद्र मोदी यांनी केजरीवाल यांच्यावर एकामागून एक हल्ला करण्याचे डावपेच आखले आहेत. लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच २१ मार्च रोजी केजरीवाल यांना खोट्या प्रकरणात तुरुंगात पाठवण्यात आले.''



# प्रज्वल रेवण्णाप्रकरणी

# जेडीएसमधील महिला नेत्या का गप्प?

**कर्नाटकमध्ये उघडकीस आलेल्या सेक्स स्कँडल प्रकरणामध्ये भारताचे माजी पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवण्णा यांचा सहभाग आढळून आल्यानंतर ते फरार झाले आहेत. एकूणच लोकसभा निवडणुकीच्या दरम्यानच हे प्रकरण चव्हाट्यावर आल्यामुळे जनता दल (सेक्युलर) पक्ष अडचणीत आला आहे. या कथित लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी प्रज्वल रेवण्णा हे कर्नाटकमधील हसन मतदारसंघाचे विद्यमान खासदार आहेत. याच मतदारसंघातून ते भाजपा-जेडीएस युतीचे उमेदवारही आहेत. रेवण्णा यांच्या विरोधात पोलिसांकडून लुक आउट नोटीस जारी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जेडीएस आणि त्यांचा सहकारी पक्ष भाजपामधील महिला नेत्या आता खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. त्यांना लैंगिक अत्याचाराच्या आरोपांसाठी कायद्यानुसार शिक्षा व्हावी, अशी इच्छा या महिला नेत्यांकडून व्यक्त केली जात आहे. या दोन्ही पक्षांमधील महिला नेत्यांनी प्रज्वल रेवण्णा यांना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, असे म्हणत त्यांच्या कृत्याचा निषेध केला आहे.**



प्रज्वल रेवण्णा हसन मतदारसंघामधून निवडणूक लढवत आहेत. ते भाजपा-जेडीएस युतीचे अधिकृत उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सभा घेतली होती. या मतदारसंघातील मतदान पार पडल्याच्या दुसऱ्याच दिवशी लैंगिक शोषणाचे व्हिडीओ प्रसारित झाले. त्यानंतर प्रज्वल रेवण्णा यांनी परदेशामध्ये पोबारा केला. ते डिप्लोमॅटिक पासपोर्टवर जर्मनीला पळून गेल्याची माहिती आहे. त्यांच्याविरोधात आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडून 'ब्ल्यू कॉर्नर नोटीस' जारी केली आहे. मात्र, अद्यापही त्यांच्याविषयी खात्रीलायक माहिती मिळालेली नाही. प्रज्वल यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई व्हायला हवी, असे मत जेडीएसच्या आमदार करेम्मा आणि शारदा पूर्या नाईक यांचे आहे. प्रज्वल यांच्याविरोधात विशेष तपास पथकाकडून तपास केला जातो आहे. मात्र, त्यांच्या तपासातील सत्य बाहेर यायच्या आधीच त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आल्याचे या दोन्हीही महिला आमदारांनी प्रकर्षाने सांगितले.

एक महिला नेत्या म्हणून मी या प्रकरणाचा निषेध करते, असे करेम्मा म्हणाल्या. शारदा पूर्या नाईक म्हणाल्या की, प्रज्वलने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे व्हिडीओ पहिल्यांदा समोर आले तेव्हा ते ऐकून त्यांना जबर धक्का बसला. आता या प्रकरणातील तपास कशाप्रकारे पुढे जातो, त्याकडे आमचेही लक्ष आहे, असे त्या म्हणाल्या. या सेक्स स्कँडलमधील पीडित महिलांना न्याय मिळायला हवा, असे विधान भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी केले आहे. मला जेवढे समजते त्यानुसार, या प्रकरणामध्ये अनेक महिलांवर अत्याचार झाला आहे आणि कायद्याने त्यांच्याबरोबर न्याय व्हायला हवा. या प्रकरणातील आरोपीला अत्यंत कठोर अशी शिक्षा व्हायला हवी, असे मत भाजपाच्या आमदार शशिकला अण्णासाहेब जोल्ले यांनी मांडले आहे. याबाबत विचारले असता भाजपाच्या विद्यमान खासदार आणि उमेदवार शोभा करंदलाजे म्हणाल्या की, कायदा त्याचे काम करेल आणि आरोपीला नक्कीच शिक्षा होईल. या प्रकरणी भाजपाच्या महिला नेत्या चढाओढीने मत व्यक्त करत असल्या तरीही जेडीएसच्या महिला आघाडीमध्ये कमालीची शांतता आहे. जेडीएस महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या प्रभावती जयराम यांना या प्रकरणाबाबत विचारले असता त्या म्हणाल्या की, मला या प्रकरणाबद्दल काहीही माहिती नाही. कर्नाटकच्या माजी मंत्री आणि जेडीएस महिला आघाडीच्या माजी प्रमुख लीलादेवी आर प्रसाद यांनी मूळ मुद्द्याला बगल देऊन पक्षाच्या प्रतिमेचा बचाव करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. त्या म्हणाल्या की, मला देवेगौडा यांच्याबद्दल वाईट वाटत आहे. राष्ट्रीय नेता म्हणून असलेल्या त्यांच्या प्रतिमेला या प्रकरणामुळे हादरे बसत आहेत.

दुसरीकडे, या प्रकरणाचा भाजपाबरोबरच्या युतीवर आणि निवडणुकीच्या निकालावर काहीही परिणाम होणार नाही, असे मत जेडीएस नेत्यांकडून व्यक्त केले जात आहे. शशिकला जोल्ले म्हणाल्या की, या प्रकरणामुळे जेडीएस-भाजपा युतीवर परिणाम होणार नाही. तसेच निवडणुकीच्या निकालावरही काहीही नकारात्मक परिणाम होणार नाही. दोन्हीही पक्षांनी प्रज्वल रेवण्णा यांच्यापासून अंतर राखले असल्याचेही त्या म्हणाल्या. एकीकडे भाजपाने पंतप्रधान मोदींची सभा घेत प्रज्वल रेवण्णा यांचा धुमधडाक्यात प्रचार केलेला असला, तरीही काँग्रेसवर टीका करण्याची संधी दवडली नाही. मतदानाच्या आधीच लैंगिक छळाचे व्हिडीओ प्रसारित झालेले असतील तर प्रज्वल रेवण्णा यांना देशाबाहेर का पळून जाऊ दिले, असे म्हणत भाजपाने काँग्रेस सरकारवर हल्लाबोल केला आहे.

# 'इंडिया' कसा निवडणार पंतप्रधानपदाचा चेहरा?



विरोधकांकडे, इंडिया आघाडीकडे पंतप्रधान पदाचा चेहरा नसल्याची टीका पंतप्रधान मोदी आणि भाजप नेत्यांकडून केली जाते. त्या टिकेला आता शरद पवारांनी उत्तर दिलंय. राज्यात आज लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याचं मतदान आज होतंय. सकाळी सात वाजल्यापासून राज्यातील १३ मतदारसंघांमध्ये मतदानाला सुरुवात झाली आहे. यंदाच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत होतेय. महाविकास आघाडीला राज्यात किमान २४ जागा मिळवतील, असा विश्वास राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवारांनी व्यक्त केला. टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी विविध विषयांवर भाष्य केलं.

केंद्रात इंडिया आघाडीची सत्ता येईल. भारतीय जनता पक्षाचा पराभव होईल. जनमानसातून तसे संकेत मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींना महाराष्ट्रात यंदा १८ सभा घ्याव्या लागल्या, याकडेही शरद पवारांनी लक्ष वेधलं. 'लोकसभा निवडणुकीची घोषणा झाली त्यावेळी भाजपनं अब की बार ४०० पारचा नारा दिला होता. पण आता त्यांना बहुमत तरी मिळेल का, याबद्दल मला शंका वाटते,' असं पवार म्हणाले.

इंडिया आघाडीकडे पंतप्रधान पदाचा चेहरा कुठेय? पंतप्रधान कोण होणार? असे प्रश्न पंतप्रधान मोदींसह भाजपचे अनेक नेते उपस्थित करतात. त्यांच्या प्रश्नांना शरद पवारांनी उत्तर दिलं. 'काही दशकांपूर्वी अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा मोरारजी देसाई पंतप्रधान झाले होते. सरकार स्थापनेसाठी जयप्रकाश नारायण यांनी पुढाकार घेतला होता. तेव्हा निवडून गेलेल्या खासदारांनी देसाईंची निवड केली होती. इंडिया आघाडीला संधी मिळाल्यास तसंच होईल', असं पवारांनी सांगितलं.

पंतप्रधान मोदींनी राज्यातील प्रचारसभांमध्ये उद्धव ठाकरेंचा उल्लेख नकली संतान, त्यांच्या पक्षाचा उल्लेख नकली सेना असा केला. पुण्यातील सभेत शरद पवारांचा उल्लेख 'भटकती आत्मा' असा केला होता. त्यावरुन पवारांनी उत्तर दिलं. पंतप्रधानांकडून अशा विधानांची अपेक्षा नव्हती. मोदींनी भाषेची पातळी सोडली. त्यांनी पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा धुळीस मिळवली, अशी टीका पवारांनी केली.

# 'एवढ्या' दागिन्यांची सरकारच करतंय चोरी

**ओडिशा राज्यामध्ये विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकत्रच होत आहेत. या ठिकाणी विधानसभेच्या १४७ मतदारसंघांसाठी; तर लोकसभेच्या २१ मतदारसंघांसाठी मतदान पार पडणार आहे. या राज्यामध्ये २४ वर्षांपासून नवीन पटनाईक हेच मुख्यमंत्री आहेत. यावेळी सहाव्यांदा मुख्यमंत्री पदावर येण्यासाठी ते प्रयत्न करताना दिसत आहेत. दुसरीकडे भारतीय जनता पार्टी या राज्यामधील आपले प्राबल्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या राज्यामध्ये सरकार स्थापन करण्याइतपत विधानसभेच्या जागा आम्ही जिंकू, असा दावा भाजपाकडून केला जातो आहे. त्या पार्श्वभूमीवर लोकसभा आणि विधानसभा अशा दोन्ही निवडणुकांच्या प्रचारासाठी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी ओडिसामध्ये प्रचारसभा घेत आहेत. मात्र, या निवडणुकीमध्ये भाजपाने लावून धरलेला एक मुद्दा खूपच चर्चेत आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यापासून ते आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा शर्मा यांच्यापर्यंत भाजपाच्या अनेक नेत्यांनी या मुद्द्याकडे लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. तो म्हणजे जगन्नाथ पुरी मंदिरात असलेल्या रत्नभांडाराच्या सुरक्षिततेचा मुद्दा! पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवारी (२० मे) पुरी येथे रोड शो केल्याने हा मुद्दा ओडिशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी पुन्हा एकदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### जगन्नाथ पुरी मंदिरातील रत्नभांडार म्हणजे काय?

जग्गनाथ पुरीचे मंदिर अत्यंत जुने असून, ते १२ व्या शतकामध्ये बांधण्यात आल्याचे सांगितले जाते. या मंदिरातील भगवान जगन्नाथ, भगवान भालभद्र व देवी सुभद्रा या देवतांचे दागिने मंदिराच्या आतील रत्नभांडारामध्ये ठेवण्यात आले आहेत. आजवर अनेक भक्त व राजांनी शतकानुशतके दान म्हणून दिलेले हे दागिने आहेत. हे रत्नभांडार मंदिराच्या आत असून, सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून त्याची दोन दालने आहेत. भितर भांडार (आतले दालन) आणि बाहरा भांडार (बाहेरील दालन), अशी त्यांची नावे आहेत. बाहरा भांडार म्हणजेच बाहेर असलेले दालन नेहमी उघडण्यात येत असते. पुरीमधील प्रसिद्ध वार्षिक रथयात्रा आणि मोठ्या सणांच्या निमित्ताने या बाहेरच्या भांडारातील दागिन्यांनी देवाची मूर्ती मढविण्यात येते. मात्र, आतले दालन मागच्या ३८ वर्षांपासून उघडण्यात आलेले नाही.

### रत्नभांडाराचे आतले दालन शेवटचे कधी उघडण्यात आले होते?

अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मे ते २३ जुलै १९७८ दरम्यान रत्नभांडार उघडण्यात आले होते. तेव्हा आतील वस्तूंची यादी केली गेली होती. त्यानंत, १४ जुलै १९८५ रोजी पुन्हा एकदा रत्नभांडाराचे दरवाजे उघडण्यात आले होते; मात्र यावेळी आतील वस्तूंची यादी अद्ययावत करण्यात आली नव्हती. ओडिशाचे माजी कायदेमंत्री प्रताप जेना यांनी ओडिशा विधानसभेत एप्रिल २०१८ रोजी रत्नभांडारामध्ये असलेल्या दाग-दागिन्यांची माहिती दिली होती. १९७८ साली केलेल्या यादीनुसार रत्नभांडारामध्ये १२,८३१ तोळे सोन्याचे दागिने आहेत. या दागिन्यांना मौल्यवान रत्नेही जडलेली आहेत. तसेच २२,१५३ तोळे चांदीची भांडी आणि इतरही अनेक मौल्यवान वस्तू आहेत. त्यासह आतील दालनामध्ये इतरही काही दागिने असून, यादी तयार करण्याच्या काळात त्यांचे मोजमाप होऊ शकलेले नाही. ओडिशा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर राज्य सरकारने ४ एप्रिल २०१८ रोजी प्रत्यक्ष पाहणीसाठी रत्नभांडाराचे आतील दालन उघडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, या रत्नभांडाराच्या किल्ल्या मंदिर प्रशासनाला मिळाल्या नसल्याने या प्रयत्नाला यश आले नाही. त्यामुळे भारतीय पुरातत्त्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी बाहेरूनच या दालनाची तपासणी केली.

### किल्ल्या गहाळ झाल्यामुळे वाद

या घटनाक्रमानंतर रत्नभांडाराच्या किल्ल्या गहाळ झाल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे संपूर्ण राज्यभरात संतापाची लाट निर्माण झाली आहे. पुरीचे जिल्हाधिकारी हे या किल्ल्यांसाठी अधिकृतपणे जबाबदार असतात. या किल्ल्या सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी त्यांची असते. त्यामुळे या पार्श्वभूमीवर दुसऱ्याच दिवशी म्हणजे ५ एप्रिल २०१८ रोजी पुरीचे जिल्हाधिकारी अरविंद अग्रवाल यांनी मंदिर प्रशासन समितीची बैठक घेतली.

# अखिलेश यादवांचा इंडिया आघाडीला प्रस्ताव

## सीबीआय - ईडी सगळेच

**सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) यांची काहीही गरज नसून हे विभाग बंद केले पाहिजेत, असे मत समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव यांनी मांडले आहे. त्यांनी इंडिया आघाडीसमोरही हा प्रस्ताव मांडणार असल्याचे म्हटले आहे. द इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीमध्ये अखिलेश यादव म्हणाले, सीबीआय आणि ईडी बंद व्हायला हवेत. जर तुम्ही आर्थिक फसवणूक केली असेल, तर त्यासाठी आयकर विभाग आहे. मग सीबीआयची गरजच काय? प्रत्येक राज्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आहे. गरज भासल्यास त्याचा वापर करता येतो.**



### सीबीआय-ईडीची गरजच नाही

पुढे ते म्हणाले की, या केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर भाजपाविरोधी पक्षांना त्रास देण्यासाठी केला जात आहे. सरकार आणण्यासाठी वा सरकार पाडण्यासाठी या तपास यंत्रणांचा वापर केला जात आहे. नोटबंदीमध्ये नेमका काय घोटाळा झाला, याचा तपास या केंद्रीय तपास यंत्रणा का करीत नाहीत? काही लोकांनी त्यांचा काळा पैसा कसा पांढरा करून घेतला?., असे यादव यांनी विचारले. मात्र, इंडिया आघाडी सत्तेवर आल्यास इतके दूरगामी पाऊल उचलण्यास तयार होईल का, या प्रश्नावर ते म्हणाले, हा माझा प्रस्ताव असून, मी तो इंडिया आघाडीसमोर ठेवणार आहे. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पार्टी आणि काँग्रेस एकत्र लढत आहेत. आपल्या आघाडीबाबत ते म्हणाले, ही आघाडी कार्यरत राहील. आम्ही ती कार्यरत ठेवू. येणारी कोणतीही निवडणूक असो; आम्ही एकत्र लढू. मात्र, सध्या देशात आमचे सरकार यावे, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. उत्तर प्रदेशमधील अमेठी आणि रायबरेली हे दोन मतदारसंघ गांधी-नेहरू घराण्याचे पारंपरिक मतदारसंघ मानले जातात. समाजवादी पार्टी आणि काँग्रेस युतीमध्ये असो वा नसो; समाजवादी पार्टीने हे दोन मतदारसंघ नेहमीच काँग्रेससाठी सोडले आहेत. अर्थातच, या निवडणुकीतही या दोन मतदारसंघांमध्ये काँग्रेसचेच उमेदवार आहेत.

### इंडिया आघाडी कायम कार्यरत ठेवू

२०१९ मध्ये अमेठीमध्ये राहुल गांधी यांचा स्मृती इराणींकडून पराभव झाला होता. या निवडणुकीत अमेठीमधून गांधी घराण्याचे निष्ठावंत किशोरी लाल शर्मा; तर रायबरेलीतून राहुल गांधी लढत आहेत. २०१९ च्या निवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची कामगिरी अत्यंत खराब राहिली होती. त्या पार्श्वभूमीवर बोलताना ते म्हणाले, प्रत्येक निवडणूक नवीन परिस्थिती निर्माण करीत असते. परंतु, आमची आघाडी कायम राहील, असा आमचा प्रयत्न असेल. राष्ट्रीय स्तरावरही इंडिया आघाडी कार्यरत राहील.अखिलेश यादव यांनी अमेठी आणि रायबरेलीमध्ये रॅली घेतल्यामुळे किमान अखिलेश यांचा या आघाडीवर पुरेसा विश्वास आहे, हे अधोरेखित होते. राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांनी एकत्र येत घेतलेल्या या सभांनाही चांगला प्रतिसाद मिळताना दिसला. सध्या प्रत्यक्ष मैदानात दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये चांगले संबंध असल्याचे दिसून येत आहे. उत्तर प्रदेशमधील जवळपास प्रत्येक मतदारसंघामध्ये यादव समाजातील मतदारांची संख्या ३.५ लाख आहे. यादव हा समाजवादी पार्टीचा पारंपरिक मतदार मानला जातो. अखिलेश यादव म्हणाले, आमच्या मदतीशिवाय काँग्रेसलाही चांगली कामगिरी करणं शक्य नाही. २०१९ मध्ये रायबरेली लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या पाच विधानसभा मतदारसंघांपैकी चार मतदारसंघांमध्ये सपाने विजय मिळवला आहे. अखिलेश यादव म्हणाले, यावेळी आमच्या युतीमध्ये एक वेगळीच ऊर्जा तुम्हाला जाणवेल; जी मागील युतीमध्ये नव्हती. 'पीडीए व्होट' (पिछडा, दलित व अल्पसंख्याक मतदार) आमच्या बाजूने असल्यामुळे आम्हीच इथे जिंकणार आहोत. काँग्रेसही आमच्याबरोबर आहे.

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसच्या पारंपरिक मतदारांमध्ये उच्चवर्णीय, दलित आणि मुस्लिमांचा समावेश होतो. त्याबाबत अखिलेश यादव म्हणाले की, यावेळी फार मोठा बदल होणार आहे. कारण- पक्षाने जातनिहाय जनगणना आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा लावून धरला आहे. मात्र, काँग्रेसला ओबीसींचा विश्वास जिंकण्यात यश मिळेल की नाही, हे त्यांच्यावरच अवलंबून असेल. काँग्रेसमधील बदल राहुलच करीत आहेत का, या प्रश्नावर अखिलेश यादव म्हणाले, काँग्रेसची रणनीती या बदलास कारणीभूत आहे.

### समाजवादी पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होणार?

इंडिया आघाडीच्या सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याबाबत ममता बॅनर्जींनी वक्तव्य केले होते. त्या पार्श्वभूमीवर अखिलेश यादव म्हणाले, आमच्यात काही अंतर जरूर राहिले आहे. मात्र, त्यांनाही इंडिया आघाडी सत्तेत यावी, असेच वाटते. इंडिया आघाडी सत्तेत आली, तर समाजवादी पार्टी या सरकारमध्ये सामील होईल की बाहेरून पाठिंबा देईल, या प्रश्नावर ते म्हणाले, आतून की बाहेरून पाठिंबा, हे आम्ही लोकसभा निवडणूक झाल्यावर ठरवू. मात्र, आम्ही आमचे सरकार सत्तेत नक्की आणू. त्यासाठीची आमची रणनीती काहीही असू शकेल. येत्या काळात प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा विचार करतील, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे. त्याबद्दल तुम्हाला काय वाटते, असे विचारले असता, अखिलेश यादव म्हणाले, प्रादेशिक पक्ष त्यांच्या आहे त्या मजबूत स्थितीत राहतील आणि काँग्रेसला ताकद देण्याचे काम करतील. जेव्हा जेव्हा काँग्रेस कमकुवत झाली आहे,

# तुम्ही ‘गोल्डन कार्ड’ काढून ठेवले का?

# नसेल तर काढून घ्या; पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळवा

- आजारपणाच्या धावपळीत मोफत उपचाराची शोधाशोध नको
- बायपास सर्जरीसह १ हजार ३६५ आजारांवर फुकट उपचार

सोलापूर/खास प्रतिनिधी

वाचकहो; आजारपण सांगून येत नाही. जेव्हा आजापण येतं तेव्हा आपण कोणत्या दवाखान्यात उपचारासाठी रुग्णास न्यायचं? उपचारासाठी खर्च कोठून करायचा? उपचारात काही सवलत मिळू शकते का? मिळणारी सवलत किती? कोणत्या दवाखान्यामधून सवलतीत उपचार होऊ शकतात, सवलतीच्या उपचारात आपण बसू शकतो का? याबद्दलचे विचार आपण करायला लागतो. मात्र, आजारपण येण्यापूर्वीच दक्ष राहून आपण सजगपणे काही गोष्टी केल्या तर आजापणाच्या नेमक्या धावपळीवेळी सवलतीममध्ये उपचार मिळतील का? याची शोधाशोध करण्याची गरज भासणार नाही. सवलतीमधील उपचाराचे टेन्शन राहणार नाही.

तेव्हा आपण ‘आयुष्यमान भारत’ म्हणजेच ‘गोल्डन’ कार्ड आपण काढूनच ठेवायला हवे.

सर्वसामान्य गोरगरीब तसेच वंचित घटकातील नागरिकास महागडे उपचार शक्य होत नाहीत. उपचाराअभावी त्यांना या जगाचा निरोप घ्यावा लागतो. उपचाराअभावी मृत्यू येण्याची आफत कोणावर ओढावली जाऊ नये, यासाठी मायबाप सरकारनं संबंधितांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर,आयुष्यमान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजना एकत्रित करून प्रतिवर्ष प्रतिकुटुंब पाच लाखांपर्यंत मोफत उपचार देण्याची योजना आणली. त्यासंदर्भात राज्य शासनाने २३ जुलैला स्वतंत्र निर्णय आदेश काढला. या अंतर्गत मुख्यत्वे, कॅन्सर हृदयरोग बायपास सर्जरीसह तब्बल एक हजार ३६५ आजारांवर रुग्णांना मोफत उपचार मिळणार आहेत.






## घरबसल्या ‘असे’ काढा गोल्डन कार्ड...

### वेबसाईटवर चार टप्पे पार करा बस्स...हो जायेगा काम

- अधिकृत संकेतस्थळावर गेल्यावर येथे तुम्हाला डाव्या हाताला वर लिहिलेले दिसेल, जिथे मोबाईल नंबरची माहिती विचारली जाईल. एंटर मोबाईल नंबरसह कॉलममध्ये तुमचा मोबाईल नंबर टाका. त्या खाली तुम्हाला कॅच कोड भरा, तोच टाका. यानंतर तुम्हाला मोबाईलवर ओटीपी मिळेल
- यानंतर तुम्हाला तुमच्या प्रांत आणि जिल्ह्यावर क्लिक करावे लागेल.
- हे केल्यानंतर तुम्हाला दस्तऐवज किंवा आयडी क्रमांक निवडण्यास सांगितले जाते. त्यावर क्लिक केल्यानंतर सर्चवर क्लिक करा
- जर तुम्ही या योजनेसाठी पात्र असाल तर तुम्हाला पीएम आरोग्य योजनेद्वारे आयुष्मान कार्ड दिले जाईल.

## ‘गोल्डन’ कार्डद्वारे कोणाला मिळतील मोफत उपचार ?

पिवळे रेशनकार्ड, अंतोदय व अन्नपूर्णा योजनेतील शिधापत्रिकाधारक, केशरी रेशनकार्डधारक, शासकीय अनाथालयातील विद्यार्थी, शासकीय आश्रम शाळांमधील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रम, शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील पत्रकार व त्यांचे कुटुंब, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी महामंडळाकडील नोंदणीकृत कामगार व त्यांचे कुटुंब हे सद्य:स्थितीत या योजनेसाठी पात्र आहेत. आता २३ जुलै २०२३च्या शासन निर्णयानुसार पांढरे रेशनकार्ड असणाऱ्यांसह शासकीय नोकरदारदेखील या योजनेसाठी पात्र असतील, पण त्याची अंमलबजावणी अजून सुरु झालेली नाही.



## आयुष्यमान भारत योजना

अन् सोलापूर जिल्हा याबद्दल थोडसं...

- एकूण लाभार्थी : ३३,४७,५५५ –
- एकूण रुग्णालये : ५१
- योजनेतील आजार :१३६५
- आतापर्यंत कार्ड काढलेले १० लाख ३० हजार (आकडा वाढलेला असू शकतो)

## मुख्यमंत्री सहायता निधीतूनही २ लाखांची मदत

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडूनही रुग्णांना विविध आजारांसाठी अर्थसहाय केले जाते. त्याठिकाणी उपचार घेणाऱ्या रुग्णांना जास्तीत जास्त दोन लाखांची मदत मिळू शकते. त्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे रुग्णांनी अर्ज करणे अपेक्षित आहे.

## सोलापुरातील ‘या’ रुग्णालंयामधून मोफत उपचार

कुंभारी अश्विनी ग्रामीण रुग्णालय, रिलायन्स हॉस्पिटल कुंभारी, कासलीवाल बालरुग्णालय, चिडगूपकर रुग्णालय, हृदयम सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, गंगामाई रुग्णालय, सोलापूर कॅन्सर रुग्णालय, सिद्धेश्वर कॅन्सर रुग्णालय, रघोजी किडनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, युगंधर सुपर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हिल).

## सोलापूर जिल्ह्यात साडेतेहत्तीस लाख नागरिक पात्र

२३ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार आता सर्वांनाच आयुष्यमान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळणार आहे.२०११च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्ह्यातील ३३ लाख ४७ हजार ५५५ लाभार्थी पाच लाखांपर्यंतच्या मोफत उपचारासाठी पात्र ठरले आहेत.

## आधी तपासा तुमची पात्रता मग...

जर तुम्हाला आयुष्मान भारत योजनेचे कार्ड मिळवायचे असेल तर त्यासाठी तुम्हाला आधी तुमची पात्रता तपासावी लागेल. हे काम खूप सोपे आहे आणि घरी बसून ऑनलाईन करता येते. तुमच्या मोबाईल क्रमांकावर लॉगिन करून तुम्ही तुमच्या कुटुंबाचा प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समावेश आहे की नाही हे शोधू शकता. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला कोणताही अर्ज करण्याची आवश्यकता नाही. जर तुमच्या कुटुंबाचा प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या यादीत समावेश असेल, तर तुम्ही वैद्यकीय उपचारासाठी कोणत्याही सूचीबद्ध रुग्णालयात दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचा लाभ घेऊ शकता.

## कोठून काढता येईल आयुष्यमान भारत कार्ड ?

त्यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्रे तथा सेतू सुविधा केंद्रातून लाभार्थी गोल्डन कार्ड काढू शकतो. भविष्यात या योजनेत आणखी रुग्णालये वाढतील. ज्यांना या योजनेतून पाच लाखांपर्यंत मोफत उपचार घ्यायचे आहेत, त्यांनी गोल्डन कार्ड काढून घ्यावे.

# विविध प्रश्नांसाठी माने यांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

द. सोलापूर/प्रतिनिधी



द.सोलापूर - सुंदरम नगर येथील असलेला जलतरण तलाव दुरुस्त करून या भागातील नागरिकांसाठी सुरू करावा, गतवर्षी पडलेला दुष्काळामुळे नुकसान झालेल्या उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळावी, खरीप पिकाचे पेरणीसाठी शेतकऱ्यांना आवश्यक खत उपलब्ध करून द्यावा, शहरातील होर्डिंग स्ट्रक्चरल ऑडिट करावे, कुमठे लमाण तांडा व साखरेवाडी येथे स्वतंत्र मतदान केंद्र करावे या शेतकरी आणि शहराच्या समस्याप्रश्नी माजी आमदार दिलीपराव माने यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली.

दक्षिण व उत्तर सोलापूर, सोलापूर शहर, तालुक्यातील विविध प्रश्न संदर्भात माजी आमदार दिलीपराव माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी गंगाधर बिराजदार, प्रथमेश पाटील, बाळासाहेब पाटील, संजय जाधव, उमेश भगत, ज्ञानोबा साखरे, महेश घाडगे, सतीश मस्के, गणपत बचुटे, नितीन भोपळे, अनिल हिबारे, रेवनसिद्ध साखरे, अजय बचुटे, सुनील जाधव, अजय सोनटक्के, मुजफ्फर जहागीरदार, गुरुबाळा पाटील, संजय लोणारी, रवींद्र पाटील, अमोगसिद्ध पाटील, अशोक कलशेट्टी, बसवराज पाटील आदी उपस्थित होते.

सुंदरम नगर येथील जलतरण तलाव बंद अवस्थेत असून याची तातडीने दुरुस्ती करून हा जलतरण तलाव जुळे सोलापूर भागातील नागरिकांसाठी सुरू करण्याची मागणी माने यांनी केली. गतवर्षी जिल्ह्यात पडलेल्या दुष्काळामुळे खरीप पिके पूर्णपणे जळून गेली. मात्र केवळ पाच तालुक्याच्या समावेश दुष्काळी तालुके म्हणून तर उर्वरित सहा तालुका यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केली. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही दुष्काळी मदत मिळाली नसल्याचे सांगून दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळवून देण्याची मागणी केली.

औज ते चिंचपूर बंधाऱ्या दरम्यान भिमा नदी काठावर असलेल्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना केवळ दोन तास तर वरील भागातील शेतकऱ्यांना सहा तास वीज पुरवठा करण्यात येतो. औज, कुरघोट, टाकळी, चिंचपूर या गावातील नागरिकांचे पिण्याचे पाणी, वस्तीवरील राहणारे नागरिक, शेतकरी, जनावरे यांच्या पिण्याचे पाण्याच्या सोयीसाठी व उपलब्ध पाणी, शेतीपिकास देण्यासाठी सहा तास वीज पुरवठा करण्याची आग्रही मागणी केली. यावेळी चर्चेअंती चार तास तरी वीजपुरवठा देण्यात यावा असे माने यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व विषयावर सकारात्मक चर्चा केली.

## शासकीय सहकार व लेखा पदविका परीक्षा २४ ते २६ मे दरम्यान

सोलापूर/प्रतिनिधी

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे घेण्यात येणारी शासकीय सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. एड ए. ) परिक्षा व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षा २४, २५ व २६ मे २०२४ रोजी सिध्देश्वर प्रशाला, सिध्देश्वर पेठ, सोलापूर या केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परिक्षेसाठी दि.१५ मे २०२४ पासून ऑनलाईलन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत . ज्या परिक्षार्थिंना तांत्रिक कारणास्तव ऑनलाईन प्रवेशपपत्र मिळू शकले नाही व ज्या परिक्षार्थीचा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त हजेरीपटामध्ये समावेश आहे त्यांना परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. अशा परिक्षार्थींनी स्वत:चा फोटो, ओळखपत्रासाठी आधारकार्ड, वाहन परवाना, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड इत्यादी सोबत आणणे आवश्यक असल्याचे जिल्हा उपनिबंधक ( सहकारी संस्था) तथा जी.डी.सी. ण्ड ए परिक्षा केंद्र प्रमुख किरण गायकवाड यांनी कळविले आहे.

# नांदायला येण्यास पत्नीचा नकार; पतीने केले विष प्राशन

सोलापूर/प्रतिनिधी

पत्नीने नांदायला सासरी येण्यास नकार दिला.त्यामुळे पतीने सासुरवाडीतच विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना पंढरपूर तालुक्यातील अनवली येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.



विशाल विष्णू हवलदार (वय ४ रा. रांजणी ता.पंढरपूर) असे पतीचे नाव आहे. तो रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास पत्नीला आणण्यासाठी अनवली या गावी गेला होता. पत्नीने सासरी येत नाही असे सांगितली . तेंव्हा पतीने सोबत आणलेले विषारी द्रव प्राशन केले . त्याला पंढरपूर येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले .तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

**बोरगाव येथे तरुणीला लोखंडी रॉडने मारहाण**

अज्ञात कारणावरून एका २५ वर्षीय तरुणीला चौघा जणांनी मिळून लोखंडी रॉड आणि हाताने मारहाण केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील बोरगाव येथे रविवारी घडली.

अरिना अब्बासअली मुजावर (वय २५ रा . लिंबीचिंचोळी ता.दक्षिण सोलापूर)असे त्या मारहाण झालेल्या तरुणीचे नाव आहे. ती रविवारी दुपारी बोरगाव येथे एका कार्यक्रमास गेली होती . त्यावेळी तिला पूजा औसंगे ,वैशाली औसंगे व इतर चार जणांनी मिळून मारहाण केली. यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने तिला अक्कलकोट येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून सोलापूरातील शासकिय रुग्णालयात रात्री दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

**वाडेगाव येथे वृद्धाला काठीने मारहाण**

शेतीच्या वादातून एका वृद्ध व्यक्तीला लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना सांगोला तालुक्यातील वाडेगाव बस स्टँड वर रविवारी घडली. मारुती निवृत्ती दिघे (वय ६६ रा. वाडेगाव) असे जखमींचे नाव आहे . त्यांना अजित राजाराम दिघे याने काठीने हातावर मारहाण केली .अशी नोंद तालुका पोलीसात झाली आहे.

# तेरे पिंजरे में पोपट बोले...अभी नही !

# मिठू मिठू बोलणारा पोपट पाळण्याला आता बंदी

- पोपट पाळण्याच्या हौसेला घालावी लागणार मुरड
- बंदीस्त पोपट आता जाणार निसर्गाच्या सानिध्यात

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

पोपट पक्षी पाळण्याची भारी हौस तशी आपल्याकडे अनादी काळापासूनची. मात्र आता या हौसेला मुरड घालावी लागणार आहे. अबाल वृद्धांसह सर्वांच्या आवडीचा त्यातही चिमुरड्यांच्या अत्यंत आकषर्णाचा मिठू मिठू बोलणारा पोपट आता पिंजऱ्यात ठेवून पाळता येणार नाही. पोपट पाळण्याला वन विभागाने बंदी आणली आहे. वन विभागाच्या या निर्णयामुळे आपले स्वातंत्र्य अन् अस्तित्व गमावून बसलेल्या तमाम पोपटांना आता मुक्त होता येणार आहे. निसर्गाच्या सानिध्यात त्यांना स्वत:च्या मर्जीप्रमाणं राहाता येणार आहे. कोणाची तरी हौस भागवण्यातून बंदीवान राहणे नशीबी आलेले पोपट आता खऱ्या अर्थानं स्वातंत्र्य उपभोगणार आहेत. डाळिंबाच्या चार दाण्यासाठी त्यांना मालकाची हुजरेगिरी करावी लागणार आहे.



> पोपट हा पक्षी आपली राष्ट्रीय संपत्ती आहे आणि त्याला बंदिस्त करून ठेवणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे ज्या कुटुंबांनी पोपट पाळले असेल त्यांनी पोपटाला मुक्त करावे, अन्यथा पोपट पिंजऱ्यात बंदिस्त दिसल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. पोपटाला पकडून त्यांना विकण्यात येत असल्याची माहिती मिळत होती; त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.
>
> – **धैर्यशील पाटील**, उप–वन संवरक्षक, सोलापूर

मिठू मिठू बोलणारा पोपट तसा बुद्धीमान पक्षी. हा पक्षी पाळण्याचा मोह झाल्याशिवाय राहात नाही. पोपट हा पक्षी राष्ट्रीय संपत्ती असल्याने त्याला पिंजऱ्यात डांबून ठेवता येत नाही. त्यामुळे बंदिस्त पोपटांना पिंजऱ्यातून मुक्त करण्यासाठी वनविभागाने आदेश काढला आहे. या निर्णयामुळे जंगलातल्या तमाम पोपटांना न्याय मिळणार आहे. शहर तसेच ग्रामीण भागात ज्यांनी पिंजऱ्यात पोपटांना कैद करून ठेवले आहेत, त्यांचे धाबे कारवाईच्या भितीने दणाणले आहेत. आता पोपट पाळणाऱ्यांना वनविभागाच्या आवाहनानंतर पोपटांना मुक्त करावे लागणार आहे; अन्यथा दंडासह कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी लागणार आहे.

पोपट आणि माणूस यांचे जिव्हाळ्याचे संबंध अगदी दंतकथांच्या काळापासूनचे आहेत. थोडक्यात पोपट आणि माणूस यांचे जिवाभावाचे नाते आहे. खरे म्हणजे बोलणं ही माणसाची मक्तेदारी; तरीही माणूस जरा जास्तच बोलू लागला की पोपटासारखा बोलतो, अशा शब्दांत त्याचे कौतुक होऊ लागले. तेव्हापासून पोपट बाळगण्याची हौसही वाढू लागली. सोलापूर जिल्हा वन विभागाने एक आदेश काढला त्यामुळे पिंजऱ्यात कैद असलेल्या हजारो पोपटांना या निर्णयामुळे मुक्तसंचार करायला मिळणार आहे. पोपट ही राष्ट्रीय संपत्ती आहे, तो मुक्त संचारमध्ये असायला हवा, त्यासाठी सोलापूर जिल्हा येथील वनविभागाने पुढाकार घेत शहरात ज्यांच्याकडे पोपट पिंजऱ्यात बंदिस्त आहेत, अशा पोपटांना मुक्त करण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी ज्यांनी पोपट पिंजऱ्यात बंदीवान केले आहेत, त्यांनी पोपटाला मुक्त करण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.



## ... तर २५ हजारांचा दंड अन् दोन वर्षाचा कारावास

अलीकडे पोपटांची संख्या घटू लागल्याने वन्यजीव कायद्यानुसार त्याची आरक्षित ४ यादीमध्ये गणना झाली आहे. जो गुन्हा ठरु शकतो. वीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सर्वत्र पोपटांचा मोठ्या प्रमाणात वावर असायचा. अलीकडे ही संख्या घटली आहे. यामुळे या प्रजातीचं संवर्धन करण्यासाठी वन्यजीव कायद्यानुसार पोपट पाळणे, त्याचे पंख छाटणे, विकणे, विकत घेणे हा गुन्हा मानला जात आहे. असे प्रकार आढळले तर २५ हजारांच्यावर दंडात्मक कारवाई अथवा दोन वर्षे कारावास अशी शिक्षेची कायद्यामध्ये तरतूद आहे.

## पोपटाची माहिती देणाऱ्याचे नाव राहणार गुप्त

सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ज्यांनी पोपट पिंजऱ्यात बंदिस्त केले आहे, अशा संबंधितांची माहिती देण्याचे आवाहनही वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, पोपटाची माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवणार असल्याचेही वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.